

मासिक वार्तापत्र • अंक 37 • सप्टेंबर 2024 • सहयोग मूल्य : रु. 10 • 16 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

कोट्यवधी कामगार-कष्टकऱ्याची मुलं शिक्षणासह खेळापासूनही वंचित! मग ऑलिंपिकमध्ये मेडल कुठून येणार? 3

उजव्या विचाराचे एन्फ्ल्युएंसर्स (प्रभावक): फॅशिस्ट विखारी प्रचाराची महामारी 11

आत्महत्यांचे कारखाने: गळेकापू स्पर्धा, वाढती बेरोजगारी आणि कोचिंग उद्योग 14

## एस.सी., एस.टी. उपवर्गीकरणाचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जातीय तणावांना, जातीय अस्मितेच्या राजकारणाला चालना देणारा निर्णय !

## अस्मितावादाला बळी पडू नका! नवनव्या आरक्षणाची नव्हे, तर सर्वांना अधिकाराची मागणी करा!

सर्वोच्च न्यायालयाच्या 7 सदस्यीय खंडपीठाने 1 ऑगस्ट 24 रोजी निर्णय दिला आहे की राज्य सरकारांना अनुसुचित जाती (एस.सी.) आणि अनुसुचित जमाती (एस.टी.) प्रवर्गांचे उपवर्गीकरण (sub-categorisation) करून सरकारी नोकऱ्या व शिक्षणात काही उपवर्गांना अधिक प्राधान्य वा वेगळे आरक्षण देता येईल. कोर्टाच्या मते संख्यात्मक माहितीच्या आधारावर एखाद्या प्रवर्गातील अधिक खालच्या समूहांना प्राधान्याने वागवण्याचे राज्य सरकारांना अधिकार आहेत, आणि एस.सी. व एस.टी. प्रवर्गांमध्ये सुद्धा असमानता आहेत. 2004 साली दिलेल्या ई. व्ही. चिन्नय्या वि. आंध्र प्रदेश खटल्याचा निकाल या निकालाने बदलला. इंद्र साहनी खटल्यात ओबीसींमध्ये उपवर्गीकरणाला मान्यता मिळाली होती आणि आता एस.सी., एस.टी. उपवर्गीकरणाला मान्यता मिळाली आहे. पंजाब शेड्युल्ड कास्ट्स अँड बॅकवर्ड क्लासेस (रिझर्वेशन इन सर्विसेस) ॲक्ट, 2006 च्या संविधानिक वैधतेला दिलेल्या आव्हानावर हा निर्णय देण्यात आला. सदर कायद्याद्वारे वाल्मिकी आणि मजहबी शीख याना पंजाबात आरक्षणात प्राधान्य देण्यात येणार होते. आता या आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. 1975 मध्ये पंजाबमध्ये सुरू झालेल्या या मागणीचा इतिहास या निकालापर्यंत घेऊन आला आहे.

हे उपवर्गीकरण कसे केले जाईल याबद्दल मात्र वेगवेगळी मते न्यायाधीशांनी मांडली आहेत. 7 पैकी 4 न्यायाधीशांनी बंधनकारक नसलेली

**संपादक मंडळ**

टिपणी करत असे म्हटले की ओबीसी प्रमाणेच क्रिमी लेयरचे तत्त्व लागू करावे, आणि अधिक उच्चभ्रू कुटूंबांना एस.सी., एस.टी. आरक्षणातून वगळावे. न्यायाधीश मित्तल यांनी म्हटले आहे की आरक्षणाचा फायदा फक्त एका पिढीपुरता मर्यादित असला पाहिजे, आणि मर्यादा ओलांडत जातीव्यवस्थेविषयक अनैतिहासिक विधानेही केली आहेत. न्यायाधीश चंद्रचूड यांनी नोंद केली आहे की सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या निकषावर निर्णय घेतला गेला पाहिजे. कोर्टाने अशीही नोंद केली आहे की उपवर्गीकरण हे नोकऱ्यांमधील प्रतिनिधित्व आणि मागासलेपणाच्या संख्यात्मक आणि निदर्शनात आणता येईल अशा माहितीवर आधारित असले पाहिजे, ना की मनमर्जीने केलेले. उपवर्गीकरणाकरिता कोर्टाने दोन मार्गांची नोंद केली गेली आहे. पहिला मार्ग आहे प्राधान्यक्रमाच्या मॉडेलचा (preferential model), आणि दुसरा आहे अनन्य वा विशेष (exclusive) मॉडेलचा. या दोन्ही मॉडेल्सचे प्रत्येकी दोन प्रकार कोर्टाने चर्चिले आहेत. परंतु व्यावहारिकरित्या पाहिल्यास, पहिल्या मॉडेलमध्ये एस.सी. च्या एकूण जागांपैकी काही टक्के जागांवर विशिष्ट जातींना प्राधान्य मिळेल, आणि न भरलेल्या जागी एस.सी. मधील इतर जातींना खुल्या असतील; आणि दुसऱ्या प्रकारात विशिष्ट जातींकरिताच (उपवर्ग) काही टक्के जागा राखीव केल्या जातील, आणि एखाद्या वर्षी त्या न भरल्या गेल्यास त्याच जातींकरिता पुढील वर्षी उपलब्ध केल्या जातील. यापुढे जाताना, मुख्य न्यायाधीशांनी एका जातीलाही उपवर्ग मानणे शक्य आहे, परंतु एकाच स्तराचा मागासपणा असलेल्या जातींना एकाच उपवर्गात मोजावे असे म्हटले आहे. न्यायाधीश गवई (तसेच नाथ व शर्मा) यांच्या मते काही जाती आता या स्तरावर पोहोचल्या आहेत की त्यांनी स्वत:हून विशेष तरतुदी सोडल्या पाहिजेत आणि इतर गरजूंना जागा दिली पाहिजे, आणि

पान 4 वर

## घोटाळेच घोटाळे ! केंद्रात आणि राज्यांमध्ये भ्रष्टाचाराचा महापूर !

**राहुल साळवे**

यंदाच्या पावसाने मोदी सरकारचा आणि राज्य सरकारांमधील भाजप व मित्र पक्षांचा चेहरा चांगलाच धुवून काढला आहे. मोदी सरकारचा भ्रष्टाचारी चेहरा लोकांना अगदी स्वच्छ दिसत आहे आणि याचे श्रेय या वर्षीच्या पावसाला गेलेच पाहिजे. जेव्हा देशामध्ये कोरोना काळात लाखो लोक उपचाराविना आणि काम सुटल्याने उपाशी मरत होते तेव्हा जनतेची लूट करून मिळवलेल्या पैशातून 13,450 कोटी नवी संसद बांधण्यासाठी खर्च केले गेले, जिचे नाव सेंट्रल विस्टा आहे, तिचे छत सुद्धा एका पावसात गळायला लागले आहे. ज्या रामललांना टेंट मधून बाहेर काढून महालात बसवण्याच्या नावाखाली मोदी सरकारने मते मागितली होती, त्या "महालाच्या" छतावरूनही पाणी गळत आहे! रामाची नगरी अयोध्याही आता रामाच्या भरोशावर सोडली आहे. ज्या अयोध्येला स्मार्ट सिटी बनवण्याची गोष्ट केली जात होती, तिथल्या रस्त्यांवर पूर्णपणे पाणी साचल्याची अनेक दृश्य आपण टीव्हीवर आणि सोशल मीडिया वर पाहिली आहेत.

महाराष्ट्राचेच उदाहरण घ्या. सिंधुदुर्ग येथील शेकडो कोटी खर्च झालेला शिवाजीराजेंचा पुतळा पडला ज्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आठ महिन्यांपूर्वी मोठ्या थाटात करण्यात आले होते. फक्त उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात अशा अनेक घटना समोर आल्या आहेत. देशाच्या अनेक भागांमध्ये विमानतळाच्या छतांपासून ते रस्ते आणि पूल सरकारच्या धोरणांना बळी पडत आहेत, ज्यांचा उल्लेख मागील दहा वर्षांत विकासाच्या दाव्यांमध्ये वारंवार केला जात होता आणि मते मागितली जात होती. या मागच्या कारणांवर चर्चा करण्यापूर्वी, देशभरात झालेल्या विविध दुर्घटनांबद्दल एकदा जाणून घेऊयात.

दिल्लीमध्ये 27 आणि 28 जून रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल 1 च्या छताचा एक भाग कोसळला, ज्यामुळे आठ जण जखमी झाले आणि एका व्यक्तीचा मृत्यू झाला. मृत व्यक्तीचे नाव रमेश कुमार होते आणि ते कॅब ड्रायव्हर होते. माहितीसाठी सांगायचं झालं तर, 10 मार्च रोजी मोदींनी दिल्ली विमानतळाच्या एका टर्मिनलचं उद्घाटन केलं होतं, आणि दावा केला गेला आहे की ते टर्मिनल वेगळेच आहे. असो. दुसरीकडे आपण पहिले की दिल्लीतील सरकारी दवाखाना एम्सच्या विभागांमध्ये आणि ऑपरेशन थिएटरमध्ये पाणी साचल्यामुळे डझनभर शस्त्रक्रिया थांबल्या आणि आपत्कालीन भरती प्रक्रियेलाही फटका बसला. भिंतींमधून पाणी आत येण्यामुळे आणि जमिनीवर पाणी साचल्यामुळे ट्रॉमा सेंटर आणि कार्डिओ न्यूरोसायन्सेस सेंटर (सीएनसी) मधील नऊ ऑपरेशन थिएटर, जिथे गंभीर आजारी रुग्णांना दाखल केले जाते, ते बंद करावे लागले. रुग्णालयात वीज पुरवठा काही तासांसाठी खंडित झाला. परंतु ज्या घटनेने देशातील लोकांचे लक्ष वेधून घेतले ती होती 27 जुलै ची दुर्दैवी घटना, ज्यात दिल्लीतल्या मध्यवर्ती भागातील ओल्ड राजेंद्र नगर मध्ये असलेल्या लोकप्रिय नागरी सेवा कोचिंग सेंटर "राऊस आय.ए.एस." च्या इमारतीच्या तळमजल्यात जोरदार पावसामुळे पाणी भरल्याने तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आणि एक विद्यार्थी बेपत्ता झाला. पाण्यात बुडालेलं कोचिंग सेंटर मोठं असल्यामुळे मृतांचा एकूण आकडा आणखी जास्त असण्याची

पान 6 वर

# सिनेमाद्वारे अंधराष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचा प्रचार: कामकऱ्यांना भरकटवणारे प्रचारतंत्र

पान 14 वरून

हीच स्थिती "केरल स्टोरी" (ज्यामध्ये सत्यासोबत पूर्णपणे छेडछाड करून "लव्ह जिहाद"च्या असत्याला सत्य बनवले गेले.)आणि "फाईल्स" नावे असलेल्या जवळपास सर्व सिनेमांची आहे. 2024 मध्ये आलेला "स्वातंत्र्यवीर सावरकर" सिनेमा माफीवीर सावरकरांच्या जगप्रसिद्ध माफीनाम्यांविषयी न बोलताच हिंदू राष्ट्राचा प्रचार करतो. 2019चा "पीएम नरेंद्र मोदी", 2024 चा "मै अटल हूँ" यांसारखे सिनेमे नेत्यांच्या खोट्या प्रतिमानिर्मितीसाठी (म्हणजे देशाच्या प्रगतीमध्ये आणि बांधणीमध्ये असलेला वाटा, त्यांनी केलेला त्याग आणि कष्ट रंगवून) जनतेची सहानुभूती मिळवण्यासाठी आणि आत्यंतिक देशाभिमान रुजवण्यासाठी बनवले जातात. इतिहासाचे मिथ्याकरण आणि हिंदुत्वाचा प्रचार करण्यासाठी संघ-भाजपकडून सिनेमा निर्मात्यांना आर्थिक साहाय्यसुद्धा मिळत आहे.




देशातील प्रश्नांकडे कानाडोळा व्हावा आणि "परकीय शत्रू"चे मिथक रूढ व्हावे याकरिता काँग्रेसकाळात होत आले त्यापेक्षा अधिक जोर देऊनपाकिस्तानला भारताचा "नैसर्गिक" शत्रू म्हणून प्रस्तुत करणाऱ्या सिनेमांच्या निर्मितीने मागच्या काही वर्षांमध्ये जोर पकडला आहे. "मेजर", "अटॅक", "शेरशहा", "उरी सर्जिकल स्ट्राईक", "राझी", "गदर 2" सारखे अंधराष्ट्रवादाचे बाळकडू पाजणारे मोठ्या बजेटचे सिनेमे दर काही महिन्यांनी प्रदर्शित होत आहेत. या सिनेमांमधून भारतीय जनतेच्या मनामध्ये पाकिस्तानविरोधात द्वेष निर्माण करून खरेतर देशातील प्रश्नांकडे दुर्लक्ष करायला लावले जात आहे. **खरे पाहता दोन देशांमधील युद्ध आपापल्या देशातल्या भांडवलदार वर्गाचे हित लक्षात घेऊन छेडले जातात आणि त्याचे परिणाम महागाई, बेरोजगारीच्या रूपामध्ये कष्टकरी जनतेलाच सर्वात जास्त भोगावे लागतात.**

यासोबतच "आदिपुरुष", "हनुमान" ह्यांसारखे सिनेमे आज हिंदू देवतांना देशाच्या रक्षणात लावून हिंदुत्वाला एक सामान्य भावना बनवण्याच्या संघाच्या स्वप्नपूर्तीला हातभार लावत आहे. वित्तपुरवठा, करसवलती आणि धर्मवादाचे समर्थन करणाऱ्या जमावाला सिनेमागृहामध्ये खेचण्याची आशा यामुळे अशा चित्रपटांच्या निर्मितीला प्रोत्साहन मिळत आहे.

सिनेमांचा वापर सत्ताधारी वर्ग आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी नेहमीच करत असतो. स्वातंत्र्यानंतरच्या काळात काँग्रेस सरकारने भांडवलदारवर्गाच्या विकासासाठी नेहरूंच्या "समाजवादाचा" आसरा घेतला. नेहरू आणि गांधीच्या कल्याणकारी भांडवलशाहीचे गोडगुलाबी चित्रण अनेक तत्कालीन चित्रपटांमध्ये दिसते. "दो बिघा जमीन", "मदर इंडीया", "नया दौर", "दो आँखे बारा हाथ" यांसारख्या सिनेमांमधून कामगार-कष्टकरीवर्ग आणि भांडवलदारवर्ग एकोप्याने एकाच व्यवस्थेत कसे राहू शकतात याचे चित्रीकरण करण्यात आले. परंतु आज याच भांडवली व्यवस्थेचे आर्थिक संकट टोकाला पोहोचल्यामुळे फॅशिझम सत्तेत पोहोचला आहे आणि प्रचाराच्या प्रत्येक मार्गाचा वापर हिंदुत्व आणि मुस्लीम द्वेष नग्नतेने पसरवण्यासाठी केला जात आहे. शिल्लक होते तेवढे पुरोगामीत्त्व बॉलीवूड हरवून बसला आहे, कारण बॉलिवूडचे पोशिंदे भांडवलदार आज हिंदुत्वाच्या राजकारणात नफा बघत आहेत.

एका काळात समांतर सिनेमाच्या नावाने देशभरात कष्टकरी जनतेच्या जीवनाचे वास्तव दाखवणारे उदारवादी कलाकार आज कुठेही दिसत नाहीत. त्यांनी या फॅसिस्ट सरकारसमोर आणि त्यांच्या पाठिराख्या "प्रोड्युसर्स" समोर केव्हाच हात वर केले आहेत. मोदीच्या वाढदिवसानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात भारतातल्या सिनेमा क्षेत्रातील विख्यात तारकांनी हजेरी लावून शुभेच्छा तर दिल्याच; पण सोबतच सोशल मिडीयावर सुद्धा अभीष्टचिंतनाचा वर्षाव केला. मोदींची तारीफ करण्याची संधी आज कोणताच कलाकार सोडत नाही. कारण त्यानेच त्यांचे धंद्याचे गणित जुळून येणार आहे. आज भारतामध्ये बनवले जाणारे बहुतांश सिनेमे टाकाऊ आणि विचारशक्तीला कुंद करणारे असून ते एका सडत चाललेल्या भांडवली संस्कृतीचे दर्शन घडवतात. सिनेमे बनवणारे लोक आपापल्या वैयक्तिक स्वार्थासाठी हिंदुत्ववादी फॅसिस्ट संघ-भाजप सोबत हातमिळवणी करताना दिसत आहेत.

या सिनेमांच्या प्रचाराला बळी न पडता सर्व जाती-धर्मांच्या कामगार-कष्टकऱ्यांना मिळून पर्यायी मिडीया उभा करण्याची गरज आहे जो प्रबोधन करण्यासाठी सिनेमे, मासिक, वर्तमानपत्र, पुस्तकं, न्यूज चॅनेल चालवेल. आज कामगारवर्गाला अशा सिनेमांची गरज आहे जो प्रस्थापित भांडवली व्यवस्थेच्या अपयशांवर प्रकाश टाकेल. शोषण, दमन आणि अत्याचाराच्या सत्याला जगासमोर मांडेल. समस्येला सोडवण्याची शक्यता तेव्हाच निर्माण होते जेव्हा समस्या तिच्या सत्यतेमध्ये मांडली जाते. वास्तविकतेचे प्रामाणिकपणे चित्रण करणे, वास्तविकतेचे सार मांडणारी प्रातिनिधिक तथ्ये अचूकपणे ओळखणे हेच कलेचे पहिले काम आहे. अशी कला व सिनेमे बनवणे आणि जनतेत सत्य, परिवर्तनाचा विचार रुजवणे हे आज क्रांतिकारी कलाकारांचे दायित्व बनले आहे.

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

•1, साई कृपा चाळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नगर, मानखुर्द (पश्चिम) (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727 • अहमदनगर : 74992 64646
• पुणे : 8669735643

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्यांची भूमिका सुद्धा पार पाडेल.**



**बिगुल व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअ‍ॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल जॉईन करावा :**
**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**
**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा :**
**9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

dkexxj fcxqy
खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# कोट्यवधी कामगार-कष्टकऱ्यांची मुलं शिक्षणासह खेळापासूनही वंचित! मग ऑलिपिकमध्ये मेडल कुठून येणार?

✎ अश्विनी

नुकत्याच होऊन गेलेल्या पॅरिस ऑलिम्पिक मुळे पुन्हा एकदा विविध देशांची त्यातील भागीदारी आणि वर्चस्व चर्चेत येत आहे. यंदाच्या ऑलिम्पिक मध्ये तब्बल 200 देशातल्या खेळाडूंनी 32 विविध खेळात 329 पदकांसाठी सहभाग नोंदवला. नेहमीप्रमाणे अमेरिका 126 पदकांसह पहिल्या स्थानी आहे, चीन त्याच्या पाठोपाठ 91 पदकांवर आणि मग जपान, युके, फ्रान्स सारख्या अनेक देशांनंतर जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारताला शून्य सुवर्णासहित फक्त 6 पदके मिळाली आहेत आणि तो 71व्या नंबरावर आहे. 1896 पासून सुरू झालेल्या आधुनिक ऑलिम्पिक मध्ये सुरुवातीला 14 देशातील जेमतेम 200 खेळाडू सहभागी झाले होते. दर चार वर्षांनी होणाऱ्या ह्या खेळांमध्ये हळू हळू इतर देशांचा सहभाग, महिलांचा सहभाग वाढू लागला. भारताने 1900 पासून ह्या खेळात सहभाग घ्यायला सुरुवात केली. तेव्हापासून अनेक खेळांमध्ये सहभाग वाढवत आतापर्यंत एकूण फक्त 41 पदके भारताने मिळवली आहेत. त्यात सामूहिक खेळात हॉकीने मोठी बाजी मारली तर वैयक्तिक खेळांमध्ये नेमबाजी, शर्यत, कुस्ती, वेटलिफ्टींग अशा विविध खेळांमध्ये पदके मिळवली. **पण तरीही 140 कोटी लोकसंख्या आणि इतर भौगोलिक परिस्थितीच्या मानाने भारताने मिळवलेल्या पदकांची संख्या एवढी कमी का? हा प्रश्न उपस्थित होतोच.**

शाळेच्या तासांमध्ये खेळाचा समावेश याकडे एकदा लक्ष वेधण्याची गरज आहे. युनेस्कोने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार आठवड्यातून किमान तीन तास शारीरिक शिक्षणासाठी देणे प्रत्येक शाळेसाठी बंधनकारक आहे पण 'द ग्लोबल स्टेट ऑफ प्ले'च्या अहवालानुसार भारतातील 45 टक्के शाळांमधून हा विषय हद्दपार झाला आहे. बीबीसीने भारतातील ग्रामीण भागातील शाळेत शिकवणाऱ्या शिक्षकांशी संवाद साधला. त्यांच्या अहवालानुसार अनेक शिक्षक आहेत ज्यांना कधीही क्रीडा प्रशिक्षण मिळाले नाही परंतु शासनाची अनास्था पाहता आवड म्हणून त्यांनी वेगवेगळ्या खेळांमध्ये भाग घ्यायला विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले आहे. ज्या शाळांमध्ये प्रशिक्षण दिलेही जाते तिथे पुरेशा सोयीसुविधा मिळत नाहीत. क्रीडा विभागाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांचे वेळापत्रक ठरलेले नसते. खेळामध्ये घुसलेले राजकारण, कुरघोडी, वशिलेबाजी, भ्रष्टाचार हे या सर्वांवर वरताण आहेत!

युरोपियन स्पोर्ट्स मॅनेजमेंट मध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार ऑलिम्पिक सारख्या सर्वोच्च स्तरावरील खेळांमध्ये पदक मिळवणारे विजेते वयाच्या 10 व्या वर्षापासून खेळाची सुरुवात करतात, परंतु भारतात मात्र आयुष्यात कधीतरी खेळायला मिळाले तर नशीब ही स्थिती आहे. जिथे मूलभूत शिक्षणाचीच वानवा आहे, तिथे शाळेत खेळाची स्थिती काय असेल? भारतातील शिक्षण क्षेत्रातल्या परिस्थितीवर एकदा नजर टाकूयात. शिक्षण हक्क कायदा 2009 अंतर्गत, 6-14 वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाला औपचारिकरित्या मूलभूत अधिकार बनवल्याचे ढोंग केले जात आहे. ज्या सरकारी शाळांमध्ये मुलं शिकतात तिथे शिक्षक, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, प्रयोगशाळा ह्या मूलभूत सुविधा नाहीत, खेळाची




मैदाने तर फार दूरची गोष्ट आहे. सरकारने लोकसभेत दिलेल्या उत्तरानुसार प्राथमिक शाळांमध्ये 9,07,585 शिक्षकांची कमतरता आहे. 'अँन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट' च्या आकडेवारीनुसार जम्मू काश्मीर, बिहार, ओरिसा, झारखंडमधील 25 टक्के पेक्षा जास्त सरकारी शाळांमध्ये खेळण्यासाठी मैदाने नाहीत. कमी-अधिक स्थिती सर्वच राज्यांमध्ये आहे. केवळ 5.8 टक्के प्राथमिक आणि 30 टक्के माध्यमिक शाळांमध्ये क्रीडा शिक्षक आहेत. सुमारे 45 टक्के प्राथमिक आणि 29 टक्के उच्च प्राथमिक शाळांमध्ये कोणत्याही प्रकारचे क्रीडा साहित्य नाही. स्वातंत्र्यानंतर बनलेल्या बहुतांश आयोगाच्या शिफारशींमध्ये आणि शिक्षण धोरणांमध्ये शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या कमीत कमी 6 टक्के खर्च करण्याचे आश्वासन सतत दिले गेले. परंतु त्यात अनिर्बंध कपात करून 2023-24 मध्ये केंद्राच्या बजेटमध्ये शिक्षणावरचा खर्च एकूण जीडीपीच्या 0.37 टक्के केला आहे. वरील आकडेवारी स्पष्ट करते की **वाईट आणि महागड्या शिक्षणव्यवस्थेमुळे बहुतांश विद्यार्थ्यांना विविध खेळांपर्यंत पोचण्याचा विचारही शिवत नाही.**

अगदीच सुरुवातीच्या काळात, जेव्हा नुकतेच ऑलिम्पिक सारख्या स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी भाग घ्यायला सुरुवात केली, त्यावेळेस कुठल्याही सोयी सुविधा दिल्या जात नव्हत्या. रायफल शूटिंगसाठी गोळ्या स्पर्धेदरम्यानही मिळत नव्हत्या तर सरावासाठी मिळणे अशक्यच. आजही भारतात मराठवाडा सारख्या ठिकाणी एकही शूटिंग रेंज नाही. अशा बिकट परिस्थितीतही खेळाडूंनी पदक मिळविल्यास ते इतर तरुणांसाठी एक ध्येय बनले. आता खाजगीकरणामुळे हळू हळू खाजगी क्लब्ज द्वारे अशा सोयीसुविधा पुरवण्यावर भर दिला जात आहे, आणि त्यात निवडक खेळाडूंना सरावासाठी संधी मिळत आहे. ह्या खाजगी शाळा अथवा संस्थांपर्यंत पोचणेही साहजिकच चांगली आर्थिक परिस्थिती असणाऱ्यांनाच शक्य होते. मग प्रश्न उरतो, की मूलभूत हक्क मिळवण्यासाठीच बहुतांश जनतेची बरीचशी उर्जा खर्ची पडते, तेव्हा उपजत वा प्राप्त क्षमतांचा शोध कसा आणि कधी घेतला जाईल? सामान्य कष्टकरी घरातून येणाऱ्या मुलाची/मुलीची विशिष्ट खेळात रुची आहे, ह्याचे आकलन तरी त्या मुलामुलींना कसे होणार?

ऑलिम्पिक खेळांमध्ये सहभाग आणि विजय हा राजकीय प्रभुत्वासाठी वापरला गेला आहे. आजपर्यंत झालेल्या स्पर्धांमधून दिसून येते की विकसित भांडवली देशांचे प्राबल्य आहे. अमेरिका आणि चीन सारख्या देशांचे ऑलिम्पिक मध्ये कायम अव्वल असणे तेथील भौतिक विकासाला आणि सोबतच उपलब्ध संधींना दर्शवते, अर्थातच संधी त्याच आणि तेवढ्याच ज्या एका खेळ-बाजाराची गरज आहेत. अमेरिका क्रीडा क्षेत्रातही प्रचंड भांडवली गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणावर खेळाडूंना स्पर्धांसाठी तयार करते. 1970-80 च्या दशकापासून चीनने भांडवली विकासाचा मार्ग धरल्यानंतर खेळ-बाजाराचा विकास ध्यानी घेत विविध खेळांसाठी मुलांना प्रोत्साहन देणे चालू केले, लहान वयापासून विविध खेळांचे प्रशिक्षण देणे चालू केले, त्यासाठी मोठ्या संस्था उघडल्या. चीन व अमेरिकेचे ऑलिंपिकमधील वर्चस्व हे तेथील खेळ-बाजाराचे वर्चस्व आहे, ज्याने अल्पसंख्य लोकांकरिता अत्युच्च सुविधा निर्माण करून खेळांमध्ये प्रगती साध्य केली आहे. या देशांमध्ये सुद्धा जीवनाचा बहुसंख्य वेळ जीविकोपार्जनात घालवणाऱ्या बहुसंख्य जनतेसाठी खेळ एक दीवास्वप्नच आहे.

**महान साहित्यिक प्रेमचंद यांनी एका समाजाचे स्वप्न पाहिले होते, ते म्हणतात** "मला वाटते की सर्वात उत्तम शिक्षण प्रत्येकाला उपलब्ध असावे; जेणेकरून गरिबातील गरीब व्यक्ती सुद्धा सर्वोत्तम योग्यता प्राप्त करू शकेल आणि सर्वोच्च पद मिळवू शकेल. मी विद्यापीठाची दारे सर्वांसाठी खुली सोडू इच्छितो. सर्व खर्च सरकारची जबाबदारी असली पाहिजे. देशाला फौजेपेक्षा कितीतरी पटीने शिक्षणाची गरज आहे." ह्याचे उत्तम उदाहरण आपण सोव्हिएत रशियाच्या क्रीडा क्षेत्रातून बघू शकतो. 1917 च्या क्रांतीनंतर रशियामध्ये झार सत्तेला संपवून कामगारांच्या सत्तेची स्थापना झाली. झार सत्तेचे सर्व भांडवली विचार पुसण्यासाठी **सोव्हिएत सत्तेने सर्वांच्या हिताचा अन् सामूहिकतेचा विचार देण्यास सुरुवात केली. खाजगी क्रीडा क्लब आणि संघटना ह्यांना बंद करून ते सरकारच्या हाती सोपविण्याचे काम केले.** स्टॅलिनच्या नेतृत्वात 1936 मध्ये पहिल्या क्रीडा विद्यापीठाची स्थापना सोव्हिएत संघात झाली. त्यातून नागरिकांचे आरोग्य आणि युवा नागरिकांच्या शारीरिक शिक्षणास महत्व देणे अधोरेखित केले गेले. स्पर्धेपेक्षाही महत्वाचे म्हणजे आरोग्य चांगले असणे आणि क्रीडा क्षमतांचा बालवयापासून विकास करणे होते. क्रीडा विद्यापीठातून आठवड्याला किमान 2 तास शारीरिक शिक्षण देणे सक्तीचे केले. अनेक यूएसएसआर स्पोर्ट्स क्लबची स्थापना करून खेळांना मोफत आणि सर्वव्यापी बनवून सोव्हिएत सरकार मानत होते की यातून सर्वश्रेष्ठ खेळाडू उभे राहतील. क्षमतांचा विकास हा खाजगी क्लबजमध्ये नाही तर सरकारी प्रणाली अंतर्गतच होऊ शकतो हे सोव्हिएत संघाने सिद्ध केले. युरोपातील सर्वाधिक मागासलेल्या रशियाने कामगार वर्गाच्या नेतृत्वात 30 वर्षात खेळात इतकी नेत्रदिपक प्रगती केली की 1952 मध्ये पहिल्यांदा सहभागी झाल्यानंतर 200 वर्षे भांडवली विकास केलेल्या अमेरिकेच्या तोडीस तोड पदके मिळवली.

ऑलिम्पिक स्पर्धांसाठी यजमान राष्ट्रांनी कायमच भव्यदिव्य स्वरूपात स्पर्धांचे आयोजन केले आहे. शेकडो अब्जावधी रुपये असे प्रचंड खर्चिक हे आयोजन असते. गेल्या ऑलिम्पिक मध्ये भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी जाहीर केले की 2036 चे ऑलिम्पिक भारतात होतील. अहमदाबाद मधील गावात स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्याचे काम चालूही केले. या आलिशान ठिकाणी मूठभर खेळाडूंना संधी मिळेल. तेथील जवळपास 300 शेतकरी स्वतःच्या जमिनी देण्यास विरोध करत आहेत. कष्टकऱ्यांच्या जीविकेवर पाय ठेवून झालेला हा कसला खेळ संस्कृतीचा विकास आहे? गावागावात, शाळेशाळेत, प्रत्येक वस्तीत खेळांच्या सुविधा उपलब्ध न करवता, मूठभरांसाठी अत्याधुनिक सुविधा काय दाखवतात? **खरेतर हा बांधकाम क्षेत्रातील भांडवलदार, व इतर निगडित भांडवलदारांचा विकास आहे, ज्याचे प्रमुख उद्दिष्ट खेळ नसून नफा आहे.** हे यजमानपद घेऊन धनदांडग्यांची धन करण्यापेक्षा देशातील मुलांच्या चांगल्या भवितव्यासाठी चांगले क्रीडाक्षेत्र स्थापन करण्याचं पाऊल सरकार का उचलत नाही? ऑलिम्पिक सारख्या स्पर्धेत विविध क्षेत्रात यशाच्या उत्तुंग शिखरावर घेऊन जाणे तेव्हाच शक्य आहे जेव्हा जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण होऊन सर्वसामान्यांच्या हितासाठी सरकार काम करत असेल. कामगार वर्गाचे राज्य आल्याशिवाय ते शक्य नाही.

# नवनव्या आरक्षणाची नव्हे, तर सर्वांना अधिकाराची मागणी करा!

पान 1 वरून

आरक्षणातून जास्त जागा मिळवू शकलेल्या काही जातीतील व्यक्ती त्याच प्रवर्गातील इतर जातींना संधी नाकारत आहेत, आणि म्हणून "क्रिमी लेयरचे" तत्त्व लागू केले गेले पाहिजे. या विविध मतांपलीकडे जाऊन राज्य सरकारांद्वारे उपवर्गीकरण केले जाऊ शकते यावर 6 विरुद्ध 1 बहुमताने निर्णय झाला आहे.

### विविध राज्यामधील तिढे

एस.सी. व एस.टी. समूहात आरक्षणाचा लाभ असमान पद्धतीने पोहोचत आहे, आणि काही "जातींना" (खरेतर काही जातीतील अत्यल्प व्यक्तींना) त्याचा जास्त फायदा पोहोचत आहे याचा वाद अनेक राज्यांमध्ये अनेक दशकांपासून सुरू आहे, आणि न्यायालयांच्या मतांमध्ये सुद्धा सतत बदल होताना दिसले आहेत. याचा थोडक्यात आढावा घेऊयात.

आंध्रप्रदेशमध्ये माला आणि मडीगा या दोन दलित जातींमधील संघर्ष या निमित्ताने पुन्हा पुढे आला आहे. एस.सी. आरक्षणाचा मोठा फायदा फक्त माला जातीला मिळाला आहे असे मडिगांकडून आरोप पूर्वीपासून होत आले आहेत. परंपरागत जातीव्यवस्थेत मालांचे स्थान मडिगांच्या थोडे वर आहे असे मानले जाई. सफाई आणि चामडे काम करत असल्यामुळे सुद्धा मडिगांना अधिक खालचे मानले जाई. ऐतिहासिकरित्या पाहता मालांची लोकसंख्या किनारी प्रदेशात जास्त होती आणि ते शेतमजूर होते, तर मडिगांची लोकसंख्या भूप्रदेशात जास्त होती आणि चामडे व हाताने मैला ओढण्याचे काम ते करत होते. यासंदर्भात काही अभ्यासही उपलब्ध आहेत की शैक्षणिक संस्था, सरकारी नोकऱ्या, संसद-विधानसभांमध्ये माला व्यक्तिंपेक्षा मडिगा व्यक्तिंना जास्त संधी मिळाल्या आहेत. 70 च्या दशकापासून सुरू झालेली मडिगांना वेगळ्या आरक्षणाची मागणी, 1994 मध्ये मडिगा रिझर्वेशन पोराटा समिती (एम.आर.पी.एस.) स्थापन होऊन अजून आग्रहाने पुढे आली. 1997 मध्येच चंद्राबाबू नायडू सरकारने, जे मडिगा संघटनांच्या मतांच्या पाठिंब्यावर बनले होते, एस.सी. मध्ये चार गट करून आरक्षणाचे उपवर्गीकरण केले होते, परंतु तेव्हा उच्च न्यायालयाने अनुसुचित जाती-जमातींकरिता राष्ट्रीय आयोगाचा सल्ला न घेतल्याच्या कारणावरून हा निर्णय रद्द केला होता. 2000 साली पुन्हा नायडूंनी हा निर्णय घेतला आणि यावेळी उच्च न्यायालयाने तो स्विकारला, पण 2004 मध्ये सर्वोच्च न्यायालयात तो असंवैधानिक असल्याचे म्हणत रद्द झाला. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने मडिगांना सरकारी नोकऱ्या, शिक्षण आणि इतर कल्याणकारी योजनांमध्ये अधिक जागा वा संधी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. माला नेते, उदा. जी. वी. कृष्ण कुमार, यांनी उपवर्गीकरणा विरोधात अगोदरच आंदोलनाचा इशारा दिला आहे. काँग्रेसने विरोध न करण्याची भुमिका घेतली आहे.

कर्नाटकातही होलेय जातीतील व्यक्तींना आरक्षणाचा जास्त फायदा पोहोचल्याचे म्हटले जाते. एकीकडे होलेय आणि दुसरीकडे मडिगा असा संघर्ष येथेही दिसतो. होलेय परंपरागतरित्या शेतांमध्ये श्रमिकांचे काम करत आले, तर मडिगा हे चामड्याचे. आंध्रप्रमाणेच येथेही मडिगांचे आंदोलन (कर्नाटक मडिगा दंडोरा मूव्हमेंट) 1970 पासून चालत आले आहे. 2006 साली कर्नाटकात ए.जी. सदाशिव आयोग नेमला गेला होता ज्याने एस.सी. आरक्षणाचा आढावा घेतला, आणि एस.सी.ना चार उपवर्गात विभागण्याची सूचना केली: उजवे, डावे, स्पृश्य, आणि इतर दलित. यात 'स्पृश्य' उपवर्ग म्हटले जाण्यामागे या वादाची पार्श्वभूमी होती की काही स्पृश्य जाती (लंबानी, भोवी, कोरचा, कोरमा, इत्यादी) सुद्धा 'अस्पृश्य' आधारावर बनलेल्या एस.सी. यादीत समाविष्ट केल्या गेल्या आहेत. आयोगाने सरकारी नोकऱ्यांमधील प्रतिनिधित्व, शेतजमिनीची मालकी आणि राजकीय प्रतिनिधित्व ध्यानात घेऊन चार उपवर्गांमध्ये विभागणी केली. आयोगाने 15 टक्के दलित आरक्षणापैकी 6 टक्के मडिगा व जवळच्या जातींसाठी, 5 टक्के होलेय आणि जवळच्या जातींसाठी, 3 टक्के 'स्पृश्य' दलितांसाठी आणि 1 टक्के इतर दलितांसाठी शिफारस केली होती; परंतु त्याची अंमलबजावणी कोणत्याही सरकारने केली नाही.कर्नाटकातच स्थापन झालेल्या जस्टीस नागमोहन समितीने, जिचा अहवाल समोर आलेला नाही, दलितांकरिता असलेल्या एकंदरित आरक्षणाच्या टक्केवारीत (एस.सी. करिता एकूण 17 टक्के आणि एस. टी. करिता 7 टक्के) वाढ करण्याची गरज मांडली आहे असे बोलले जाते.

सर्वोच्च न्यायालयाचा निकाल ज्या राज्यासंदर्भात आला, त्या पंजाबमध्ये तुलनेने दलितांची संख्या सर्वाधिक म्हणजे लोकसंख्येच्या 32 टक्के आहे. यापैकी रविदासिया, रविदासिया शीख, रामदासिया आणि रामदासिया शीख समुदायांचा उपवर्गीकरणाला विरोध आहे, तर मजहबी शीख आणि वाल्मिकींचा पाठिंबा आहे. महजबी शीख आणि वाल्मिकी एकूण दलित लोकसंख्येच्या जवळपास 40 टक्के आहेत, परंतु सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणसंस्थांमध्ये खूप कमी प्रतिनिधित्व मिळाल्याचा त्यांचा दावा आहे. राजकीय प्रतिनिधित्वातही दिसून येते की या गटाचे प्रतिनिधित्व फार कमी आहे (34 आमदारांपैकी 8, आणि शून्य खासदार).

महाराष्ट्रात अंदाजे 1.7 कोटी लोकसंख्यमध्ये अंदाजे 80 लाख महार आणि 60 लाख मातंग आहेत असे म्हटले जाते. मातंग जातसमूहाकडून उपवर्गीकरणाचा मुद्दा सतत उचलला गेला आहे, आणि 13 टक्के पैकी 7 टक्के आरक्षणाची मागणी केली आहे. अनेक मातंग नेत्यांच्या मते आरक्षणाचा "फायदा" मुख्यत्वे महार/ नवबौद्ध समुहाने घेतला आहे. एक असेही मत प्रचलित आहे की महाराष्ट्रातील एस.सी. मध्ये येणाऱ्या 59 जातीपैकी महार, ढोर, चर्मकार या जातींमधील व्यक्तिंनाच आरक्षणाचा लाभ मिळाला आहे. निश्चितपणे याबद्दल विविध मते आहेत आणि ठोस आकडेवारी उपलब्ध नाही. गेल्या अनेक वर्षांमध्ये मातंग जातसमूहाकडून आरक्षणाकरिता आंदोलने झाली आहेत. यालाच पुढे नेते भाजप-शिवसेनेच्या शिंदे-फडणवीस सरकारने डिसेंबर 2023 मध्ये उपवर्गीकरणाच्या शिफारशींकरिता एक समिती नेमली आहे.

हरियाणामध्ये 2020 मध्येच हरियाणा शेड्युल्ड कास्ट्स(रिझर्वेशन इन ॲडमिशन इन गव्हर्मेंट एज्युकेशनल इंस्टिट्युशन्स) कायद्याद्वारे सरकारी व सरकारी अनुदानित उच्च शिक्षण संस्थामध्ये एस.सी.च्या 20 टक्के आरक्षणात दोन गट केले गेले होते, आणि त्यातील 50 टक्के जागा(म्हणजे एकूण 10 टक्के जागा) वंचित एस.सी. या नवीन उपवर्गाकरिता राखीव केल्या गेल्या होत्या. या कायद्यालाही सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने आता मान्यता मिळाली आहे. या अगोदर 1994 मध्ये हरियाणामध्ये सरकारने दोन उपवर्ग केले होते, ज्यात उपवर्ग ब मध्ये चमार, जातीय जमार, रहगर, रायगर, रामदासिया, रविदासिया जाती होत्या, तर इतर 36 जाती उपवर्ग अ मध्ये होत्या, आणि आरक्षणात उपवर्ग अ ला प्राधान्य दिले गेले होते. परंतु 2006 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय घटनाबाह्य ठरवला होता. हरियाणा सरकारने या संदर्भात प्रस्तुत केलेल्या माहितीत दाखवले आहे की 11 टक्के लोकसंख्या असलेल्या 36 जातींच्या उपसमुहातील व्यक्तींना हरियाणातील सरकारी नोकऱ्यांमध्ये 4 ते 6 टक्क्यांच्या आसपास प्रतिनिधित्त्व आहे. 2011 च्या सोशओ इकॉनॉमिक कास्ट सेन्सस (एस.ई.सी.सी.) नुसार या उपवर्गातील जातीमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण सुद्धा 4 टक्क्यापेक्षा कमी असल्याचे दिसून आले आहे. हरियाणा सरकारने भविष्यात क्रिमी लेयरचे तत्त्व लागू करण्याचे सुद्धा सुतोवाच केले आहे.

केंद्रिय स्तरावर पाहिले तर मनमोहन सिंहांच्या युपीए-1 सरकारने 2007 साली जस्टीस उशा मेहता आयोग नेमला. या आयोगाने उपवर्गीकरणाची शिफारस केली, आणि त्याकरिता संविधानात दुरुस्ती सुचवली. परंतु काँग्रेसने यावर कारवाई केली नाही. भाजपने 2014 मध्ये उपवर्गीकरणाचे आश्वासन दिले होते, परंतु अंमलबजावणी केली नाही.

इतरही राज्यांमध्ये अशाचप्रकारचे भेद अस्तित्वात आहेत. या विषयावरील चर्चेचा रोख सध्यातरी एस.सी. आरक्षणाच्या संदर्भातच जास्त आहे, परंतु एस.टी.संदर्भातील वाद सुद्धा उपस्थित झाला तर त्यात आश्चर्य वाटायला नको. असेही म्हटले जात आहे की एस.सी., एस.टी. मध्ये सामाजिक-शैक्षणिक फरक आहेत याकरिता पुरेशी माहिती उपलब्धच नाही, परंतु उपलब्ध असलेली मर्यादित माहितीसुद्धा स्पष्टपणे दाखवत आहे की असे फरक अस्तित्वात आहेत.

### पक्षांच्या स्तरावरील मतभेद

केंद्रातील सत्ताधारी एन.डी.ए. च्या घटक पक्षांमधे सुद्धा या मुद्यावर एकमत नाही. लोक जनशक्ती पक्षाने या निर्णयाला विरोध दर्शवला आहे, तर तेलुगू देशम पक्षाने समर्थन दिले आहे. बिहारमध्ये निर्णयाविरोधात आंदोलने होत आहेत आणि भीम आर्मी, दलित सेना, आरक्षण बचाओ संघर्ष समिती, इत्यादी संघटनांनी मिळून रेल रोको केले आहेत; तर दुसरीकडे केंद्रात मंत्री असलेले हिंदुस्तान अवाम मोर्चाचे जीतन राम मांझी यांनी निर्णयाचे समर्थन करत अंमलबजावणीची मागणी केली आहे. त्यांच्या शब्दात "76 वर्षे चारच जातींनी आरक्षणाचा फायदा घेतला आहे, आणि भूईया, डोम, मेहतर, मुसहर सारख्या जाती मागासच राहील्या आहेत." बिहारमध्ये पासवान आणि उत्तरप्रदेशात जाटव जातींनी आरक्षणाचा जास्त फायदा घेतला असे एक प्रचलित मत आहे. आजाद समाज पक्ष, राष्ट्रीय जनता दलाने सुद्धा उपवर्गीकरणाला विरोध केला आहे. कर्नाटकात आणि तेलंगणात निर्णयाचे समर्थन केलेले असले, तरीही देशस्तरावर काँग्रेसने कोणतीही ठोस भुमिका घेतलेली नाही. बहुजन समाज पक्षाने निर्णयाला विरोध दर्शवला आहे.

एकंदरीत पाहता काही बाबतीत आपापल्या जातीय मतपेढ्यांचे राजकारण, आणि काही बाबतीत इतर जातसमूहांना जास्त नाराज न करण्याचे धोरण, या दोन्ही शक्यता लक्षात ठेवून बहुसंख्य भांडवली पक्ष सावध वा आक्रमक प्रतिक्रिया देत आहेत.

### अस्मितावादी प्रतिक्रियांपासून सावधान

निकालानंतर यावर विविध जातसमूह, अस्मितावादी संघटना, राजकीय पक्ष यांकडून विविध मते व्यक्त करण्यात येत आहेत. या निर्णयाचे स्वागत करण्यापासून ते हा निर्णय सपशेल चुकीचा आहे या मतापर्यंत अनेक मते व्यक्त केली जात आहेत. या मतांमध्ये येणारे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत: या मुद्यामुळे दलित जातींमध्ये दुफळी निर्माण होईल आणि आपसातील 'एकता' भंग पावेल, आर.एस. एस.च्या पथ्यावर पडणारा हा निर्णय आहे कारण त्यांना दलितांची एकता नकोशी झाली होती, आंबेडकर वा आंबेडकरवादाच्या विरोधात असलेल्या काही जातसमूहांना आर.एस.एस. आता अधिक जवळ करेल आणि दलितांमध्ये फूट पाडेल, एस.टी. उपवर्गीकरणाचा मुद्दा उभा करून ख्रिश्चन आदिवासींच्या विरोधात इतर आदिवासींना उभे करण्याचे काम आता आर.एस.एस.ला सोपे जाईल, इंद्रा साहनी खटल्यात नाकारले गेलेले क्रिमी लेयरचे तत्त्व एस.सी. व एस.टी. ला लागू होऊ शकत नाही आणि त्यावर मान्यता देणारे भाष्य करून सर्वोच्च न्यायालयाने मर्यादा ओलांडली आहे, जातनिहाय जनगणना केल्याशिवाय उपवर्गीकरण शक्य नाही व त्यामुळे ती तातडीने झालीच पाहिजे, जातनिहाय जनगणना होईपर्यंत राज्य सरकारांनी आयोगांमार्फत जनसंख्येचे अंदाज घ्यावेत व त्या आधार उपवर्गीकरण करावे, या निर्णयामुळे छोटे-छोटे उपगट निर्माण होतील आणि "लायक उमेदवार न मिळाल्याचे" कारण अजून जोराने सांगत जागा भरल्याच जाणार नाहीत आणि आरक्षण संपण्याकडे जाईल, जर आजवर आरक्षणाची अंमलबजावणीच अपुरी झाली आहे आणि मोठ्या प्रमाणात राखीव जागा भरल्याच गेल्या नाहीत तर उपवर्गीकरणाची घाई कशाला, अस्पृश्यतेच्या आधारावर एस.सी., एस.टी. आरक्षण आहे आणि त्यामुळे त्यात उपवर्गीकरणाला जागा नाही, सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचे तत्त्व एस.सी. व एस.टी. ना लागूच होत नाही त्यामुळे हा निर्णय चुकीचा आहे, उच्च पदावर गेले तरीही जातीय भेदभावाचा सामना करावाच लागतो त्यामुळे क्रिमी लेयरचे आणि उपवर्गीकरणाचे तत्त्व चुकीचेच आहे, काही जातींना जास्त फायदा झाला असला तरी त्या जातींमध्ये सुद्धा उच्चजातीयांच्या तुलनेत प्रचंड असमान विकास आहे व म्हणून उपवर्गीकरण नको, हा निर्णय 6 ब्राह्मण व 1 एस.सी. न्यायाधीश असलेल्या खंडपीठाने दिलेला असल्यामुळे त्या निर्णयात ब्राह्मणवाद आहे, उपवर्गीकरण नको तर मागे पडलेल्या जातसमूहांना अधिक सवलती, फ्रीशीप, कोचिंग, इ. द्यावे, वगैरे. या विविध मतांपैकी अनेकांमध्ये काही प्रमाणात तथ्य आहे, आणि काही सपशेल

पान 5 वर

# नवनव्या आरक्षणाची नव्हे, तर सर्वांना अधिकाराची मागणी करा!

पान 4 वरून

चुकीची (जो या लेखाचा मुख्य विषय नाही), परंतु अस्मितेच्या आधारावर देण्यात आलेल्या सर्व प्रतिक्रियांमागे गायब आहे ती या प्रश्नाला जन्म देणाऱ्या आर्थिक संरचनेच्या गतिकीची आणि त्यामुळेच योग्य मागण्यांची समजदारी.

### भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेला प्रश्न, ज्याला भिजत ठेवण्यातच तिला रस आहे

स्वातंत्र्यापासूनच देशातील सत्ताधारी भांडवलदार वर्गापुढे हा प्रश्न नेहमीच होता की जन्माधारित व्यवसाय ठरवणाऱ्या एका सामंती व्यवस्थेकडून मालक निवडण्याचे स्वातंत्र्य असलेल्या कामगार-भांडवलदार नात्यावर आधारित भांडवली समाजाकडे होणाऱ्या संक्रमणात, बाजाराच्या होऊ घातलेल्या विकासात, एकीकडे जातींमधील उचनीच, विटाळ, भेदभाव आडवे येऊ नयेत आणि दुसरीकडे कार्यक्षम कामगार उपलब्ध होऊन भांडवली उत्पादन निर्मितीची प्रक्रिया पुढे जात रहावी. भांडवली व्यवस्थेच्या नियमानुसार "पुढे" जाण्याची (म्हणजेच मालमत्ताधारक भांडवलदार वर्गाचा भाग बनण्याची, भांडवल संचय करण्याची, किंवा सरकारी नोकऱ्या, उच्च पदे, उच्च शिक्षण, इत्यादींद्वारे भौतिकदृष्ट्या जास्त संपन्न जीवनाची) संधी एका अल्पसंख्येलाच मिळू शकते, कारण मुळातच भांडवलशाही ही स्पर्धेवर आणि कामगारांच्या शोषणावर टिकलेली व्यवस्था आहे, आणि ती अत्यल्प संधीच निर्माण करते. इथे भांडवलदार मालक वर्गातही बाजारपेठेसाठी, कच्च्या मालाच्या स्त्रोतांवर कब्जासाठी स्पर्धा आहे, आणि दुसरीकडे याच व्यवस्थेने निर्माण केलेल्या बेरोजगारांमध्ये उपलब्ध असलेल्या अत्यल्प संधींसाठी सुद्धा स्पर्धा आहे. ऐतिहासिकरित्या उच्च जातींकडेच उत्पादन साधनांची मालकी मोठ्या प्रमाणात केंद्रित असल्यामुळे त्यातून उपलब्ध होणारा ज्ञान साधनांचा, सामाजिक संपर्कांचा, वैश्विक जगाशी परिचयाचा, संधींच्या माहितीचा, ज्ञानसाधनेच्या संस्कृतीचा, जास्त वारसा असणे स्वाभाविक होते. अशामध्ये स्पर्धेचे जग जरी अवतरलेले असले, तरी त्यामध्ये (काही तथाकथित कनिष्ट जातीतील व्यक्ती परिस्थितीवर मात करून पुढे आल्या तरी) सांख्यिकीदृष्ट्या वस्तुगतरित्या उच्चजातीयच जास्त पुढे राहणार हे सुद्धा स्पष्ट होते. यामुळे वाढणारा असंतोष कमी करण्याकरिता, आणि त्यासोबतच भांडवली व्यवस्थेचा विकासही होत रहावा याची हमी देण्याकरिता आपसातील अनेक असहमती, वादविवाद, अंतर्गत संघर्ष आणि चढउतारांनंतर सत्ताधारी भांडवलदार वर्गाला पटलेला उपाय होता: सामाजिक-शैक्षणिक-राजकीय आरक्षण, आणि अस्पृश्यतेचे निर्मूलन. अर्थातच हा उपाय सुद्धा तारेवरचीच कसरत असणार होता.

अस्पृश्यतेचे (जातिव्यवस्थेचे नव्हे) निर्मूलन ही निश्चितपणे भांडवली विकासाची वस्तुगत पूर्वअट होती कारण विटाळाच्या कल्पनेला धरून ना कारखान्यांमध्ये उत्पादन शक्य होते ना बाजारात खरेदी-विक्रीचे स्वातंत्र्य आणि त्यामुळेच ना भांडवली बाजाराचा विकास. भांडवली विकासाच्या या गरजेनेच सर्व प्रमुख भांडवली पक्षामध्ये (जरी त्यांचे नेतृत्व ब्राह्मणवादी होते!) सुद्धा स्वातंत्र्यावेळी या मुद्यावर बऱ्यापैकी एकमत होते. राज्यघटनेमध्ये अस्पृश्यता (जातीव्यवस्था नव्हे) नष्ट करणारे कलम याचीच साक्ष होते. त्यामुळेच आजही विविध रूपांनी जातीय भेदभाव चालत असला, वैयक्तिक स्तरावर विविध प्रकारचे विटाळ चालत असले, तरी देशातील भांडवलशाहीच्या, बाजाराच्या अर्थव्यवस्थेच्या क्रमिक विकासाने विटाळ आणि अस्पृश्यतेला सार्वजनिक जीवनातून पूर्णत: नसले तरी बऱ्यापैकी संपवण्याकडे नेले आहे. एस.सी., एस.टी. प्रवर्गात उपवर्गीकरण करताना त्यामुळेच आता अस्पृश्यतेच्या आधारावर केलेले वर्गीकरण नाही तर असमान विकासाच्या आधारावरचे वर्गीकरण ही कल्पना समोर आली आहे. भांडवलशाहीमुळे एस.सी., एस.टी. प्रवर्गांचे झालेले वाढीव वर्गीय विभेदीकरण हे यामागील मूळ कारण आहे. नोव्हेंबरच्या 2023 च्या कामगार बिगुलच्या अंकात मांडल्याप्रमाणे **ओबीसींमध्ये सुद्धा उपवर्गीकरण करत 4 हिश्श्यांमध्ये आरक्षणाची वाटणी करण्याकरिता रोहिणी आयोगाचे बनणे** हे ओबीसी जातसमूहांमध्ये झालेल्या वर्गीय विभेदीकरणाचा परिणाम आहे. बिहारमध्ये महादलित प्रवर्गाचे बनणे सुद्धा याच असमान विकासाची अभिव्यक्ती होते.

भांडवलशाही नेहमीच असमान विकास करते. समाजातील प्रस्थापित असमानता दूर करणे हे भांडवलशाहीचे लक्ष्य नाहीच. भांडवल संचय वाढत जावा, आणि त्याकरिता स्वस्तात जास्त तास कार्यक्षम श्रम होत रहावे हीच तिची मूळ गरज असते. परंतु असमान विकासातून वाढणाऱ्या असंतोषाला मर्यादित करणे ही तिची राजकीय गरज असते. **भांडवली विकासाची असमानता वाढत्या वर्गीय दरीमुळेच पूर्वापारपणे चालत आलेल्या प्रांत, लिंग, जात अशा सामाजिक विभागण्यांमध्ये सुद्धा अभिव्यक्त होते. यातून निर्माण होणाऱ्या असंतोषाने वर्गीय रूप घेऊ नये म्हणून सतत सामाजिक विभागण्यांवर जोर देत राजकीय चर्चाविश्व नियंत्रित ठेवणे ही भांडवलदारांच्या पक्षांची गरज आहे.** त्यामुळेच ऐतिहासिकरित्या पाहता सुरुवातीला एस.सी, एस.टी. करिता असलेल्या आरक्षणाच्या तरतुदीला ओबीसींकरिता वाढवणे, नंतर पुढे येत गेलेली प्रांतांमध्ये "भुमिपुत्रांना" आरक्षणाची मागणी, महिला आरक्षणाची मागणी, विविध जातसमूहांची मागास प्रवर्गांमध्ये मोजले जाण्याची मागणी, खाजगी क्षेत्रात आरक्षणाची मागणी आणि आता एस.सी., एस.टी. आरक्षणात उपवर्गीकरणाचा मुद्दा, असे मुद्दे राजकारणाकरिता अत्यंत गरजेचे बनतात. हे सर्व मुद्दे एकाचवेळी जनतेमध्ये असलेल्या सामाजिक भेदांना तिच्यात फूट पाडण्याचे हत्यार बनतात, आणि या प्रश्नांना जन्म देणाऱ्या भांडवली व्यवस्थेच्या शोषणकारी, विषमतावादी, संधीविहीन खऱ्या चरित्राला झाकण्याचेही काम करतात.

**देशात सर्वत्र व्याप्त ब्राह्मणवादी-जातीयवादी विचारधारेच्या परिणामी दिलेल्या आरक्षणाची सुद्धा कधीच पुरेशी अंमलबजावणी झाली नाही,** आणि देशभरात असंख्य आरक्षित जागा आजही रिक्त आहेत. परंतु वाद जो निर्माण झालेला आहे, तो भरल्या गेलेल्या जागांमुळे आणि त्यात दिसून येणाऱ्या विषमतेमुळे झाला आहे हे ध्यानात घ्यावे.

आरक्षणाच्या व्याख्येसंदर्भात एक महत्त्वाची गोष्ट समजली पाहिजे ती ही की **आरक्षण जरी जातीच्या वा प्रवर्गाच्या नावाने दिले जात असले, ते जरी "जात" या संकल्पनेभोवती आधारित असले, तरी ते फायदा मात्र एखाद्या व्यक्तीला, किंवा फारतर त्या व्यक्तीच्या कुटुंबाला पोहोचवते** आणि हा फायदा आर्थिक असतो. आरक्षणामुळे जातीअंत होईल हा दावा जवळपास कोणीच करत नाही. आरक्षण ही गरिबी हटावची योजना नसून प्रतिनिधित्वाची योजना आहे, असे आरक्षणाच्या अस्मितावादी समर्थकांकडून नेहमीच मांडले जाते. हा दावा खराच आहे, तरीही या दाव्याचा भांडवली जगात कामगार-कष्टकऱ्यांसाठी हाच अर्थ आहे की अत्यल्प व्यक्तिंना, हजारोंपैकी एखाद्याला, संधी मिळेल आणि बहुसंख्यांना संधी नाकारली जाईल. आरक्षणामुळे "जातीचा" विकास होतो ही एक कपोलकल्पना आहे. आज आरक्षणाचा "लाभ" मिळालेल्या जातसमूहामध्ये सुद्धा प्रचंड वर्गीय स्तरीकरण आहे, आणि त्यामुळेच उपवर्गीकरणाचा प्रश्न निर्माण होत आहे. आरक्षणाच्या धोरणामुळेच आज अनेक दलित, ओबीसी जातसमुहामधून मध्यम, उच्च-मध्यम आणि उच्च वर्गही जन्माला आला आहे, आणि हे **वाढते वर्गविभाजनच आरक्षणातून साध्य होत राहील.**

या पार्श्वभूमीवर आपण सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाला पाहिले पाहिजे. निश्चितपणे भांडवलशाहीच्या असमान विकासाच्या नियमामुळे, ज्या नियमांच्या चौकटीतच जातीय भेदभाव आज काम करत आहेत, विविध जातींमधील काही व्यक्तिंचा असमान विकास झाला आहे. या असमान विकासाकडे आज सर्वजण पाहतात, परंतु त्याच्या मुळाशी असलेल्या भांडवली व्यवस्थेत जे स्वत:चे हित पाहतात, किंवा जे अजाणतेपणे या वास्तवाला समजू शकत नाहीत ते विविध जातीय, धार्मिक, प्रांतिक, लिंगविषयक अस्मितांचा आसरा घेऊन, आपापल्या अस्मितेच्या जनतेला राजकीय शक्तीचे साधन बनवून अत्यल्प व्यक्तींना संधी देणाऱ्या आरक्षणाच्या नवनव्या मागण्या घेऊन उभे राहतात.

या निकालाच्या परिणामी भविष्याबद्दल व्यक्त होणाऱ्या काही चिंता निश्चितपणे खऱ्या आहेत. उपवर्गीकरण आणि त्यातील आरक्षणाची टक्केवारी यावरून दलित जातींमध्ये आपसात संघर्ष वाढणार आहे हे निश्चित. खरेतर तो लगेचच दिसूही लागला आहे. याचा फायदा निश्चितपणे हिंदुत्ववादी, आणि इतर अस्मितावादी आंदोलने घेणार, आणि निवडणुकीत मतांची बेगमी करण्याकरिता जातींमध्ये अजून संघर्ष वाढवणार. तथाकथित आंबेडकरवादी जातसमूहांच्या विरोधात आणि भाजप समर्थक जातसमूहांच्या बाजूने उपवर्गीकरण आहे या म्हणण्यात फार अर्थ यामुळे नाही की जवळपास सर्व आंबेडकरवादी जातसमूहांचे नेते स्वत:हूनच भाजपच्या बाजूला जाऊन बसले आहेत. काँग्रेस सारखे पक्ष तर आता स्वत:च जातनिहाय जनगणना आणि "जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागिदारी" सारखे उपवर्गीकरण समर्थक नारे देत आहेत आणि ते सुद्धा या मुद्यावरून जातीय अस्मितेचे राजकारण वाढवणार आहेत. समाजात कोणताही निकराचा संघर्ष आणि मूलगामी परिवर्तनाच्या विरोधात असलेले आर.एस.एस. सुद्धा या मुद्यावर पुनर्विचार करायला तयार आहे, आणि हिंदु धर्मातील तथाकथित एकतेच्या नाऱ्याखाली जात आधारित जनगणनेसाठी सुद्धा पुनर्विचाराची तयारी दाखवत आहे.

एस.सी. प्रवर्गातही ऐतिहासिकरित्या जमिन मालकी, व्यवसाय आणि उत्पादन साधनांपर्यंत पोहोच, जास्त लोकसंख्या, ऐतिहासिकरित्या मिळालेल्या संधी, आकस्मिक कारणे, सत्ताधारी वर्गासोबत असलेले नाते, आपसात अस्पृश्यतेचे पालन, एकंदरीत ज्ञानसाधने आणि शिक्षित जनसमुदायापर्यंत असलेली आणि बदलत गेलेली पोहोच, शहरापर्यंत असलेली पोहोच, जाणीव-जागृती, अशा अनेक कारणांमुळे भेद अस्तित्वात होते आणि निर्माणही होत गेले. जातीय मानसिकतेमुळे संधींमध्ये निवड करताना इतर जातींना सापत्न वागणूक सर्वच जाती करत आल्यात. भांडवली स्पर्धेच्या युगात त्यामुळेच विविध जातींमध्ये असमान विकास होणारच होता. त्यामुळेच हे विसरून चालणारच नाही की उपवर्गीकरण झाले तरीही असमान विकास, विषमता निर्माण होतच राहणार आहे, आणि जोपर्यंत जातीय अस्मितांचे राजकारण तग धरून आहे आरक्षणाच्या वाटण्यांचे वादही उपस्थित होत राहणार आहेत. आनंद तेलतुंबडेंसारखे विद्वान यावर हा उपाय सुचवत आहेत की जे.एन.यू. मध्ये प्रवेशाकरिता ज्याप्रकारे विविध सामाजिक-आर्थिक निकषांच्या आधारावर मागासलेपणाचे गुण दिले जातात आणि त्यानंतर मेरिटची तुलना होते, तशी काही व्यवस्था लागू करावी. निश्चितपणे अशी व्यवस्था आरक्षणाच्या चौकटीत जास्त तार्किकपणे काम करेल, परंतु भांडवली स्पर्धेला आणि त्यातून निर्माण होणाऱ्या असमान विकासाला याने काही फरक पडत नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने अतिमागास जातीतील अत्यल्प व्यक्तिंना संधी उपलब्ध होतील, परंतु त्याचवेळी या निकालाने अस्मितावादी राजकारणाला खतपाणी घालण्याचे, येत्या प्रदीर्घ काळात जातीय संघर्ष आणि तणाव वाढवण्याचे, संघ-भाजप सारख्या धर्मवादी फॅशिस्ट शक्तींचे राजकारण मजबूत करण्याचे, राजकारणाचे चर्चाविश्व संकुचित ठेवण्याचे, आणि त्यामुळे देशातील तीन चतुर्थांश हिस्सा असलेल्या सर्वजातीय-धर्मीय जनतेच्या खऱ्या मागण्यांना, म्हणजे सार्वत्रिक मोफत समाज दर्जाचे शिक्षण आणि रोजगाराचा अधिकार, झाकोळण्याचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. प्रचंड खाजगीकरण, कंत्राटीकरण, जुजबीकरण झालेल्या अर्थव्यवस्थेत उपलब्ध असलेल्या वैयक्तिक विकासाच्या अत्यल्प संधींमध्ये आरक्षणाची लढाई ही, आम्ही अगोदरही म्हटल्याप्रमाणे, अस्तित्वात नसलेल्या भाकरीच्या तुकड्यातील वाट्याची लढाई बनली आहे, आणि सत्ताधारी भांडवलदार वर्गाला ही लढाई चालू ठेवण्यात त्याचे वर्गहित दिसत आहे. हे सुद्धा होण्याची मोठी शक्यता आहे की उपवर्गीकरण करत असताना, ज्या जातीतील व्यक्तिंना कमी संधी मिळाल्या त्यापैकी संख्येने जास्त असलेल्या जातसमूहांचे राजकीय महत्त्व बघता त्यांना झुकते माप दिले जाईल आणि छोट्या जातसमुहांना कमी किंवा शून्य महत्त्व दिले जाईल. यातून सुद्धा अस्मितेचे राजकारण

पान 6 वर

# घोटाळेच घोटाळे ! केंद्रात आणि राज्यात भ्रष्टाचाराचा महापूर !



पान 1 वरून

शक्यता होती परंतु पोलीस प्रशासनाने अधिक माहिती लोकनिदर्शनास येऊ दिली नाही. येथील जवळपास सर्वच कोचिंग सेंटर असेच चालतात आणि जास्त भ्रष्टाचारी कोण याबद्दल आप व भाजपमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 19 जून 2022 रोजी उद्घाटन केलेल्या प्रगती मैदानातील बोगद्यामध्ये काही दिवसानंतर सतत पाणी गळती होत असल्याचे आढळून आले आहे. बोगद्याच्या भिंती खराब होत आहेत आणि सध्या त्याला बंद करण्यात आले आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत 777 कोटी रुपये होती. मोदी सरकार द्वारे गेल्या वर्षी जी-ट्वेंटी साठी प्रगती मैदानाचे नाव बदलून भारत मंडपम ठेवण्यात आले होते, आणि त्यातही जोरदार पावसानंतर पाणी साचले होते. जी-ट्वेंटी च्या प्रचारासाठी मोठ्या प्रमाणात पैसा वाया घालवण्यात आला होता, त्यातील 2,700 कोटी रुपये या मंडपाच्या बांधकामावर खर्च करण्यात आले होते, ज्याचं उद्घाटनही मोदींनीच केले होते.

ज्याला भारतातील सर्वात लांब सागरी पूल म्हटले जात होते, त्या अटल सेतूच्या मार्गावर उद्घाटनाच्या सहा महिन्यांच्या आतच भेगा पडल्या आहेत. नरेंद्र मोदींनी या वर्षी 12 जानेवारी रोजी सी लिंक-अटल बिहारी वाजपेयी सेव्हरी-न्हावा शेवा अटल सेतू चे उद्घाटन केले होते. 17,843 कोटी रुपयांच्या खर्चाने बनवलेल्या 21.8 किलोमीटर लांब या पुलाला मुंबई महानगर क्षेत्रासाठी एक "गेम चेंजर" आणि अभियांत्रिकीतील एक महत्वपूर्ण उपलब्धता म्हणून प्रचार केला गेला होता.

सर्वात वाईट परिस्थिती मोदींचे "सदाबहार" मित्र नितीश कुमारांच्या बिहारची आहे. नितीश कुमार यांच्या "सुशासन" असलेल्या राज्याने देशभरातील बांधकामांच्या पोकळ दाव्यांना उघडीस करण्यात आघाडी घेतली आहे. आपण पहिले की 17 दिवसात बिहार च्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये 12 पुल पडल्याच्या घटना घडल्या होत्या. तेथे अतिवृष्टीनंतर भ्रष्टाचारातून बनलेले हे पुल सतत कोसळत आहेत. जुन्या पुलांची दुरुस्ती न झाल्यामुळे आणि नद्यांमध्ये पाण्याचा प्रवाह वेगवान झाल्यामुळे माती खचत आहे आणि हे फक्त अलीकडेच घडलेले नाही; राज्यात यापूर्वीही असे अनेकदा पुल कोसळले आहेत. गेल्या वर्षी भागलपुरमध्ये बांधकाम सुरू असताना एकच पूल दोन वेळा कोसळला, एकदा एप्रिल 2022 मध्ये आणि पुन्हा जून 2023 मध्ये. या पुलासाठी 1700 कोटी रुपये खर्च झाले होते. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकदा पूल कोसळल्यानंतर त्याच कंपनीला पुन्हा कंत्राट देण्यात आले. नियमानुसार 2019 मध्येच या पुलाचे बांधकाम पूर्ण व्हायला हवे होते, पण 3 वर्ष उशिरा झालेले काम सरळ कोसळून गेले. या कंपनीचे नाव सिंगला कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड आहे. ही तीच कंपनी आहे जिने 10 मे 2019 रोजी 75 लाख रुपयांचे इलेक्टोरल बॉण्ड खरेदी केले होते. स्पष्ट आहे की इथेही 'चंदा दो आणि धंदा लो' या फॉर्म्युल्याचा वापर करण्यात आला होता.

ही फक्त काही उदाहरणे होती, परंतु सध्या संपूर्ण देशाची हीच परिस्थिती आहे. सरकारची चाटुकार मीडिया सरकारचा पूर्णपणे बचाव करण्यात गुंतलेली दिसते. मोदी सरकारने वायदे केले होते की देशाला "मजबूत बनवले जाईल," पण देश नाही तर देशातील मोठे भांडवलदार आणि कंपन्या मजबूत होताना आपण पाहत आहोत, ज्यांनी मोदी सरकारला कोट्यवधी रुपयांच्या देणग्या दिल्या आणि बदल्यात मोदींनी त्यांना नफा कमवण्यासाठी व्यवसाय दिला. हे स्पष्टपणे दाखवते की मोदी सरकारच्या राजवटीत भ्रष्टाचार शिगेला पोहोचला आहे. जनतेची कष्टाची कमाई भ्रष्ट मंत्री-ठेकेदार-अधिकारी यांच्या युतीच्या खिशात चालली आहे.

गेल्या वर्षी आलेल्या कॅगच्या अहवालात रस्ते आणि परिवहन मंत्रालयाच्या घोटाळ्याचा उल्लेख आहे. द्वारका एक्सप्रेसवेच्या एका किलोमीटर रस्ता बांधणीसाठी 18 कोटींची रक्कम मंजूर करण्यात आले होते, पण तिथे एक किलोमीटर रस्ता बनवण्यासाठी सुमारे 250 कोटी रुपये खर्च केले गेले आहेत! यात अंदाजित रकमेपेक्षा 14 पट जास्त रक्कम खर्च करण्यात आली आहे. फक्त द्वारका एक्सप्रेसवेच नाही, तर भारत सरकारच्या रस्ते आणि परिवहन विभागाच्या भारतमाला प्रकल्पातील इतर प्रकल्पांमध्येही मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार आढळले आहेत. कॅगच्या मते भारतमाला प्रकल्पात मंजूर केलेल्या रकमेपेक्षा सुमारे 58 टक्के जास्त रक्कम खर्च करण्यात आली आहे. प्रकल्प महाग करूनही काम वेळेत पूर्ण झालेले नाही. हा फक्त आर्थिक गैरव्यवहारांचा मुद्दा नाही तर त्यात इतर अनेक प्रकारच्या गडबडी आहेत. त्यात अशा बोली लावणाऱ्यांना काम देण्यात आले ज्यांच्याकडे योग्य कागदपत्रे देखील नव्हती. म्हणजेच बनावट कागदपत्रांच्या आधारे बोली लावणाऱ्यांची निवड झाल्याचे प्रकरण देखील समोर आले आहे.

महागाई, बेरोजगारी आणि भुकेने त्रस्त असलेल्या सामान्य जनतेला मोदी सरकार सांगते की, विकासासाठी काही काळ आपले अधिकार विसरून फक्त कर्तव्याचीच गोष्ट करावी! संघ परिवार आणि भाजपा आपल्याला "संस्कार", "संस्कृती", "राष्ट्रवाद" आणि "देशभक्ती"चे धडे देतात आणि सांगतात की "रामराज्य" आणण्यासाठी आपले पोट कापून त्याग करावा! आपल्याला "संतोषम परम सुखम" हा उपदेश दिला जातो! दुसरीकडे, अडाणी-अंबानी, मोठ्या कंपन्या, बिल्डर, ठेकेदार आणि भाजपा नेते-मंत्री यांच्या तिजोऱ्या आणि पोट ठासून भरून घ्यायला भ्रष्टाचार करण्याची पूर्ण संधी दिली जाते. अशा परिस्थितीत, ज्या विकासाचा जयघोष भाजप आणि संघ परिवार नेहमी करतात, त्याचे पितळ पावसाच्या एका सरीने उघड पाडले आहे आणि ही फक्त याच वर्षाची गोष्ट नाही.

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, आपल्याकडून वसूल केलेल्या करांचे पैसे सरकार सार्वजनिक क्षेत्रातील कामांमध्ये वापरते. या कामांची कंत्राटे खासगी ठेकेदार आणि कंपन्यांना दिली जातात आणि ज्या कंपन्या सरकारला अधिक देणग्या देतात त्या कंपन्यांना ही कंत्राटे दिली जातात. तुम्हाला मागील वर्षी उत्तराखंडमध्ये बोगदा कोसळल्याची घटना आठवत असेल ज्यात 41 कामगार 17 दिवस अडकले होते, त्या बोगद्याचे बांधकाम करणाऱ्या नवयुग इंजिनीअरिंग कंपनीने भाजपाला 55 कोटी रुपयांची देणगी दिली होती. यापूर्वीही ही कंपनी भूसंपादन आणि प्रकल्प पूर्ण करण्याच्या वादात अडकली होती, मात्र भाजपने त्यांना कंत्राट देऊन आपले कर्तव्य पार पाडले. अशा स्थितीत सरकारने देऊ केलेल्या सर्व निविदांमध्ये भ्रष्टाचार दिसून आल्याने नवल नाही.

निवडणूक जिंकण्यासाठी मोदी सरकारने सर्व पूल आणि इमारतींना घाईघाईत बनवून त्यांचे उद्घाटन केले, जसे की राम मंदिर. यामुळेच अनेक बांधकाम कामे मुळातच फार कमजोर असतात. या भ्रष्टाचाराचे परिणाम कामगार-कष्टकरी जनतेला भोगावे लागतात. एकीकडे यात कंत्राटी पद्धतीला प्रोत्साहन दिले जाते ज्यात कामगारांसाठी कसलेही श्रम कायदे लागू होऊ नाहीत आणि अपरंपार शोषण करून मालक-ठेकेदार गब्बर होतात; तर दुसरीकडे, अशा प्रकारच्या कामांमुळे जेव्हा अपघातात होतात तेव्हा मरणारे कामगार-कष्टकरी लोकच असतात. म्हणजेच, आपण टॅक्स भरतो, आपण बांधकाम करतो आणि आपणच मरण पावतो, आणि नेते, भांडवलदार आणि ठेकेदार मजा करतात.

"बहुत हुआ भ्रष्टाचार, अब की बार मोदी सरकार" असे म्हणत 10 वर्षापूर्वी सत्तेत आलेल्या मोदी सरकारने आणि त्याच्या मित्रपक्षांनी अगोदरच्या कॉंग्रेस सरकारांचे भ्रष्टाचाराचे सर्व विक्रम फार लवकर मोडीत काढले आहेत. भ्रष्टाचार संपण्यासाठी गरज आहे आपण कामकरी जनतेने मिळून या पक्षांचे भांडवली राजकारण, नफ्याची व्यवस्था, मोडीत काढण्याची आणि आपल्या कामगार वर्गीय राजकारणाच्या निर्मितीची.

# नवनव्या आरक्षणाची नव्हे, तर सर्वांना अधिकाराची मागणी करा!

पान 5 वरून

सतत तापते ठेवण्याची स्थिती निर्माण होईल.

असेही तर्क सतत दिले जातात की आर्थिक गतिमानतेमुळे सामाजिक समानता स्वत:हून येत नाही. जसे की दलित राष्ट्रपतीविरोधातही भेदभाव केला जातो. हे तथ्य खरेच आहे; परंतु या तर्कातच हे सुद्धा दडलेले आहे की आरक्षण ही एक अत्यंत मर्यादित तरतूद आहे. हे सत्य आहे की आजही विविध मार्गांनी विटाळाची कल्पना, विशेषत: खाजगी जीवनाच्या क्षेत्रात, दिसून येते; परंतु एस.सी., एस.टी. संदर्भात क्रिमी लेयर लागू होऊ शकतो की नाही, या वादामागे सुद्धा हेच वर्गवास्तव आहे की या प्रवर्गांमध्ये सुद्धा विविध आर्थिक वर्ग निर्माण झाले आहेत ज्यांना पोहोचणारी अस्पृश्यतेची झळ चढत्या वर्गस्तरानुसार सुद्धा उतरत्या प्रकारची आहे आणि स्पर्श-विटाळ-अस्पृश्यता सर्वत्र आता त्या बिभत्स स्वरूपात समोर येत नाहीत ज्याप्रकारे त्या खुलेपणाने पूर्वी समोर येत असत. जाती व्यवस्थेचा व्यवसाय आणि रोटी व्यवहाराचा आशय भांडवली विकासाने बऱ्यापैकी नष्ट केला आहे, परंतु भांडवलशाहीनेच तिची इतर लक्षणे ना फक्त टिकवली आहेत; तर भांडवलदार वर्गाच्या हितांकरिता अस्मितेला खतपाणीही घातले आहे. जातीव्यवस्था-अस्पृश्यतेच्या समस्येच्या या दोन्ही बाजू, तिचे एका मर्यादेत संपुष्टात येणे, आणि विविध भेदभावांच्या रुपात चालत राहणे हे भांडवली विकासामुळे झाले आहे आणि **भांडवलशाही विरोधात न लढता या समस्येचेही पूर्ण समाधान शक्य नाही**. आरक्षण ही भांडवली चौकटीतील मागणी असल्यामुळे त्यातून सामाजिक भेद संपणे शक्य नाही. भांडवली आर्थिक चौकटीवर प्रश्न उपस्थित न करता त्या चौकटीतच प्रश्न सोडवण्याचे सर्व प्रयत्न सतत समस्येला बिकट करत जाणार आहेत.

**आज सर्व जातींमध्ये वर्गीय भेद, असमानच का असेनात, स्पष्टपणे दिसून येत आहेत.** भांडवलशाहीचा वरवंटा रोज कामगार-कष्टकऱ्यांच्या जीवनाला चिरडतो आहे, आणि अत्यल्प मजुरीत, असुरक्षित जीवन जगण्यासाठी सर्वच जाती-धर्मातील कामगार-कष्टकरी मजबूर आहेत. देशाच्या, समाजाच्या विकासाची आता पूर्वअट ही आहे की प्रत्येकाला विकासाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात. सर्वांना समान, मोफत, दर्जेदार सार्वजनिक खर्चाने शिक्षण आणि सर्वांना सन्मानजनक नियमित रोजगार या त्या मागण्या आहेत ज्यांच्याशिवाय आज आपण जनतेच्या, कामगार-कष्टकरी वर्गाच्या खऱ्या विकासाची कोणतीही कल्पना करू शकत नाही. त्यामुळेच या मागण्या प्राप्त करण्याकरिता कामगार-कष्टकऱ्यांची जाती-धर्मवाद-लिंगभेद विरोधी झुंजार वर्ग एकजूट हाच आपल्यापुढील मार्ग आहे. सर्व कामगार-कष्टकऱ्यांनी पुन्हा पुन्हा स्वत:ला बजावणे गरजेचे आहे की यापुढे जात, धर्म, लिंग, प्रांत यासारख्या कोणत्याही भेदाच्या राजकारणाला बळी न पडता, सर्व व्यक्तिंना रोजगार-शिक्षणाच्या अधिकाराचा लढा आपण उभा केला पाहिजे. अल्पशा संधींमधील वाट्यांचे भांडण आज शोषणकारी व्यवस्थेला टिकवण्याचेच काम करेल, गरज आहे ती सर्वांना संधी देणाऱ्या व्यवस्थेसाठीच्या लढ्याची.

## क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 10

# मालांचे अभिसरण आणि पैसा

अभिनव

*(अनुवादकाची टीप: मुद्रा (Money) या हिंदी शब्दाला मराठीत पैसा हा जास्त प्रचलित शब्द वापरला आहे. परंतु मराठीत पैसा शब्द रुपयाचा हिस्सा या अर्थाने सुद्धा वापरला जातो. या लेखात जिथे कुठे पैसा हा शब्द रुपयाचा हिस्सा या अर्थाने येतो, तेथे तसा उल्लेख करण्यात आला आहे.)*

मागील अंकात आपण बघितले की कशाप्रकारे सामाजिक श्रम विभाजन आणि विनिमयाच्या विकासासह पैसा-रूपाचा विकास झाला. आपण मूल्याचे एक स्वतंत्र रूप म्हणून पैशाच्या विकासाचे विविध टप्पे समजून घेतले आणि हे पाहिले की विनिमयाचे सर्वात आरंभिक रूप अर्थात आकस्मिक स्वरूपातच पैसा-रूपाच्या उत्पत्तीची बीजे होती. जस-जशी समाजात सामाजिक श्रम विभागणीच्या विकासाबरोबर विनिमयाचा विस्तार आणि तीव्रता वाढत गेली, तस-तसा उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध अधिक तीव्र होत गेला. याबरोबरच एका टप्प्यावर पैसा-रूप विकसित झाले, जे एक प्रकारे सर्व मालांची 'संयुक्त कारवाई' होती. जणू काही सर्व मालांनी एकत्र येऊन एका मालाला पैशाची भूमिका प्रदान केली, तिला वैश्विक समतुल्य, मूल्याच्या स्वतंत्र रूपाची पदवी दिली.

आपण हे देखील पाहिले की वेगवेगळ्या समाजामध्ये वेगवेगळ्या मालांनी ही भूमिका ग्रहण केली, जे की त्या समाजातील विविध मालांच्या सापेक्ष महत्वावर अवलंबून होते. उदाहरणार्थ, काही ठिकाणी गुरे, काही ठिकाणी तंबाखू, काही ठिकाणी कवड्या, तर काही ठिकाणी कापड, तांदूळ किंवा दूध यांना ही पदवी मिळाली. पण ज्याअर्थी पैसा हे मूल्याचे म्हणजेच अमूर्त मानवी श्रमाचे एक स्वतंत्र-रूप होते, त्यामुळे त्याच्यासाठी एखादा असा माल गरजेचा होता जो जगभरात एका रूपात आढळत असेल, तो क्षणभंगुर नसेल, टिकाऊ असेल आणि केवळ प्रमाणाच्या आधारावर विभागला जाऊ शकेल, गुणांच्या आधारावर नव्हे. ही भूमिका चांदी आणि प्रामुख्याने सोन्याने घेतली. सोने किंवा चांदीच्या उत्पादनात गुंतलेले अमूर्त मानवी श्रमच होते जे इतर मालांचे मूल्य निर्धारित करण्यासाठी एक मोजपट्टी म्हणून काम करत होते. साहजिकच, त्यासाठी सोन्या-चांदीचे वेगवेगळ्या वजनाचे तुकडे निश्चित केले गेले जेणेकरून त्यांचा विविध मालांसोबत विनिमय होऊ शकेल. अशा प्रकारचे स्वतंत्र मूल्य-रूप, म्हणजेच पैसा, संपूर्ण समाजाच्या पातळीवर तेव्हाच वैध ठरू शकते जेव्हा एखादी राज्यसत्ता आपल्या शिक्क्यासह त्याला मान्यता प्रदान करेल. **परंतु याचा अर्थ असा नव्हे की पैशाला राज्यसत्तेने निर्माण केले.** पैसा माल उत्पादक समाजात माल उत्पादकांच्या परस्पर देवाणघेवाणीतून निर्माण झाला आणि नंतर वेगवेगळ्या सभ्यतांमध्ये सरकार किंवा राज्यसत्तांनी त्याला मान्यता दिली.

आता आपण पुढे जाऊ. विनिमयाच्या प्रक्रियेच्या काही विशिष्ट वैशिष्ट्यांची थोडक्यात चर्चा करत आपण मालांचे अभिसरण आणि मालांच्या विनिमयाचे प्रारंभिक स्वरूप, म्हणजे त्यांची प्रत्यक्ष देव-घेव किंवा अदला-बदली (barter) यामधील फरक समजून घेऊ आणि नंतर पैसा आणि मालांच्या अभिसरणाचे काय नाते आहे ते बघू. सोबतच आपण पैशाच्या चलनाचा (currency of money) चा काय अर्थ आहे हे समजून घेऊ.

मार्क्सचा पैशाचा सिद्धांत पैशाच्या रूपात एका मालाच्या अस्तित्वाबद्दल बोलतो. म्हणजेच, एक माल ज्यामध्ये एका विशिष्ट प्रमाणात अमूर्त श्रम लागलेले आहेत, केवळ तेच इतर सर्व मालांच्या मूल्याचे मोजमाप म्हणून काम करू शकते. पण मार्क्सने असेही सांगितले की याच सिद्धांताच्या आधारावर सोन्याच्या नाण्यांचे मूल्य तांबे, कांस्य इत्यादी नाण्यांद्वारे देखील दर्शवले जाऊ शकते आणि सोबतच हे काम राज्यसत्तेद्वारे मान्यताप्राप्त कागदी नोटांद्वारे देखील केले जाऊ शकते. पण मार्क्सच्या काळात या कागदी नोटा सोन्याच्या पैशात बदलण्यायोग्य (convertible) होत्या, किंवा जेव्हा त्या अपरिवर्तनीय (inconvertible) होत्या तेव्हाही मूल्याच्या ज्या प्रमाणाचे त्या प्रतिनिधित्व करत होत्या ते सोन्याच्या पैशाचे एक विशिष्ट प्रमाणच होते. अशा प्रकारे सोनेच अजूनही मूल्याच्या मोजमापाची भूमिका बजावत होते. आपण हे जाणतो की आज रिझर्व बँकेने जारी केलेल्या कागदी नोटांचे मूल्य सुवर्ण-समर्थित (gold backed) नाही. मग याचा अर्थ मार्क्सचा पैशाचा सिद्धांत कालबाह्य झाला असा आहे का? नाही. मार्क्सच्या पैशाच्या सिद्धांतामध्येच ती तत्वे आहेत ज्याच्या आधारावर तुम्ही पूर्णपणे प्रतीकात्मक कागदी पैशाचा सिद्धांत निगमित (deduce) करू शकता, असा पैसा जो स्वर्ण-समर्थित नाही, म्हणजे ज्याचे मूल्य सोन्याद्वारे नियंत्रित केले जात नाही. स्वर्ण-समर्थित नसणे याचा अर्थ असा नाही की विद्यमान कागदी पैशाचे मूल्य काल्पनिक आहे आणि राज्यसत्ता मनमानी प्रमाणात कागदी नोट छापून त्यांचे मूल्य ठरवू शकते आणि समाजात मालांच्या किंमतींची पातळी मनमानी पद्धतीने ठरवू शकते. **स्वर्ण-समर्थित नसणे याचा अर्थ असा नाही की पैशाचे मूल्य आज सामाजिक स्तरावर मानवी अमूर्त श्रमाद्वारे निर्धारित केले जात नाहीये आणि ते कोणत्याही गोष्टीद्वारे समर्थित नाहीये.** परंतु या गोष्टी समजून घेण्यापूर्वी मार्क्सच्या पैशाच्या सिद्धांतातील मूलभूत तत्वांची योग्य समजदारी असणे आवश्यक आहे.

या प्रकरणात आपण मार्क्सचा पैशाचा सिद्धांत समजून घेऊ, पैशाची कार्ये समजून घेऊ, स्वर्ण-समर्थित म्हणजे सोन्यात परिवर्तनीय अथवा अपरिवर्तनीय प्रतीकात्मक पैसा (म्हणजे इतर धातूंचे नाणी किंवा कागदी नोटा) समजून घेऊ. पुढील अंकात स्वर्ण-समर्थित नसलेल्या सध्याच्या कागदी पैशाला आणि त्याच्या मूल्याला मार्क्सवादी पैसा सिद्धांताच्या आधारावर शास्त्रीयदृष्ट्या कसे समजून घेता येईल हे आपण तपशीलवार पाहू.

### विनिमय आणि पैसा

सर्वात पहिली गोष्ट म्हणजे सर्व माल उत्पादकांसाठी त्यांनी उत्पादित केलेल्या मालाचे काहीही उपयोग-मूल्य नसते, अन्यथा ते त्याला विकणारच नाहीत. त्यांच्याद्वारे उत्पादित माल एक *सामाजिक उपयोग-मूल्य* असतो म्हणजे तो सामान्यतः समाजासाठी उपयुक्त असतो. म्हणून एका माल उत्पादक समाजात मालाचा उपयोग-मूल्य म्हणून उपभोग व्हावा यासाठी आधी त्याची विक्री होणे आवश्यक आहे. *म्हणजेच, उपयोग-मूल्याच्या रूपात वास्तवीकृत होण्याआधी, म्हणजे त्यांचा उपभोग होण्यापूर्वी, त्यांचे मूल्याच्या रूपात वास्तवीकृत होणे, म्हणजेच विकले जाणे अनिवार्य आहे. हा माल उत्पादक समाजाचा एक महत्त्वाचा सामान्य नियम आहे.*

मूल्याच्या योगायोगाच्या रूपाच्या किंवा विस्तारित रूपाच्या टप्प्यात (*हे समजून घेण्यासाठी मागील प्रकरण वाचावे – लेखक*) सर्व माल त्यांचे मूल्य वेगवेगळ्या मालांमध्ये अभिव्यक्त करतात आणि त्यांचे समतुल्य मूल्य बदलत राहते. उदाहरणार्थ, एक लिटर दुधाचे मूल्य दोन मीटर कापड, एक किलो गहू, दोन हातोडे, अर्धा किलो तांदूळ अशा स्वरूपात अभिव्यक्त केले जाऊ शकते. **दुसऱ्या शब्दांत, मूल्याने अद्याप कोणतेही स्वतंत्र-रूप धारण केलेले नाही.** मूल्याचे कोणतेही स्वतंत्र-रूप उदयास आलेले नाही जे सर्व मालांसाठी समतुल्याची भूमिका बजावू शकेल, **म्हणजे जे एक वैश्विक समतुल्य असेल,** ज्यामध्ये सर्व माल त्यांचे मूल्य अभिव्यक्त करतील आणि ज्याच्याशी सर्व मालांचा विनिमय होऊ शकेल.

पैशाचा विकास सामाजिक श्रम विभाजन आणि मालांच्या उत्पादन व विनिमयाच्या विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर होतो. जसजशी मानवी श्रमाची अधिकाधिक उत्पादने माल बनत जातात, तसतसा उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध अधिक तीव्र होत जातो कारण परस्पर गरजांचे जुळणे कठीण होत जात. प्रत्येक माल उत्पादकासाठी त्याच्या मालाला उपयोग मूल्य नसते आणि ते एक सामाजिक उपयोग मूल्य असते, जे तेव्हाच वास्तवीकृत होऊ शकते म्हणजे उपभोगाच्या क्षेत्रात आणले जाऊ शकते जेव्हा त्याचा विनिमय होईल, म्हणजे जेव्हा ते मूल्याच्या रूपात वास्तवीकृत होईल. परंतु हे तेव्हाच होऊ शकते जेव्हा दुसऱ्या माल उत्पादकाला पहिल्याच्या मालाची गरज असते आणि पहिल्या माल उत्पादकाला दुसऱ्याच्या मालाची आवश्यकता असते. जसजशी अधिकाधिक उत्पादने माल होत जातात, तसतसे हे अधिक कठीण होत जाते. **यालाच आपण उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध तीव्र होणे म्हणत आहोत.**

पैसा याच अंतर्विरोधाची प्रतिक्रिया म्हणून सर्व मालांची सामूहिक, संयुक्त आणि सामाजिक कारवाई आहे, ज्यामध्ये एक विशिष्ट माल किंवा काही विशिष्ट मालांना वैश्विक **समतुल्य** म्हणजेच पैशाची भूमिका पार पाडण्यासाठी बाजूला केले जाते, जे की **स्वतःच मूल्याचे मूर्त रूप,** त्याचे स्वतंत्र-रूप आणि **स्वतःमध्ये** जमा झालेले अमूर्त मानवी श्रम आहे. याचप्रकारे, सामान्यतः, उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध पैसा-रूपाच्या माध्यमातून *सांभाळला* जातो. स्पष्ट आहे की तो *सुटत नाही.* जर सामाजिक श्रम विभाजन योग्य नसेल तर सामाजिक प्रभावी मागणीपेक्षा जास्त उत्पादित झालेला माल एकतर त्याच्या मूल्यापेक्षा कमी बाजारभावाने विकला जाईल किंवा काहीवेळा अजिबात विकला जाणार नाही. **म्हणून, मालामध्ये अंतर्निहित उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध पैसा-रूपात सांभाळला जातो आणि तात्पुरता सोडवला जातो, परंतु सामाजिकदृष्ट्या त्याचे कायमस्वरूपी निराकरण एका माल-उत्पादक समाजात शक्य नाही.** अशा प्रकारे पैसा हा दुसरे काही नसून सर्व मालांमधील मूल्य-संबंधांचा (value-relations) प्रतिक्षेप (reflex) आहे, जो त्यांच्यामध्ये अंतर्निहित अंतर्विरोधांच्या तीव्र होण्यातून जन्माला येतो.

येथे लक्षात घेण्याजोगा मुद्दा असा आहे की पैशाचे मूल्य सुद्धा पैसा-मालाच्या (म्हणजे चांदी किंवा सोने) उत्पादनासाठी (त्यांचे उत्पादन म्हणजे त्यांना जमिनीतून काढणे, त्याचे शुद्धीकरण इ.) लागणाऱ्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त मानवी श्रमांच्या प्रमाणावरच अवलंबून असते. अगदी यामुळेच ते सर्व मालांच्या मूल्याच्या मोजमापाची भूमिका पैशाच्या स्वरूपात बजावू शकते.

**पैशाचे मुख्य कार्य एक स्वतंत्र मूल्य-स्वरूप (independent value form) प्रदान करणे हे आहे, एक अशी गोष्ट ज्यामध्ये सर्व माल त्यांचे मूल्य अभिव्यक्त करू शकतील.** त्यामुळेच सोने हे मूळात या कामासाठी सर्वात योग्य धातू होते कारण ते सर्वत्र एकाच स्वरूपात आढळते आणि सोन्यापासून सोने केवळ प्रमाणाच्या आधारावर वेगळे केले जाऊ शकते, अगदी त्याचप्रमाणे जसे अमूर्त श्रमाला अमूर्त श्रमापासून केवळ प्रमाणाच्या आधारावर वेगळे केले जाऊ शकते. **पैशाला नक्कीच मूल्य असते, पण त्याची कुठलीही किंमत नसते.** हा पैसाच आहे ज्यामध्ये प्रत्येक माल त्याचे दाम किंवा किंमत अभिव्यक्त करतो, परंतु स्वतः पैशाची काहीही किंमत नसते, त्याचे काहीही दाम नसते.

मार्क्सने डेव्हिड ह्यूम आणि याबाबतीत त्यांचे अनुसरण करणाऱ्या डेव्हिड रिकार्डो यांच्या सिद्धांताचे खंडन केले. ह्यूम आणि रिकार्डो यांचा असा विश्वास होता की पैशाचे मूल्य काल्पनिक आहे. त्यांचा हा दावा त्यांना पैशाच्या प्रमाण-सिद्धांताकडे (Quantity Theory of Money) घेऊन गेला ज्यानुसार पैशाच्या जास्त पुरवठ्यामुळे त्याचे मूल्य घसरते. मार्क्सने सांगितले की जिथवर स्वर्ण-पैसा किंवा त्याच्या सोन्यात रूपांतरित होऊ शकणाऱ्या प्रतीकांचा प्रश्न आहे, जर त्यांचा पुरवठा आवश्यकतेपेक्षा जास्त असेल तर ते अभिसरणातून बाहेर जातील आणि त्यांचे ढिग जमा होतील व ते मालांच्या अभिसरणाचे माध्यम म्हणून काम करणार नाहीत. मार्क्स ने सांगितले की पैसा-रूप या अर्थाने निश्चितच काल्पनिक आहे की मालांचे मूल्य आणि पैशाचे मूल्य ही वास्तविक गोष्ट आहे, परंतु त्यांच्यातील समानता काल्पनिक स्वरूपात बाजारात स्थापित होते. उदाहरणार्थ, बाजार माल उत्पादकाला 'तुमच्या मालाची अशी-अशी किंमत आहे' हे आधीच सांगत नाही. माल उत्पादक आपल्या मालावर किंमतीचे लेबल लावतो, जे पैशाच्या एका निश्चित रकमेसाठी आमंत्रण असते. जर ही किंमत मूल्यापेक्षा जास्त किंवा कमी असेल तर, बाजारातील स्पर्धा शेवटी त्याला संतुलित करते. अजून आपण भांडवली माल उत्पादन आणि नफ्याच्या दराच्या सरासरीकरणाची चर्चा केली नाही आणि आपण केवळ साधारण माल उत्पादनाबद्दल बोलत आहोत. अशा स्थितीत बाजारातील स्पर्धेमुळे मालाच्या उत्पादकाने निर्धारित केलेली किंमत मूल्याच्या आसपासच स्थापित होईल. बाजाराची शिस्त असल्यामुळे माल उत्पादक त्याच्या मालाच्या किमतीत बदल करेल. **या अर्थाने, पैसा-रूप नक्कीच काल्पनिक आहे, परंतु स्वतः पैशाचे मूल्य काल्पनिक नसते, तर ते अमूर्त श्रमांच्या प्रमाणात निर्धारित केले जाते.**

मार्क्स पुढे स्पष्ट करतात की ज्याअर्थी पैसा-रूप (money form) काल्पनिक आहे, त्यामुळे पैशाची भूमिका कोणत्याही काल्पनिक किंवा नमुना पैशाद्वारे पार पाडली जाऊ शकते, उदाहरणार्थ कागदी पैसा. परंतु तेव्हाही केवळ पैशाचे भौतिक अस्तित्व (material existence of money) त्याच्या कार्यात्मक अस्तित्वाद्वारे (functional existence of money) विनियुक्त केले जाईल, परंतु त्याचे मूल्य केवळ सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त मानवी श्रमाद्वारेच निश्चित केले जाईल, जे वास्तवात पैसा-मालाच्या उत्पादनात खर्च होतात.

मग हा भ्रम कसा निर्माण झाला की आता पैसा मूल्याची मोजपट्टी राहिला नाही, त्याच्या मूल्याला स्वतःमध्ये काही अर्थ नाही, इत्यादी? याचे एक कारण म्हणजे **पैशाची नावे आणि वजनांची नावे** यांच्यात फरक निर्माण झाला. इतिहास सांगतो की बहुतेक पैशांची नावे पैसा-मालाच्या (सोने किंवा चांदी) तुकड्यांच्या वजनाच्या आधारावरच ठरवली गेली, उदाहरणार्थ, पौंड (ब्रिटिश पैसा) शब्दाचे मूळ वजनाचे एकक पौंडच आहे. सुरुवातीला अँग्लो-सॅक्सन इंग्लंडमध्ये 776

पान 8 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 10

**पान 7 वरून**

ईसवीसन मध्ये पौंडचा अर्थ दुसरा काही नसून एक पौंड चांदीच होता. त्याचप्रमाणे, वेगवेगळ्या प्रमाणात होणारे विनिमय शक्य करण्यासाठी आवश्यक असलेले त्याचे छोटे तुकडे देखील सोन्या/चांदीच्या वेगवेगळ्या प्रमाणांना दर्शवत होते. उदाहरणार्थ, समजा की एखाद्या वेळी 10 किलो तांदळाची किंमत 1/16 पौंड किंवा 1 औंस चांदी होती. तसे पैशाचे नाव म्हणून 1 पाउंडमध्ये जवळपास 240 पेनी असतात. वजनाच्या बाबतीत 1 औंस हे अंदाजे 28 ग्रॅम इतके आहे. येथे आपण हा विशिष्ट माल तांदूळ आणि पैसा म्हणून वापरला जाणारा माल म्हणजे चांदी या दोन्हींच्या प्रमाणाला वजनात अभिव्यक्त करत आहोत. कालांतराने 1 औंस चांदीच्या नाण्यांना पेनी म्हटले जाऊ लागले (जसे आपल्याकडे रुपयाचा भाग म्हणून 'पैसा' आहे) आणि त्याला d. (दिनारियम) ने चिन्हित केले जाऊ लागले. नंतर 12 पेनीला 1 शिलिंगचे नाव दिले गेले आणि 20 शिलिंग म्हणजे 1 पाउंड स्टर्लिंग निश्चित झाले. हे पैसा-मालच्या प्रमाणाचे वेगवेगळे मूल्य-वर्ग (denominations, परिमाणे) आहेत, ज्याला राज्यसत्ताच निश्चित करते. नंतर जेव्हा वेगवेगळ्या राज्यसत्तांनी सोने किंवा चांदीच्या पैशाच्या जागी मिश्रित किंवा इतर धातूंची नाणी जारी केली, तेव्हा त्यातील सोने किंवा चांदीचे प्रमाण तर कमी झाले (किंवा संपले) परंतु पैशाच्या मूल्य-वर्गाचे नाव तेच राहिले. **म्हणजेच पैशाच्या मूल्य-वर्गाचे नाव आणि वजनाच्या एककाचे नाव जे पूर्वी समान होते, ते वेगळे झाले. आता 1 पौंड पैसे प्रत्यक्षात 1 पौंड चांदीचे प्रतिनिधित्व करत नव्हते.** उदाहरणार्थ, 1717 मध्ये इंग्लंडने सोने हे मुद्रा-माल म्हणून स्वीकारले आणि 1 औंस सोन्याचे मूल्य 4.25 पौंड ठरवण्यात आले. जर एक औंस सोन्याचे उत्पादन करण्यासाठी 20 तास लागले असतील आणि 10 यार्ड सुती कापड तयार करण्यासाठी 20 तास लागत असतील तर 10 यार्ड सूती कापडाची किंमत 4.25 पौंड असणार. डॉलर-स्वर्ण मानकाच्या युगात 1967 मध्ये, 1 पौंड हे 2.4 डॉलर्स इतके होते, तर 1 डॉलर 0.028 औंस सोन्याच्या बरोबर होता. म्हणजे 1967 मध्ये 1 ब्रिटिश पौंड हा 0.06 औंस सोन्याच्या बरोबर होता. **म्हणजेच पैशाचे मूल्य अजूनही पैसा-मालाच्या उत्पादनावरून ठरवले जात होते, परंतु वजनांची नावे आणि पैशाच्या मूल्य-वर्गाची नावे वेगळे झाली होती.** पैशाच्या अवमूल्यनाचे काम वेगवेगळ्या राज्यसत्तांनी यामुळे केले कारण ते त्यांच्या राज्याच्या राजकोषात सोने आणि चांदीच्या प्रमाणाच्या तुलनेत कितीतरी जास्त नाणी जारी करू शकत होते आणि त्याद्वारे ते राज्याचे कर्ज फेडू शकत होते, युद्धांचा खर्च भागवू शकत होते, राज्याचा खर्च चालवू शकत होते. आपण पैशाच्या उत्पत्ती आणि विकासाच्या या अत्यंत मनोरंजक इतिहासात फार तपशीलात जाऊ शकत नाही, परंतु ते नक्कीच वाचण्यासारखे आहे. यातून संपूर्ण चित्र आपल्यासमोर उभे राहते आणि आर्थिक इतिहासातील घटनांचे एक जिवंत चित्र मनात उभे राहते.

यानंतर मार्क्स पैशाच्या दोन मूलभूत कार्यांवर येतात: **पहिले, मूल्याचे माप आणि दुसरे, किंमतीचे/दामाचे मानक.** याचा काय अर्थ आहे? मूल्याचे माप म्हणजे हे की पैशाद्वारेच इतर सर्व मालांचे मूल्य मोजले जाते. परंतु पैशाची निश्चित एकके असतात ज्याद्वारे मूल्याच्या विविध प्रमाणांचा विनिमय होते. उदाहरणार्थ, 1 रुपयात 4 आणे, 1 आण्यामध्ये 25 पैसे. येथे पैसा (Money) हा किमतीच्या मानकाची भूमिका बजावत आहे, म्हणजे पैसा-मालाची विविध प्रमाणे जी सोन्या-चांदीच्या पैशाच्या युगात त्यांची वेगवेगळी वजने दर्शवत होती. ही मानके कोणत्याही अर्थव्यवस्थेत राज्यसत्ता निश्चित करते, ज्याद्वारे पैसा-माल (सोने किंवा चांदी) च्या वेगवेगळ्या प्रमाणांना पैशाच्या मूल्य-वर्गाच्या रूपात निश्चित केले जाते आणि राज्यसत्ताच या विविध मूल्य-वर्गांना नावे देखील देते. उदाहरणार्थ, समजा की एक टन लोखंड तयार करण्यात लागलेले अमूर्त मानवी श्रम हे एक किलोग्राम सोने तयार करण्यात लागलेल्या अमूर्त मानवी श्रमाइतके आहे. त्यामुळे दोघांचे मूल्य समान झाले आणि 1 टन लोखंडाच्या मूल्याला पैशाच्या स्वरूपात सोन्याचे एक निश्चित प्रमाण, 1 किलोग्रॅम, अभिव्यक्त करते. हे मूल्याचे मोजमाप म्हणून पैशाचे कार्य प्रदर्शित करते. जर 1 ग्रॅम सोन्याला राज्यसत्ता 1 रुपया बरोबर मानत असेल तर 1 टन लोखंडाची किंमत 1000 रुपये आहे. येथे माल लोखंड आहे, ज्याचे प्रमाण 1 टन आहे; मूल्याचे माप आहे 1 किलोग्राम सोने; आणि किंमतीचे मानक आहे रु. 1000 जे की 1 किलो सोन्याच्या समतुल्य आहे, किंवा रु. 1000 जे 1000 ग्रॅम सोन्याचे प्रतिनिधित्व करते.

मूल्याच्या मापाच्या रूपात पैशाचा मालांसोबतचा संबंध बदलू शकतो. जर सर्व मालांच्या उत्पादनात उत्पादकता वाढली आणि त्यांचे श्रम-मूल्य कमी झाले आणि सोन्या/चांदीच्या उत्पादनात तसे घडले नसेल किंवा त्याच्या उत्पादकतेत झालेला बदल अगदी त्याच प्रमाणात आणि त्याच दिशेने नसेल, तर मूल्याच्या मापाच्या रूपात पैशाचा सर्व मालांशी संबंध बदलून जाईल. परंतु यामुळे किमतीचे मानक म्हणून पैशाच्या भूमिकेत काही फरक पडणार नाही. 1 पैशाचा 4 आण्यांशी संबंध तोच असेल जो पूर्वी होता आणि 4 आण्याचा 1 रुपयाशी सुद्धा संबंध तोच असेल जो पूर्वी होता. मार्क्स लिहितात:

"मूल्याचे माप आणि किमतीचे मानक या रूपांत पैसा दोन भिन्न कार्ये पूर्ण करतो. मूल्याचे माप म्हणून तो मानवी श्रमाचा सामाजिक अवतार आहे; एखाद्या धातूच्या ठरवलेल्या वजनाच्या निश्चित प्रमाणाच्या स्वरूपात तो किंमतीचे मानक आहे. मूल्याचे माप म्हणून ते सर्व मालांच्या मूल्याला किमतींमध्ये, म्हणजेच सोन्याच्या काल्पनिक परिमाणांमध्ये रूपांतरित करण्याचे काम करतो; किमतीच्या मानकाच्या रूपात तो सोन्याच्या ह्या प्रमाणाला मोजण्याचे कार्य करतो. मूल्यांचे माप म्हणून ते **मूल्यांच्या रूपामध्ये मालाला** मोजते; याउलट, **किंमतीचे मानक म्हणून ते सोन्याच्या विविध प्रमाणांना सोन्याच्या एका एकक परिमाणाद्वारे मोजते, ना की सोन्याच्या एका परिमाणाच्या मूल्याला एखाद्या दुसऱ्या परिमाणाच्या वजनाने.** किंमतीच्या मानकांसाठी सोन्याच्या एका निश्चित वजनाला मोजण्याचे एकक म्हणून निश्चित करणे आवश्यक आहे." (कार्ल मार्क्स, 1982, *कॅपिटल*, खंड 1, पेंग्विन संस्करण, पृ. 192, जोर आमचा)

स्पष्ट आहे की पैशाच्या या दोन भूमिका समजून घेणे आणि त्यात फरक करणे महत्त्वाचे आहे. पैसा या दोन्ही भूमिका तेव्हाच व्यापक आणि सामाजिक पातळीवर निभावू शकतो जेव्हा त्याला राज्यसत्तेद्वारे कायदेशीर मान्यता दिली गेली असेल. ही बाब समजून घेणे यासाठीही महत्त्वाची आहे कारण नंतर अशा कागदी पैशाच्या उदयाची परीघटना समजून घेण्यासाठी हे आवश्यक आहे, ज्याला सोन्याचे समर्थन नाही म्हणजे जो स्वर्ण-पैशाचा प्रतिनिधी किंवा प्रतीक नाही, ज्यामध्ये सोन्याच्या पैशाच्या भौतिक अस्तित्वाला त्याच्या कार्यात्मक अस्तित्वाने गिळंकृत केले आहे. सोप्या भाषेत, ज्यामध्ये आता भौतिक पातळीवर सोन्याचा पैसा संचारात नाही, परंतु त्याचे कार्य त्याचा प्रतिनिधी किंवा प्रतीक असलेला कागदी पैसा करत आहे.

पुढे जाण्यापूर्वी एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे उपयुक्त ठरेल. **अशा एखाद्या गोष्टीची किंमत किंवा दाम असू शकते जिचे काही मूल्य नाही.** उदाहरणार्थ, जमीन मानवी श्रमाने निर्माण होत नाही. ती एक नैसर्गिक संसाधन आहे जी मर्यादित प्रमाणात आहे. अशा वेळी, जमिनीचे कोणतेही मूल्य नाही कारण ते श्रमाचे उत्पादन नाही. मूल्य म्हणजे दुसरे काही नसून कुठल्यातरी उत्पादन किंवा सेवेच्या रूपात भौतिक रूप धारण केलेले अमूर्त मानवी श्रमच आहे. त्यामुळे जमिनीचे कुठलेही मूल्य नसते. परंतु जर जमिनीची खाजगी मालकी अस्तित्वात आली तर तिचीही खरेदी-विक्री सुरू होते आणि त्यामुळे तिलाही एक किंमत मिळते. पण तरीही तिचे कुठलेही मूल्य नसते. जमिनीचा मालक वर्ग तिचे भाडे किंवा तिच्या किमतीच्या माध्यमातून संपूर्ण समाजाकडून एक शुल्क किंवा खंडणी (tribute) वसूल करतो आणि म्हणूनच तो सर्वात परजीवी आणि प्रतिक्रियावादी वर्ग असतो, मग तो भांडवली जमीनदार असो वा सामंती जमीनदार.

## पैसा किंवा मालांचे अभिसरण

मालांच्या खरेदी-विक्रीसाठी पैसा हे माध्यम म्हणून काम करते. म्हणजे तो मालांचे अभिसरण आणि त्यांच्या रूपांतरणाचे (metamorphosis) काम करतो. **मालाचे रूपांतरण म्हणजे काय?** मालाचे रूपांतरण म्हणजे मालाचे पैशात बदलणे आणि नंतर परत पैशाचे मालामध्ये बदलणे. हे मालांच्या अभिसरणाचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. म्हणजे एका मालाच्या उत्पादकाने आपला माल खरेदीदाराला विकला आणि त्याच्या हातात पैसे आले; या पैशाने त्याने त्याच्यासाठी आवश्यक माल खरेदी केला. ही प्रक्रिया वस्तूविनिमयापेक्षा (barter) वेगळी आहे, ज्यामध्ये एक माल सरळ दुसऱ्या मालासोबत पैशाच्या मध्यस्थीशिवाय बदलला जातो. या वस्तूविनिमयाल दर्शवण्याचे सूत्र आहे:

माल - माल (मालाची सरळ दुसऱ्या मालासोबत अदला-बदली)

जेव्हाकी मालांचे अभिसरण (circulation of commodities) दर्शविण्याचे सूत्र आहे:

माल – पैसा – माल (मा – पै – मा)

आपण पाहू शकतो की मालांच्या अभिसरणामध्ये दोन रूपांतरणे अस्तित्वात आहेत. प्रथम, मा-पै किंवा माल-पैसा, म्हणजे मालांचे पैशात रूपांतर होणे, त्यांचे विकणे. हे स्वतःच एक जोखमीचे पाऊल आहे. उत्पादकाचा माल विकला जाईल की नाही हे त्याला त्याच्या मालासाठी त्याला खरेदीदार मिळेल की नाही हे यावर अवलंबून आहे. त्याला खरेदीदार मिळेल की नाही हे त्याच्या मालाचे सामाजिक उपयोग-मूल्य आहे की नाही यावर अवलंबून असते. त्याच्या मालाचे सामाजिक उपयोग-मूल्य आहे की नाही हे सामाजिक श्रम विभाजन गुणात्मक आणि परिमाणात्मकदृष्टया कसे आहे यावर अवलंबून असते. जर वरील मालाचा पुरवठा गरजेपेक्षा जास्त असेल, म्हणजे या मालाच्या उत्पादनात सामाजिकदृष्ट्या आवश्यकतेपेक्षा जास्त श्रम लागले असतील, तर हा माल विकलाच जाणार नाही किंवा त्याच्या मूल्यापेक्षा कमी किमतीला विकला जाईल. भलेही त्या मालाच्या उत्पादनामध्ये वेगळ्याने सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम (म्हणजे त्या मालाच्या उत्पादनाच्या क्षेत्रातील उत्पादनाच्या सरासरी परिस्थितीनुसार निर्धारित होणाऱ्या सामाजिक श्रमाचे प्रमाण) लागले असले तरीही जर त्याचा पुरवठा आवश्यकतेपेक्षा जास्त असेल तर त्यात लागलेले श्रम समाज सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम म्हणून ओळखले जाणार नाही आणि एकतर तो माल विकला जाणार नाही किंवा त्याच्या मूल्यापेक्षा कमी किमतीत विकला जाईल. **गुणात्मक सामाजिक श्रम विभाजन श्रमाच्या उत्पादनांना मालामध्ये रूपांतरित करते आणि परिमाणात्मक सामाजिक श्रम विभाजन त्यांच्या खरेदी-विक्रीला एक अपघाताची बाब बनवून टाकतो.** जर एकूण सामाजिक श्रमाचा गरजेपेक्षा जास्त हिस्सा एखाद्या विशिष्ट मालाच्या उत्पादनात लागलेला असेल, आणि परिणामी तो माल त्याच्या मूल्यापेक्षा कमी किमतीला विकला जात असेल, तर बाजारातील परिस्थिती अखेरीस या सामाजिक श्रम विभाजनाला बदलवेल. सामाजिक श्रमाचा काही हिस्सा त्या मालाच्या उत्पादनाच्या क्षेत्रातून एखाद्या अशा मालाच्या उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये स्थानांतरित होईल ज्या मालाचा पुरवठा त्याच्या प्रभावी मागणीपेक्षा कमी असेल आणि तो बाजारात त्याच्या मूल्यापेक्षा जास्त बाजार-किंमतीला विकला जात असेल. बाजार-किंमत आणि मूल्यामध्ये वेगवेगळ्या मालांच्या पातळीवरील येणारे सर्व फरक सामाजिकरित्या एकमेकांना खोडतात आणि एकूण मूल्य एकूण बाजार-किमतीएवढेच राहते, कारण प्रत्येक खरेदी ही एक विक्री असते आणि प्रत्येक विक्री ही एक खरेदी असते. खरेदीदाराच्या हातात असलेला पैसा देखील त्याने केलेल्या विक्रीचाच परिणाम आहे. त्यामुळे मालांचे रूपांतरण एकमेकांशी विणलेले, एकमेकांशी बांधलेले, एकमेकांशी जोडलेले असते. तथापि, हे सहज समजले जाऊ शकते की मालाची विक्री, म्हणजे एखाद्या माल उत्पादकासाठी मालाचे पहिले रूपांतरण एखाद्या माल उत्पादक अर्थव्यवस्थेत पूर्वप्रदत्त तथ्य नसते, तर तो योगायोगाचा भाग असतो, ज्यामध्ये अनेक जोखमी असतात.

एखाद्या माल उत्पादकासाठी दुसरे रूपांतरण सोपे आहे. कारण दुसऱ्या रूपांतरणात, म्हणजेच पै-मा (पैसा-माल) दरम्यान त्याच्या हातात कुठलाही साधारण माल नसतो तर पैसा असतो, जो सार्वत्रिक समतुल्य असतो, निरपेक्षपणे विनिमेय (absolutely alienable) असतो, *ज्याचा विनिमय कोणत्याही मालासोबत होऊ शकतो*. **हा मालांमधला ईश्वर आहे!** पैशाने माल उत्पादक त्याच्यासाठी आवश्यक असलेली सर्व उत्पादने आणि उपभोगाच्या वस्तू खरेदी करू शकतो. यासह माल अभिसरणाचे सर्किट पूर्ण होते, दोन्ही रूपांतरण पूर्ण होऊन जातात. मा–पै–मा पूर्ण होण्यासोबत आपल्याला दोन्ही टोकांना माल मिळतो; हे दोन्ही माल उपयोग-मूल्याच्या दृष्टीने भिन्न आहेत, म्हणजेच त्या दोन भिन्न माल आहेत; परंतु मूल्याच्या बाबतीत दोघांमध्ये काहीही फरक नाही; म्हणजेच, दोन्ही उपयोग-मूल्यांचे मूल्य समान आहे. **हे माल अभिसरणाच्या संपूर्ण सूत्राचे वैशिष्ट्य आहे: यात दोन्ही टोकांना भौतिकदृष्ट्या भिन्न माल (उपयोग-मूल्ये) असतात, ज्यांचे मूल्य समान असते आणि ज्यांचा विनिमय पैशाच्या मध्यस्थीने होतो.** जेव्हा दोन्ही माल त्यांच्या खरेदीदारांपर्यंत पोहोचतात, तेव्हा ते उत्पादन आणि अभिसरण या दोन्ही क्षेत्रातून निघून उपभोगाच्या क्षेत्रात जातात, त्यांचा उपभोग घेतला जातो आणि ते अभिसरणाच्या बाहेर जातात.

एका माल उत्पादकाच्या मालाचे रूपांतरण इतर अनेक माल उत्पादकांच्या मालाच्या रूपांतरणाशी जोडलेले असते. उदाहरणार्थ, पहिल्या माल उत्पादकाने ज्या माल उत्पादकाला आपला माल विकला, त्याच्याजवळ असलेला पैसा स्वतः त्याने आपला माल विकल्यावरच आला होता आणि हेच तिसऱ्या माल उत्पादकाला लागू होते ज्याने दुसऱ्या माल उत्पादकाकडून माल विकत घेतला होता. अशा प्रकारे, मालांच्या रूपांतरणाचे सर्व सर्किट एकमेकांशी जोडलेले असते. **यालाच आपण मालांचे अभिसरण म्हणतो.** या प्रक्रियेत, मालांच्या उपभोगाबरोबर स्वतः माल तर या प्रक्रियेतून बाहेर पडतो, परंतु पैशासोबत असे होत नाही. तो एक सर्किट संपल्यानंतरही

**पान 9 वर**

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 10

पान 8 वरून

मालांच्या विनिमयामध्ये मध्यस्थीचे काम करत राहतो, तो मालांनी मोकळ्या केलेल्या जागा भरत राहतो आणि या अभिसरणात अथकपणे फिरत राहते. मार्क्सने आपल्या सुंदर साहित्यिक शैलीत म्हटल्याप्रमाणे: **"मालांचे अभिसरण प्रत्येक रंध्रातून निघणाऱ्या घामाप्रमाणे पैशाला काढत राहते."** (कार्ल मार्क्स, उक्त, पृ. 208) म्हणजे, पैशाचे हे सतत फिरत राहणे आणि मालांच्या देवाणघेवाणीत मध्यस्थ म्हणून कार्य करत राहणे, मालांनी रिक्त केलेल्या जागा भरत जाणे चालू राहते. **यालाच मार्क्सने पैशाचे चलन (currency of money) म्हटले आहे.**

मार्क्सने सांगितले की, पैशाचे हे चलन हे मालांच्या अभिसरणाचे कारण नसून त्याचा परिणाम आहे. सामान्यत: लोकांना असे वाटते की जर मालांची खरेदी-विक्री सुरळीत होत नसेल, तर त्याचे कारण पैशाची म्हणजे विनिमयाचे माध्यम म्हणून काम करणाऱ्या वस्तूची कमतरता झाली आहे. पण हा एक दृष्टीभ्रम आहे. मालांच्या खरेदी-विक्रीत घट होण्याची कारणे काही वेगळी असतात. जेव्हा मालांची सुरळीत आणि गतिमान रूपाने खरेदी होते तेव्हा पैशाचे चलनवलनही तीव्र दराने होते. मालांच्या अभिसरणात खंड पडल्यावर हे चलनवलनही बाधित होते. परंतु यामध्ये निर्णायक भूमिका मालांच्या उत्पादनाची आणि त्यांच्या अभिसरणाची आहे, पैशाच्या प्रमाणाची नाही.

**मग एखाद्या वेळी एखाद्या अर्थव्यवस्थेत आवश्यक असलेले पैशाचे प्रमाण कसे ठरवले जाते?** ह्यूम आणि रिकार्डो, ज्यांचा वर उल्लेख आला आहे, यांचा असा विश्वास होता की मालांच्या किंमतींची पातळी ही पैशाच्या पुरवठ्याद्वारे निर्धारित केली जाते. हा देखील पैशाच्या प्रमाण सिद्धांतातूनच निघणारा एक युक्तिवाद होता. मार्क्सने सांगितले की ही उलटी गोष्ट आहे. मार्क्सने निदर्शनास आणून दिले की मालांचे अभिसरणच ठरवते की पैशाचे प्रमाण काय असावे. **अभिसरणात असलेल्या सर्व मालांची एकूण किंमत हा तो पहिला घटक आहे जो त्यांच्या अभिसरणासाठी आवश्यक पैशांचे प्रमाण निर्धारित करतो.** परंतु जर अभिसरणातील मालांची एकूण किंमत रु. 1 कोटी असेल, तर याचा अर्थ असा नाही की त्यांच्या अभिसरणासाठी रु. 1 कोटी एवढ्या पैशांची आवश्यकता असेल. **का?** कारण पैशाप्रमाणेच नोटा किंवा नाणी अनेक मालांच्या विनिमयाला पार पाडू शकतात. **वेगवेगळ्या मूल्य-वर्गांमधील पैशांच्या नोटा आणि नाणी सरासरी किती विनिमयाला घडवू शकतत याला पैशाचा वेग (velocity of money) म्हणतात.** सर्व मूल्य-वर्गांमधील पैशांच्या वेगवेगळ्या नोटा आणि नाण्यांची संख्या आणि त्यांच्या वेगाच्या आधारावर पैशाच्या वेगाची गणना केली जाऊ शकते आणि याच आधारावर पैसे जारी केले जातात. जोपर्यंत सोने किंवा चांदीचे पैसे किंवा त्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इतर धातूंच्या नाण्यांचा किंवा परिवर्तनीय (convertible) कागदी पैशाचा संबंध आहे, तर मुद्दा सोपा आहे: जर आवश्यकतेपेक्षा जास्त पैसे जारी केले गेले तर ते अभिसरणातून बाहेर जाऊन निष्क्रिय होतात आणि त्याचे निष्क्रिय ढिगारे बनतात. परंतु जर आपण अपरिवर्तनीय (inconvertible) कागदी पैशांबद्दल बोलत असू, तर एखाद्या देशात माल अभिसरणात असलेल्या एकूण मालांची एकूण किंमत आणि पैशाच्या वेगानुसार ठरणाऱ्या स्वर्ण-पैशाच्या प्रमाणापेक्षा जास्त अपरिवर्तनीय कागदी पैसे जारी केले गेले, तर त्या कागदी पैशाचे मूल्य खाली घसरेल. **स्वर्ण-पैशामध्ये मालांचे मूल्य यामुळे प्रभावित होत नाही, परंतु अपरिवर्तनीय कागदी पैशाच्या मूल्यात घट झाल्यामुळे त्या कागदी पैशामध्ये मालांची किंमतसुद्धा घसरेल कारण स्वर्ण-पैशाच्या तुलनेत अपरिवर्तनीय कागदी पैशाचे मूल्य कमी होईल.** हे मार्क्सच्याच उदाहरणाने समजून घेऊ.

"कागदाचे ते तुकडे ज्यावर पैसा-नाव छापलेले असते, जसे की 1 पौंड, 5 पौंड इत्यादी, त्यांना राज्यसत्तेद्वारे बाहेरून अभिसरणाच्या प्रक्रियेत टाकले जाते. जिथपर्यंत ते सोन्याच्या समान प्रमाणाच्या बदल्यात वास्तवामध्ये संचरित होतात तिथपर्यंत त्यांची हालचाल मौद्रिक अभिसरणांच्या नियमांचेच प्रतिबिंब असते. कागदी पैशाच्या अभिसरणास विशिष्टपणे लागू होणारा कोणताही नियम केवळ त्याच प्रमाणातून निर्माण होऊ शकतो ज्या प्रमाणात कागदी पैसा सोन्याचे प्रतिनिधित्व करतो. सोप्या भाषेत नियम खालीलप्रमाणे आहे: जारी केलेल्या कागदी पैशाचे प्रमाण सोन्याच्या (किंवा चांदीच्या) त्या प्रमाणापर्यंत मर्यादित असले पाहिजे जे वास्तवात अभिसरणात आहे आणि ज्याचे प्रतीकात्मक पातळीवर प्रतिनिधित्व आता कागदी पैसा करत आहे. आता हे खरे आहे की अभिसरणाच्या क्षेत्राद्वारे शोषले जाऊ शकणारे सोन्याचे प्रमाण एका विशिष्ट सरासरी पातळीपेक्षा वरखाली कमी-जास्त होत राहते. परंतु असे असूनही, कोणत्याही देशात अभिसरणाचे माध्यम कधीच एका विशिष्ट किमान प्रमाणापेक्षा खाली येत नाही, जे अनुभवाच्या आधारे निश्चित केले जाऊ शकते. हे किमान प्रमाण त्याच्या घटक अंगांच्या रूपात सतत बदलत राहते, किंवा सोन्याच्या ज्या तुकड्यांपासून हे संपूर्ण प्रमाण बनलेले असते ते सतत बदलत असते, याचा स्वाभाविकरीत्या त्याच्या एकूण रकमेवर किंवा त्या निरंतरतेवर कोणताही परिणाम होत नाही ज्यासह ते अभिसरणाच्या क्षेत्रात प्रवाहित होत राहते. म्हणून त्याची कागदी प्रतीके त्याची जागा घेऊ शकतात. परंतु, अभिसरणाचे सर्व मार्ग जर आज पैशाला संपूर्णपणे शोषून घेण्याची क्षमता असलेल्या कागदी पैशाने भरून जातील, तर कदाचित पुढल्या दिवशी मालांच्या अभिसरणात येणाऱ्या चढ-उतारांमुळे ते आश्यकतेपेक्षा जास्त भरलेले असू शकतात. मग कोणतेही मानक शिल्लक राहणार नाहीत. जर कागदी पैसा त्याच्या उपयोगी मर्यादेपेक्षा जास्त असेल, म्हणजे त्याच मूल्य-वर्गाच्या सोन्याच्या नाण्यांची अशी रक्कम जी अभिसरणात असू शकली असती, तर सार्वत्रिक पातळीवर विश्वास गमावण्याच्या धोक्यासहीत तो मालांच्या जगातील सोन्याच्या तेवढ्याच प्रमाणाचे प्रतिनिधित्व करेल जे की त्याच्या अंतर्गत नियमांद्वारे निश्चित केले जाते. कागदी पैशाद्वारे यापेक्षा जास्त प्रमाणाच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्नच उद्भवत नाही. जर कागदी पैसा उपलब्ध सोन्याच्या प्रमाणाच्या दुप्पट प्रमाणाचे प्रतिनिधित्व करत असेल, तर मग व्यावहारिकदृष्ट्या 1 पौंड 1/4 औंस सोन्याचे पैसा-नाव राहणार नाही, तर ते त्याऐवजी 1/8 औंस सोन्याचे नाव बनेल. किंमतीचे मानक असण्याच्या सोन्याच्या कार्यात बदल झाल्याप्रमाणेच हा परिणाम असेल. म्हणजेच आधी 1 पौंड किंमत जेवढे मूल्य अभिव्यक्त करत होती, आता 2 पौंड किंमत तेवढेच मूल्य व्यक्त करेल. (*कार्ल मार्क्स, उक्त, पृ. 224-25*)

म्हणून मार्क्स स्पष्ट करतात की पैशाचे प्रमाण मालांच्या अभिसरणाद्वारे निर्धारित केले जाते आणि म्हणूनच वास्तविक किमती निर्धारित करण्याचा निकष पैशाचे प्रमाण नव्हे तर स्वतः मालांच्या अभिसरणाच्या परिस्थिती आहेत. या परिस्थितींमध्ये दोन मुख्य कारक आहेत: मालांच्या अभिसरणात असलेल्या सर्व मालांची एकूण किंमत आणि पैशाचा वेग. त्याला एका समीकरणाच्या पातळीवर असे समजू शकतो:

**पैशाचे प्रमाण = सर्व मालांची एकूण किंमत/पैशाचा वेग**

म्हणजे,

$$Q_m = \Sigma_P / V_m$$

ज्यामध्ये,

$Q_m =$ पैशाचे प्रमाण

$\Sigma_P =$ सर्व मालांची एकूण किंमत

$V_m =$ पैशाचा वेग

याला एका अगदी सोप्या उदाहरणाने समजून घेऊ. समजा सर्व मालांची एकूण किंमत रु. 100 आहे. जर पैशाचा सरासरी वेग 1 आहे, तर एकूण पैशाचे प्रमाण देखील तेवढेच म्हणजे रु. 100 लागेल. असे गृहीत धरा की समाजात फक्त एकाच मूल्य-वर्गामध्ये पैशाचे चलन आहे: रु. 10. अशावेळी रु. 10 च्या 10 नोटांची किंवा नाण्यांची आवश्यकता असेल. परंतु समजा की 10 रुपयाची एक नोट सरासरी दोन माल विनिमयांना पूर्ण करते, तर पैशाचा सरासरी वेग 2 होईल. या स्थितीमध्ये 100 रुपयांच्या मालांचे अभिसरण करण्यासाठी रु. 50 च्या किंमतीचे पैसे पुरेसे असतील. अर्थव्यवस्थेच्या प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारावर एखाद्या अर्थव्यवस्थेत एखाद्या विशिष्ट वेळी पैशाच्या सरासरी वेगाचा अंदाज लावला जाऊ शकतो आणि अनेक अर्थशास्त्रज्ञ तसे करतातही. यानुसार, मालांचे उत्पादन आणि अभिसरणात येणाऱ्या चढउतारांनुसार जरी करायच्या पैशाचे प्रमाण निर्धारित केले जाते, जे कधीही तंतोतंत असू शकत नाही कारण माल उत्पादनाची प्रक्रियाच उलथापालथीची आणि अराजक असते. परंतु एक अंदाजे प्रमाण म्हणून, सतत चालू असलेली प्रक्रिया म्हणून अर्थव्यवस्थेत याचे निर्धारण केले जात राहते.

जर पैशाचा वेग जास्त असेल तर ते दर्शविते की मालांचे अभिसरण सुरळीत पद्धतीने चालू आहे, त्यात फारसे अडथळे नाहीत, सामाजिक श्रम विभाजन परिमाणात्मक दृष्टीने तुलनेने योग्य स्थितीत आहे कारण ते दर्शवते की मालांची खरेदी-विक्री चांगल्या प्रवाहाने होत आहे, उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध तुलनेने अधिक सहजपणे हाताळला जात आहे. परंतु जर पैशाच्या वेगात गतिरोध असेल तर ते मालांच्या अभिसरणात अडथळा दर्शविते, मालांच्या खरेदी-विक्रीतील अडचणी दर्शविते आणि हे दर्शवते की अर्थव्यवस्थेत उपयोग-मूल्य आणि मूल्य यांच्यातील अंतर्विरोध योग्यरित्या हाताळला जात नाहीये. परंतु माल उत्पादकांना मात्र हे पैशाच्या तुटवड्यामुळे घडत आहे असे वाटते.

## मूल्याचे प्रतीक

**नाणी किंवा नंतरच्या कागदी नोटा दुसरे काही नसून मूल्याचे प्रतीक आहेत.** सोन्याने पैसा-माल म्हणून मालांच्या अभिसरणाच्या माध्यमाची भूमिका बजावण्यासाठी त्याने नाण्यांचे रूप घेणे अनिवार्य असते, जे की स्वतः काही नसून सोन्याच्या एका निश्चित प्रमाणाचे वजन असते, जे प्रमाण काल्पनिकरित्या मालांच्या किंमतींमध्ये अभिव्यक्त होते. मालांच्या अभिसरणामध्ये या नाण्यांना प्रत्यक्षात या मालांना भेटावे लागते. जेव्हा मालांचा एका निश्चित किंमतींवर या नाण्यांशी विनिमय होतो, त्यालाच खरेदी किंवा विक्री म्हणतात. या नाण्यांच्या निर्मितीचे काम राज्यसत्ता करते, अगदी त्याचप्रमाणे ज्याप्रमाणे ती किमतीच्या मानकांना ठरवण्याचे काम करते. परंतु जागतिक बाजारपेठेत हे विविध पैसे त्यांचे विशिष्ट स्वरूप, म्हणजे त्यांचा "राष्ट्रीय पोशाख" सोडून त्यांच्या मूळ स्वरुपात, म्हणजे सोन्याच्या रूपात परत येतात. सोने आणि पैशामध्ये फरक केवळ भौतिक स्वरुपात आहे आणि ते माल अभिसरणाच्या क्षेत्रानुसार आणि गरजेनुसार एका स्वरूपातून दुसऱ्या स्वरूपात जाऊ शकतात.

मार्क्स स्पष्ट करतात की मालांच्या अभिसरण प्रक्रियेत सोन्याची नाणी झिजतात. परिणामी, ते सोन्याच्या त्या प्रमाणाचे प्रतिनिधित्व करण्यायोग्य राहत नाहीत ज्याची मोहोर किंमतीचे मानक म्हणून राज्य टांकसाळीने त्यावर मारली आहे. उदाहरणार्थ, जर 1 रुपया 0.1 ग्रॅम सोन्याचे प्रतिनिधित्व करत असेल, तर माल अभिसरणादरम्यान झीज झाल्यामुळे ते भौतिकरीत्या आता 0.05 ग्रॅम एवढेच राहिले आहे, परंतु कार्यात्मक आणि प्रतीकात्मकदृष्ट्या ते अजूनही 0.1 ग्रॅम सोन्याचेच प्रतिनिधित्व करत आहे. यामुळे मध्ययुगाच्या सुरुवातीस, जगभरातील राज्यांनी नाण्यांमधील मूळ सोन्याचे प्रमाण कमी करण्यास आणि त्याला इतर धातूंसोबत मिसळण्यास सुरुवात केली आणि नंतर पूर्णपणे तांबे, कांस्य इत्यादींसारख्या इतर धातूंपासून नाणी तयार करणे सुरु केले, जे कार्यात्मक आणि प्रतीकात्मकदृष्ट्या अजूनही तेवढ्याच सोन्याच्या प्रमाणाचे प्रतिनिधित्व करत होते. यामुळे सर्व राज्यसत्तांना त्यांच्या शाही खर्चाची, उधळपट्टीची आणि शासक वर्गाच्या चैनीची व्यवस्था करण्याची संधी मिळाली आणि त्याच वेळी शाही कर्जाची परतफेड करणे देखील सोपे झाले.

तर अशाप्रकारे नाण्यांची वास्तविक अंतर्वस्तू आणि त्यांची **नाममात्र म्हणजे अंकित** अंतर्वस्तूमध्ये फरक निर्माण झाला, ज्याने त्यांच्या **धातू-भौतिक** अस्तित्वाला त्यांच्या प्रतीकात्मक-कार्यात्मक अस्तित्वापासून वेगळे केले. यातूनच कागदी पैशाच्या जन्मासाठी आधार तयार झाला, कारण जर सोन्याच्या विशिष्ट प्रमाणाचे (जे की स्वतः मूल्याचे माप आणि किमतीचे मानक आहे) तांबे किंवा पितळाच्या नाण्याद्वारे प्रतीकात्मक व कार्यात्मकरित्या प्रतिनिधित्व केले जाऊ शकते, तर हेच काम इतर साहित्यापासून बनलेले दुसरे प्रतीक का नाही करू शकत? ही परिस्थिती कागदी पैशाच्या उदय आणि विकासाचा आधार होती. अशा कागदी पैशाला केवळ सामाजिक आणि कायदेशीर वैधता आवश्यक होती जी की राज्यसत्ता देते.

हे संक्रमण यामुळे देखील अपरिहार्य होते कारण अत्यंत कमी मूल्याच्या मालांचा आणि अगदी कमी प्रमाणातील विनिमयासाठी सोन्याच्या अतिशय छोट्या प्रमाणाचे नाणे बनवणे कठीण होते. परिणामी, अत्यंत कमी प्रमाणात सोन्याचे प्रतिनिधित्व करणारी इतर धातूंची नाणी आणि नंतर कागदी नोटा येणे अपरिहार्य होते. ही छोटी नाणी आणखी तीव्र गतीने झिजतात. कागदी पैशाच्या उदयात त्यांची विशेष भूमिका होती. साहजिकच याला जारी करण्याचे कामसुद्धा राज्यसत्ताच करू शकते, कारण राज्यसत्तेद्वारे कायदेशीर मान्यता आणि भरवशाशिवाय कागदी नोट काय आहे? केवळ कागदाचा एक तुकडा ज्याला कोणीही पैसा म्हणून स्विकारणार नाही, जर त्याच्या मागे राज्यसत्तेची कायदेशीर स्वीकार्यता आणि मान्यता नसेल. जसे की आपण वर बघितले, पूर्वी सर्व कागदी नोटा सोन्यामध्ये परिवर्तनीय (convertible) होत्या आणि राज्यसत्ता आश्वासन द्यायची की त्यावर नोंदवलेल्या दर्शनी मूल्यानुसार त्याबदल्यात वास्तविक सोने दिले जाईल. अपवादात्मक परिस्थिती वगळता त्याची गरज नसल्यामुळे कोणीही असे करायचे नाही, परंतु जर कोणी अशी मागणी केली तर ती सत्तेने पूर्ण करणे बंधनकारक होते. त्यामुळे कोणतीही राज्यसत्ता माल उत्पादनाचे प्रमाण आणि त्यानुसार आपल्या सोन्याचा साठा याच्या आधारावरच कागदी नोटा जारी करत असे. अपरिवर्तनीय कागदी नोटा (inconvertible paper notes) आल्यानंतर विविध राज्यसत्तांनी त्यांच्या माल उत्पादन आणि सोन्याच्या साठ्यापेक्षा जास्त

पान 10 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 10

पान 9 वरून

कागदी नोटा जारी केल्या, ज्याच्या परिणामी कागदी नोटेचे अवमूल्यन आणि चलनवाढ झाली. यामुळे ना माल उत्पादनाच्या वास्तविक प्रमाणामध्ये कोणता फरक पडायचा, ना त्याच्या वास्तविक मूल्यामध्ये काही फरक पडायचा, ना सोन्याच्या वास्तविक मूल्यामध्ये व प्रमाणामध्ये काही पडायचा आणि ना ही मालांच्या सोन्यामध्ये (सोन्यासोबत त्याचा विनिमय दर) किंमतीत काही पडायचा. जर काही फरक पडायचा तर तो केवळ (एक माल म्हणून सोन्यासह) सर्व मालांच्या कागदी पैशामध्ये अभिव्यक्त होणाऱ्या किमतींवर पडत होता. कारण हे  की अजूनही या अपरिवर्तनीय कागदी नोटा स्वर्ण-पैशाद्वारे समर्थित होत्या, अजूनही सोनेच मूल्याच्या वास्तविक मापाचे काम करत होते, भलेही कागदी नोटेचा 1 रुपया पूर्वी 0.1 ग्रॅम सोन्याचे प्रतिनिधित्व करत असेल आणि नंतर स्वर्ण-पैशापेक्षा अधिक प्रमाणात जारी केल्यामुळे आता 2 रुपये 0.1 ग्रॅमचे प्रतिनिधित्व करत असेल. यामुळे फक्त तोच फरक पडतो जो तेव्हा पडला असता जेव्हा किंमतीच्या मानकांमध्ये राज्यसत्तेने बदल केला असता, म्हणजे तिने असे म्हटले असते की जेवढे मूल्य आधी 1 रुपयाच्या किंमत-नावाने अभिव्यक्त केले जात होते, तेच आता 2 रुपयाच्या किंमत-नावाने अभिव्यक्त होईल. **परंतु यामुळे आणखी एक फरक पडतो. जर अपरिवर्तनीय कागदी नोटा आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात जारी केल्या गेल्या आणि त्यांचे अवमूल्यन झाले, म्हणजे चलनवाढ झाली, तर मजुरी किंवा वेतन मिळवणाऱ्या वर्गाचे वास्तविक उत्पन्न कमी होते.** कामगार वर्गाच्या संघर्षाद्वारे मजुरी वाढवण्याला उत्तर म्हणून भांडवलदार वर्ग अनेकदा महागाईचा मार्ग अवलंबतो, जेणेकरून कामगारांचे नाममात्र वेतन तर तेवढेच राहावे, परंतु वास्तविक वेतन कमी व्हावे आणि त्यांचा नफा वाढावा.

**हे लक्षात ठेवले पाहिजे की 'अपरिवर्तनीय' (incovertible) हा शब्द थोडा भ्रामक आहे. कोणत्याही माल उत्पादक व्यवस्थेमध्ये पैसा नेहमी मालांमध्ये परिवर्तनीय असतो. फक्त अपरिवर्तनीय कागदी नोटेचा विनिमय सरकारी बँकेच्या खिडकीवर सोन्यासोबत होत नाहीत. एखादा व्यक्ती या कागदी नोटेने बाजारात सोने नक्कीच खरेदी करू शकतो.**

पुढील प्रकरणामध्ये आपण बघूया की जेव्हा 1970 च्या दशकापासून सोने किंवा कोणत्याही पैसा-मालाचा आधार नसलेल्या कागदी नोटा (fiat currency not backed by any commodity-money) अस्तित्वात आल्या, तेव्हाही मार्क्सचा पैशाचा सिद्धांत लागू करून त्याला समजता येऊ शकते, ना की पैशाचा प्रमाण सिद्धांत लागू करून, ज्यानुसार सरकार मनमर्जीने कितीही प्रमाणात पैसे जारी करून पैशाचे मूल्य आणि किंमतींची सरासरी पातळी ठरवू शकते. आपण बघू की सध्याच्या कागदी पैशाला सोन्याचा आधार नाही, परंतु याचा अर्थ असा नाही की त्याला कोणत्याही कारकाचा पाठिंबा नाही. अजूनही त्याचे मूल्य मूल्याच्या श्रम सिद्धांताद्वारे प्रसृत नियमांद्वारेच निर्धारित केले जाते, परंतु कोणत्याही एका पैसा-माल (उदाहरणार्थ, सोने किंवा चांदी) द्वारे नाही. हे कसे होते ते आपण पुढील अध्यायात पाहू. आता आपण चालू चर्चेकडे वळूया.

धातूची नाणी व कागदी नोटांसारख्या मूल्याच्या या प्रतिकांसोबत हेच होते की पैशाचे भौतिक-धातू अस्तित्व त्याच्या कार्यात्मक-प्रतीकात्मक अस्तित्वाद्वारे गिळंकृत केले जाते किंवा शोषले जाते. सोने हे अजूनही मूल्याचे माप आणि किंमतीचे मानक आहे, परंतु ते आता भौतिक पातळीवर अभिसरणाचे माध्यम राहिलेले नाही.

## पैशाची इतर काही कार्ये

मार्क्स सांगतात की पैसा हा असा माल आहे ज्याचा इतर कोणत्याही मालासोबत विनिमय केला जाऊ शकतो, म्हणजेच तो निरपेक्षपणे विनिमेय (absolutely alienable) आहे. त्याचे कारण असे की तो साक्षात मूल्याचा अवतार (incarnation of value) आहे, अवतीर्ण मूल्य (value embodied) आहे, मूल्याचे स्वतंत्र रूप आहे. **म्हणून एका माल उत्पादक समाजात तो संपत्तीचे मुख्य रूप देखील बनतो. ज्याअर्थी तो संपत्तीचे मुख्य रूप बनतो, त्यामुळे त्यामुळे प्रत्येक जण पैशाचा साठा करू इच्छितो, त्याचे ढीग जमा करू पाहतो.** पैशाची साठवणूक करण्याचा (hoarding of money) अर्थ एका माल उत्पादक समाजात हा आहे की मालाचे पहिले रूपांतर म्हणजे 'माल - पैसा' तर केले गेले परंतु दुसरे रूपांतर म्हणजे 'पैसा - माल' पूर्ण करण्याऐवजी पैशाला जमा करण्यात आले. या प्रवृत्तीमुळे माल उत्पादक समाजातील सर्व उत्पादक आपला उपभोग कमीत-कमी करण्याचा प्रयत्न करतात,  जास्तीत जास्त तास काम करतात आणि त्याद्वारे काही पैसे वाचवण्याचा प्रयत्न करतात. साहजिकच, त्यांच्यामध्ये काहीच असे अपवाद असतात जे या पद्धतीने भांडवलदारांमध्ये रूपांतरित होऊ शकतात. भांडवलदार वर्गाच्या तयार होण्याचे मुख्य स्त्रोत दुसरे आहेत.

साठवणुकीचे माध्यम असण्याव्यतिरिक्त पैसा आणखी एक महत्त्वाची भूमिका बजावतो: **देयकाचे (परतफेडीचे) साधन.** जसजसे माल-उत्पादक समाजात विनिमयाचे जाळे सघन होत जाते, तसतसे समान पक्षांमधील विनिमय वारंवार होऊ लागतो. जेव्हा असे घडते तेव्हा ते पैशाचा उपयोग देयकाचे माध्यम म्हणून करण्यास सुरु करतात. याचा अर्थ असा की दोन पक्ष जे वारंवार मालांचा विनिमय करतात, ते   वर्षभर मालांचा विनिमय पैशाचा वापर न करता करतात आणि वर्षाच्या शेवटी उरलेल्या रकमेची परतफेड पैशात केली जाते. उदाहरणार्थ, समजा की एक माल उत्पादक शेतकरी आणि कृषी उपकरणे बनवणारा कारागीर यांच्यात वर्षभर कृषी उत्पादने आणि कृषी उपकरणांची देवाणघेवाण होते; वर्षअखेरीस कृषी उत्पादने आणि कृषी उपकरणांच्या एकूण मूल्याच्या तुलनेच्या आधारावर जर शेतकऱ्याने कारागिराला रु. 100 चा माल अधिक दिला असेल तर कारागीर वर्षाच्या शेवटी रु. 100 रुपयाची परतफेड करून विनिमयातील असमतोल दूर करेल. असेच तेव्हासुद्धा होऊ शकते जेव्हा दोन मालांचा उत्पादन कालावधी भिन्न असेल आणि त्यांना उत्पादित करणाऱ्या माल उत्पादकांमध्ये नियमित विनिमय होत असेल. अशा परिस्थितीत, कमी कालावधीत उत्पादित होणाऱ्या मालाचा माल उत्पादक आपला माल दुसऱ्या माल उत्पादकाला देत राहतो, ज्याची नोंद खात्यात होत राहते; नंतर, दीर्घ कालावधीत उत्पादित होणाऱ्या मालाचा माल उत्पादक आपला माल पहिल्या माल उत्पादकाला देतो आणि खात्यात त्याच्यावर झालेल्या देयाची परतफेड करतो. जसे पैसे देयकाचे माध्यम म्हणून वापरले जाऊ लागते, तसेच **खात्याचे पैसे (money of account)** म्हणून देखील पैशाचा उपयोग होऊ लागतो. स्पष्ट आहे की असे होण्यासोबतच एका माल-उत्पादक आणि विशेषतः भांडवलशाही अर्थव्यवस्थेत विविध प्रकारचे धोके निर्माण होतात. उदाहरणार्थ, ज्या वेळी एखाद्या पक्षाची देय रक्कम परतफेड होणे ठरलेले आहे, जर त्याच वेळी एखादे औद्योगिक किंवा व्यावसायिक संकट उद्भवले, जे नेहमीच स्वतःसोबत मौद्रिक संकटसुद्धा घेऊन येते, तर ती दुसऱ्या पक्षासाठी धोक्याची घंटा असते. मार्क्स लिहितात:

"देयकाच्या माध्यमाच्या रूपातील पैशाच्या कार्यामध्ये एक अंतर्विरोध अंतर्निहित आहे. जेव्हा देयके एकमेकांना संतुलित करतात,  तेव्हा पैसे केवळ खात्याचे पैसे (money of account) या रूपामध्ये,  एक मूल्य मोजण्याचे साधन म्हणून काम करतात. परंतु जेव्हा प्रत्यक्ष परतफेड करायची असते, तेव्हा पैसा मंचावर अभिसरणाच्या एका माध्यमाच्या स्वरूपात, म्हणजे सामाजिक चयापचयातील एका मध्यस्थाच्या संक्रमणशील रूपात प्रकट होत नाही, तर सामाजिक श्रमाच्या वैयक्तिक अवताराच्या स्वरूपात, म्हणजेच विनिमय-मूल्याचे स्वतंत्र अस्तित्व-वैश्विक मालाच्या स्वरूपात प्रकट होतो. हा अंतर्विरोध औद्योगिक आणि व्यावसायिक संकटाच्या त्या पैलूमध्ये बाहेर पडतो ज्याला आपण मौद्रिक संकट म्हणून ओळखतो. अशा प्रकारचे संकट केवळ तिथेच दिसून येते जिथे चालू देयकांची एक संपूर्ण शृंखला पूर्णपणे विकसित झालेली असेल आणि सोबतच त्यांच्या निपटाऱ्याची एक कृत्रिम प्रणाली देखील विकसित झालेली असेल." *(कार्ल मार्क्स, उक्त, पृ. 235-36)*

मार्क्स इथे सांगतात की, ज्या विश्वासार्हतेच्या आधारावर सर्व माल उत्पादक आपापसात मालांचा विनिमय करत असतात आणि विश्वासाने एक कालावधीनंतर व्यापारातील नफा किंवा तोट्याला पैशाच्या माध्यमातून परतफेड करून संतुलित करत असतात, त्याचा विश्वासाला संकटकाळात तडा जातो आणि प्रत्येकाला आपली शिल्लक पैशाच्या रूपात वास्तवीकृत करायची असते, परंतु संकटाच्या वेळी प्रत्येकाचीच शिल्लक एकमेकांमध्ये अडकलेली असते. परिणामी, ही उधार व्यवस्था (credit system) अचानक मौद्रिक व्यवस्थेत (monetary system) बदलते आणि नगदीच्या स्वरूपात आपला नफा-तोटा निर्धारित करण्यासाठी सर्व भांडवलदार/माल उत्पादकांमध्ये धावपळ सुरु होते. अशा वेळी मालांचे महत्त्व धूसर होते आणि माल उत्पादकांसाठी जी गोष्ट महत्त्वाची राहते ती म्हणजे स्वतंत्र मूल्य स्वरूप अर्थात  पैसा. मार्क्स स्पष्ट करतात:

"पतप्रणालीचे असे अचानक मौद्रिक व्यवस्थेत बदलणे हे वास्तवात आधीच अस्तित्वात असलेल्या भीतीच्या वातावरणात वैचारिक अचंब्याची भावनासुद्धा जोडते आणि अभिसरणाच्या प्रक्रियेचा अभिकर्ता आपल्याच संबंधांभोवती असलेल्या अभेद्य गूढतेच्या पडद्याने जणू काही घाबरून जातो." (कार्ल मार्क्स, 1977, *ए कॉंट्रीब्युशन टू दि क्रिटिक ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी*, प्रगती प्रकाशन, मॉस्को, पृष्ठ 146)

तथापि, जसजसे पैसा हा देयकाचे माध्यम म्हणून आणि खात्याचे पैसे (money of account) म्हणून वापरला जातो, तसतसे पैशाचा वेग आणखी वाढतो कारण पैशाचा भौतिक वापर न करता, म्हणजे अभिसरणाच्या भौतिक माध्यमाच्या रूपात पैशाचा वापर न करता मोठ्या प्रमाणात मालांचा विनिमय होतो. याच प्रक्रियेत एक क्रेडिट किंवा कर्ज प्रणाली देखील विकसित होते. क्रेडीट-पैशाचा जन्म वास्तवात प्रत्यक्षपणे पैशाच्या देयकाचे साधन म्हणून वापरातूनच होतो आणि जसजसे हे क्रेडिट-पैसे विकसित होतात, तसतसे पैशाचा देयकाचे साधन म्हणून उपयोग आणखी वाढतो. मार्क्स लिहितात:

"क्रेडिट-पैसा (कर्ज- किंवा उधार-पैसा) देयकाच्या साधनाच्या रूपात पैशाच्या उपयोगातून उद्भवतो, जसे की आधीपासून खरेदी केलेल्या मालांसाठी दिल्या गेलेल्या त्या उधार-प्रमाणपत्रांमध्ये, आणि ही उधार-प्रमाणपत्रेच स्वतःचे कर्ज दुसऱ्यांकडे हस्तांतरित करण्यासाठी प्रसारित होऊ लागतात. दुसरीकडे, देयकाच्या साधनाच्या रूपातील पैशाचे कार्य देखील त्याच प्रमाणात विस्तारित होते ज्या प्रमाणात क्रेडिट-पैसा विस्तारित होतो. देयकाचे साधन म्हणून उपयोग होणारा पैसा आपल्या अस्तित्वाच्या विशिष्ट स्वरुपांना ग्रहण करत जातो, ज्यामध्ये तो मोठ्या प्रमाणावर व्यावसायिक व्यवहारांच्या क्षेत्रात अस्तित्वात असतो. दुसरीकडे, सोने आणि चांदीची नाणी मुख्यतः किरकोळ व्यापाराच्या क्षेत्रापुरती मर्यादित राहतात. (कार्ल मार्क्स, 1982, *कॅपिटल*, खंड-1, पेंग्विन संस्करण, पृष्ठ 238)

म्हणजे, जसजसे पैसा देयकाचे साधन म्हणून विकसित होत जातो, तसतसे क्रेडिट आणि डेबिटची प्रमाणपत्रे प्रसारित होऊ लागतात आणि देयक प्राप्त करण्याचे किंवा देण्याचे साधन बनतात. हे क्रेडिट-पैशाचेच उदाहरण आहे. भांडवली माल उत्पादनाच्या विकासासह त्याचे विविध प्रकार तयार होतात. बॉण्ड्स, शेअर्स, स्टॉक्स इत्यादीसुद्धा क्रेडिट-पैशाचाच एक प्रकार आहे.

पैशाचे शेवटचे कार्य ज्याबद्दल मार्क्स बोलतात ते आहे **वैश्विक पैसा**, म्हणजे पैशाचे ते स्वरूप ज्यामध्ये ते एकाच अर्थव्यवस्थेत होणाऱ्या मालांच्या अभिसरणामध्ये नव्हे तर विविध अर्थव्यवस्थांमध्ये होणाऱ्या मालांच्या अभिसरणामध्ये म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापारात होणाऱ्या मालांच्या अभिसरणामध्ये आपली भूमिका बजावतो. मार्क्स सांगतात की आंतरराष्ट्रीय व्यापारात पैसा त्याचे सर्व राष्ट्रीय पोशाख फेकून देतो आणि त्याच्या खऱ्या मूळ स्वरूपात, म्हणजे सोने/चांदीच्या रूपात प्रकट होतो. येथे स्वर्ण पैशाचा उपयोग व्यापार संतुलन ठेवण्यासाठी देयकाचे माध्यम म्हणून, मालांच्या खरेदी-विक्रीसाठी प्रत्यक्षपणे अभिसरणाचे माध्यम म्हणून आणि संपत्तीचे वैश्विक स्वरूप म्हणून केला जातो. निश्चितच विसाव्या शतकाच्या सुरूवातीस आंतरराष्ट्रीय पैसा म्हणून सोन्याची जागा काही आघाडीच्या देशांच्या, विशेषत: अमेरिका आणि ब्रिटनच्या पैशांनी आणि नंतर दुसऱ्या महायुद्धानंतर, केवळ अमेरिकन पैसा डॉलरने घेतली. याचे कारण म्हणजे अमेरिकेन पैसा स्वर्ण-समर्थित होता, जेव्हाकी इतर देशांचा पैसा डॉलर-समर्थित होता, म्हणजेच त्यांचा डॉलरसोबत विनिमयाचा निश्चित दर होता, आणि डॉलरचा स्वतः सोन्यासोबत विनिमयाचा निश्चित दर होता. दुसऱ्या महायुद्धानंतर हा विनिमय दर 35 डॉलर = 1 औंस (सुमारे 28 ग्रॅम) सोने एवढा होता. हे पैसे वेगवेगळ्या वेळी आंतरराष्ट्रीय पैसे म्हणून यामुळे स्वीकारले गेले कारण ते सोन्यामध्ये परिवर्तनीय होते, त्याद्वारे समर्थित होते आणि सोन्याचेच प्रतीक होते. 1970 च्या दशकात डॉलर-स्वर्ण मानक रद्द झाल्यानंतर अस्थायी-चलन (floating currency) आणि अस्थायी-विनिमय दर (floating exchange value) असलेली जी मौद्रिक व्यवस्था उदयास आली ती नक्कीच स्वर्ण समर्थित नाहीये, परंतु अजूनही सर्व पैशांचे मूल्य हे मूल्याच्या श्रम नियमानेच निर्धारित होते आणि त्याला केवळ मार्क्सच्या पैशाच्या सिद्धांताद्वारेच योग्य आणि वैज्ञानिकदृष्ट्या समजल्या जाऊ शकते. पुढील प्रकरणामध्ये आपण यावरच लक्ष केंद्रित करूया आणि बघूया की सोन्याचे समर्थन नसलेला अपरिवर्तनीय कागदी पैसा, जो की अस्थायी-विनिमय दराने निर्धारित आहे, कशा प्रकारे मार्क्सने शोधलेल्या सामान्य नियमांचे, मूलत: मूल्याच्या श्रम सिद्धांताचेच पालन करतो, ना की त्याचे खंडन करतो.

(पुढील अंकात चालू)

(मूळ लेख: मजदूर बिगुल, मार्च 2023; मराठी अनुवाद: जयवर्धन)

# उजव्या विचाराचे एनफ्ल्युएंसर्स (प्रभावक): फॅशिस्ट विखारी प्रचाराची महामारी






✎ **ललिता**

हिटलरच्या नाझी जर्मनीतील मुख्य प्रचारक जोसेफ गोबेल्सपासून भारतातील सध्याच्या फॅशिस्ट भाजप सरकारांची गरज असते की, लोकांना धार्मिक, जातीय, वांशिक अशा अस्मितावादी विचारापासून दूर न जाऊ देण्यासाठी फॅशिस्ट प्रचाराला सतत तेवत ठेवावे, आणि कोणत्यातरी कथित "इतरां"पासून धोका आहे, ही जाणीव निर्माण करत रहावी. लोक फॅशिस्टांच्या गारुडाखाली रहावेत यासाठी, जनतेला, विशेषतः बेरोजगार, निराश तरुणांना जे कामगार वर्ग आणि निम्न मध्यमवर्गातून येतात, खोट्या शत्रूंविरुद्ध सतत रागात ठेवण्यासाठी प्रचारकांच्या फौजेची गरज आहे. खोटा शत्रू म्हणजे आज एखादा मुस्लिम, किंवा सरकारचा टीकाकार किंवा जो हिंदू अंधराष्ट्रवादी विचारांचा नाही. सतत द्वेषाचे वातावरण तयार करण्यासाठी आणि जनतेच्या आयुष्यातील सर्व समस्यांचे उत्तर देण्याचा आभास निर्माण करण्यासाठी फॅशिस्टांना एक मजबूत व्यक्तिमत्व असलेल्या आणि वरवर स्पष्टपणे पण खोटी मतं व्यक्त करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची आवश्यकता आहे. आज, उजव्या विचारसरणीच्या प्रभावकर्त्या (एन्फ्ल्युएंसर्स) लोकांचा उदय आणि त्यांच्या अनुयायांचे कडबोळे नेमके तेच करत आहे. हे प्रभावक दररोज व्हिडिओ, इन्फोग्राफिक्स, लेख, अध्यात्म, धर्म, “सनातन भारताचा अचूक भारतीय इतिहास”, जीवन, विश्व आणि प्रत्येक गोष्टीबद्दल पॉडकास्ट करतात जेणेकरुन जनतेला विषाचा दैनंदिन डोस दिला जाईल आणि मोदी राजवटीचे एक खोटे गुलाबी चित्र दाखवले जाईल. व्यापक गरिबी, बेरोजगारी आणि जनतेच्या दुःखाला कारणीभूत असलेल्या सध्याच्या भांडवलशाहीचे संकट आणि त्याचे फॅशिझममध्ये झालेले पतन याची जाणीव होण्यापासून रोखण्यासाठी हे प्रभावक जनतेला खोट्या मुद्द्यांमध्ये अडकवून ठेवतात.

## जीवनशैलीचे प्रभावक, जे तरुणांना उजव्या विचारांकडे ढकलतात

भारतात 1.2 अब्ज पेक्षा जास्त इंटरनेट वापरकर्ते आहेत आणि तो चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी ऑनलाइन बाजारपेठ आहे. इंटरनेटवर अप्रतिबंधित प्रवेश आणि सामग्रीचा महापूर दररोज फोनवर भरभरून येत असल्याने, सोशल मीडिया प्रभावकांच्या वाढीसाठी ते एक सुपीक मैदान आहे. लोकांना काय खायचे, कसे कपडे घालायचे, कोणते संगीत किंवा चित्रपट वापरायचे हे शिकवणारे लाखो अनुयायी असलेले प्रभावक निरंतर अनुयायी गोळा करतात, आणि या देशातील असुरक्षित, दिशाहीन, परात्मभावी तरुणांचे आश्रयदाते बनतात. हे तरुणही स्वतःपेक्षा जास्त त्यांच्यावर विश्वास ठेवतात. पेड प्रमोशन, जाहिराती, बेटींगसहित विविध कंपन्यांच्या जाहिरातींसह, हे प्रभावक फक्त पैशासाठी सर्व प्रकारच्या उत्पादनांचा प्रचार करतात. अनेकांनी तर सरकारशी संगनमत करूनही मोठ्या प्रमाणात पैसे घेतले आहेत.

**बीअर-बायसेप्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रणवीर अल्लाबडिया** सारख्या युट्युबरचे लाखो फॉलोअर्स आहेत आणि ते हिंदू धर्म, ज्योतिष, अलौकिक भूतबाधा वगैरे, आणि भूराजनीती सारख्या विविध विषयांवर, स्मृती इराणी सारख्या भाजप समर्थक व्यक्तीला त्यांच्या पॉडकास्टवर बोलावून, मोठ्या डोससह लघु स्वरूपातील प्रचारकी सामग्री तयार करतात. सुरुवातीला ही खाती "महिलांना प्रभावित करण्यासाठी", तंदुरुस्त राहण्यासाठी, "सकारात्मक राहण्यासाठी" प्रेरक व्हिडिओ म्हणून सुरू झाली होती, परंतु नंतर त्यांना कळले की जातीय राजकारणाने मनं विषारी करणे अधिक फायदेशीर आहे. **यूट्यूबवर 27 दशलक्ष सदस्यांसह संदीप माहेश्वरी** प्रेरक व्हिडिओ बनवायचे परंतु आता आपल्या प्रेक्षकांना प्रभावित करण्यासाठी मोदींचे शब्द वापरतात. **टेक्निकल गुरुजी** प्रथम गॅजेट्स आणि तंत्रज्ञानाचा आढावा घेऊन उपभोगवादी संस्कृतीत चालना देत होते, परंतु आता केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासारख्या मंत्र्यांना त्यांच्या शोमध्ये आमंत्रित करून फॅशिस्ट राजवटीचे तळवे चाटण्याचा एक साइड बिझिनेस त्यांनी सुरू केला आहे. **अभि आणि नियू या जोडप्याने** सुरुवातीला मराठी आणि मुंबईस्थित मध्यमवर्गीयांसाठी शाश्वत विकास, प्रवास आणि इतिहास या विषयावर व्हिडिओ बनवले होते, पण त्यांना च लक्षात आले की सरकारचा प्रचार आणि बचाव करण्यात मोठा पैसा आहे आणि त्यांनी निवडणूक बॉंड घोटाळा आणि जातीयवादी कामगार-विरोधी सी.ए.ए.-एन.आर.सी. सारख्या घटनांमध्ये सरकारचा बचाव करण्यासाठी सरळ प्रचार केला. लोकसभा निवडणुकीच्या अगोदर, दिल्ली येथे ‘राष्ट्रीय निर्माते पुरस्कार’ सोहळा आयोजित करण्यात आला होता ज्यामध्ये रणवीर/बीअर बायसेप्सला वर्षातील सर्वोत्कृष्ट विस्कळकाचा (डिसरप्टर) पुरस्कार देण्यात आला. सरकार आणि उजव्या विचारसरणीचा सामग्रीचा प्रचार करण्यात प्रभावक व्यक्तींनी केलेल्या सेवेची पावती देण्यासाठी हे पुरस्कार देण्यात आले होते, हे अगदी स्पष्टपणे दिसून येते.

सोशल मीडियावर **कर्ली टेल्स या नावाने प्रसिद्ध असलेल्या कामिया जानीला,** जिला इव्हेंटमध्ये सर्वोत्कृष्ट ट्रॅव्हल क्रिएटर गटात पुरस्कार मिळाला होता, तिला अलीकडच्या काळात तिची मांडणी बदलल्याबद्दल टीकेचा सामना करावा लागला. **उजव्या विचारांचा युट्युबर एल्विश यादव,** ज्याला मार्चमध्ये रेव्ह पार्ट्यांमध्ये सापाचे विष विकल्याबद्दल अटक करण्यात आली होती, तो मोदी सरकारच्या टीकाकारांना खोटे ठरवणारे द्वेषाने भरलेले व्हिडिओ पोस्ट करण्यासाठी ओळखले जातो. सरकारी नोकरीसाठी धडपडणाऱ्या उमेदवारांचे अनेक आवडते सामान्यज्ञान चॅनेल सरळ सरळ फॅशिस्ट प्रचारयंत्रणा आहेत आहेत. **प्लॅकार्ड गाय रोहन पंड्या, स्किन डॉक्टर, सनातनी डॉक्टर** यांसारखी खाती, महिलांविरुद्धच्या गुन्ह्यामध्ये धार्मिक बाजू निर्माण करण्यासाठी, मुस्लिमांची विधाने शोधत त्याविरोधात धर्मवादी प्रचार करण्यासाठी किंवा लव्ह जिहादच्या खोट्या केसेस समोर आणण्यासाठी, आणि ट्विटरवर अपराध्यांना पकडण्यासाठी ट्विट्-स्टॉर्म चालवण्यासाठी किंवा धार्मिक बाजू असू शकणाऱ्या बातम्यांचा मागोवा घेणारी, देखरेख करणारी खाती चालवतात. अशा जातीय पोस्ट ते तणाव थांबवण्याच्या उद्देशाने नव्हे तर त्याला वाढवण्याच्या आणि समाजात अधिक द्वेष पसरवण्याच्या हेतूने करतात! काही निर्माते **अगदी उघडपणे दररोज मुस्लिमांविरुद्ध हिंसाचाराचे आवाहन करतात.** त्यांच्या दैनंदिन पोस्टमध्ये हिंदूंना कसे लक्ष्य केले जाते, अपमानित केले जाते, त्यांच्यावर हल्ले केले जातात आणि म्हणून आपण जिहादी-इस्लामवादी अशा मुस्लिमांपासून सावध राहिले पाहिजे असे मांडले जाते, परंतु त्याच्या परिणाम मात्र सर्व मुस्लिमाविरोधात द्वेष निर्माण होण्याचा असतो; नरसंहाराच्या नाऱ्याने भरलेल्या हजारो टिपण्या त्यावर येतात. काही अधिक लोकप्रिय कट्टरपंथी प्रादेशिक खाती आहेत जी दररोज मुस्लीमांवर आणि सरकारच्या टीकाकारांवर हिंसाचारासाठी तुतारी फुंकण्याचे काम करतात.

अशा व्हिडिओ आणि सामग्रीला भारतातील त्या इंटरनेट वापरकर्त्यांमध्ये मोठा आधार मिळाला आहे जे प्रादेशिक भाषा बोलतात. हे प्रभावक, जे स्वत: प्रादेशित भाषेत बोलतात, ते साम्यवादाच्या दुष्कृत्यांबद्दल बोलतात, डावे विचारवंत, ध्रुव राठी, रवीश कुमार किंवा देशभक्त यांसारख्या जास्त फॉलोअर असलेल्या उदारमतवादी विचाराच्या सर्व समीक्षकांना असे प्रस्तुत करतात की ते भारतीयांचा ब्रेनवॉश करण्याचा प्रयत्न करणारे डावे आहेत. त्याचा थोडक्यात हा प्रयत्न आहे की सर्व संघ-भाजप विरोधी लोक चुकीचे आहेत.

काही हिंदी यूट्यूब चॅनेल इतके लोकप्रिय आहेत की उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अजय सिंग बिश्त यांच्यासारखे नेते केवळ या उघडपणे उजव्या विचारसरणीच्या अतिरेकी यूट्यूबर्सनाच मुलाखती देतात आणि त्यानंतर इतर वृत्तवाहिन्या या मुलाखतींना प्रसिद्धी देतात. हे चॅनेल्स अनेकदा असे थोडेसेच संपादित केलेले व्हिडीओ बनवतात ज्यात रस्त्याच्या कडेला आणि बाजारपेठेत नियमितपणे तरुणांना विविध राजकीय समस्यांबद्दल त्यांची मते विचारली जातात. यांचे व्हिडिओ लोकप्रिय करण्याची एक ठरलेले सूत्र आहे: **व्हाटअबाउटरी (याच मुद्द्यावर का बोलता, त्यावर का बोलत नाही),शिविगाळ, इस्लामविरोध भरलेले व्हिडिओ,** ज्यात मुस्लिमांविरोधात किंवा एखाद्या विरोधी नेत्याविरोधात द्वेषयुक्त भाषण आणि व्हिडिओवर एखादे भडकावणारे "आकर्षक" थंबनेल (लघुचित्र) असेल जे क्लिक करण्यासाठी आकर्षित करेल. आश्चर्याची गोष्ट नाही की, डिसेंबर 2023 मध्ये उत्तर प्रदेश सरकारने अयोध्येचा "विकास" आणि राम मंदिराच्या बांधकामाची जाहीरात करण्यासाठी प्रभावकांसाठी 25 लाख रुपयाची तरतूद केली. भाजपशी संलग्न असलेल्या एका नेत्याच्या दिलेल्या प्रोत्साहनातून ऑल इंडिया इन्फ्लुएंसर्स असोसिएशनच्या पुढाकाराने, सुमारे **500 प्रभावकांनी जानेवारीच्या मध्यात रामेश्वरम ते अयोध्या असा प्रवास केला.** यातून दिसून येते की सरकार प्रभावकांना प्रचारक म्हणून किती महत्व देत आहे. विशेष म्हणजे, उत्तर प्रदेशने अलीकडेच एक कायदा आणला आहे ज्याद्वारे सरकार कोणत्याही “देशविरोधी” कंटेंट निर्मात्यास जन्मठेपेची शिक्षा देऊ शकेल, म्हणजेच सर्व सरकार विरोधी निर्मात्यांना शिक्षा होईल.

एकीकडे उजव्या विचारसरणीच्या प्रभावक लोकांची चलती झाली आहे आणि दुसरीकडे माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने एक प्रसारण विधेयक प्रस्तावित केले आहे ज्याचे उद्दिष्ट सर्व कंटेंट निर्मात्यांना सरकारच्या नियंत्रणात आणणे आहे. हे विधेयक सध्या बारगळलेले असले तरी उद्या परत येऊ शकते. याद्वारे राजकारणावर चर्चा करणाऱ्या प्रभावकांना वृत्तनिवेदक म्हणून संबोधले जाईल. युट्युबर्स आणि इंस्टाग्रामर्स (आणि कदाचित टिकटॉकर्स) ज्यांचे चाहते एका ठराविक संख्येच्या वर आहेत, त्यांना विधेयक मंजूर झाल्यापासून एका महिन्याच्या आत भारत सरकारला स्वत:च्या अस्तित्वाची माहिती द्यावी लागेल. त्यांच्या सामग्रीला तज्ञांच्या पॅनेलची तपासणी पार करावी लागेल. सरकार किंवा संघाविरुद्ध असणारा कोणताही प्रचार दाबण्यासाठीच हे सर्व होत आहे. आपले मत मांडणे आणि सरकारला व एखाद्या मताला विरोध हा आपला लोकशाही अधिकार आहे, पण हा मर्यादित अधिकारही फॅशिस्ट भाजप-संघाने पूर्णपणे चिरडून टाकला आहे.

## भांडवलशाहीने निर्माण केलेली पोकळी भरून काढण्यासाठी उजव्या विचारसरणीच्या प्रभावकांचे अनुसरण

भांडवलशाही व्यवस्थेत जगण्याच्या असुरक्षिततेमुळे निर्माण झालेल्या एकाकीपणाच्या शून्यतेवर मात करण्यासाठी दिवसभर मोबाईलवर स्क्रोल करणारे लोक त्यात येणारी निरर्थक सामग्री, खाद्यपदार्थ आणि मांजरीचे व्हिडिओ आणि प्रभावक व कंप्युटर द्वारे निर्मित द्वेषाने भरलेल्या उजव्या विचाराच्या सामग्रीला जवळ करतात. एकटेपणावर मात

पान 12 वर

## उजव्या विचाराचे एन्फ्ल्युएंसर्स (प्रभावक): फॅशिस्ट विखारी प्रचाराची महामारी

पान 11 वरून

करण्यासाठी इंटरनेट हा एक आधार बनला आहे. प्रवेश परीक्षा आणि स्पर्धा, सततची असुरक्षितता, शिक्षण पूर्ण करून नोकरी मिळवण्याचा ताण, जीवनात काही अर्थपूर्ण नातेसंबंध बनत नसल्यामुळे या देशातील तरुणांना असा विचार भरवला जात आहे की भारताला एकेकाळी भरभराटीचा गौरवशाली भूतकाळ होता आणि सध्याच्या दुःखावर उपाय म्हणून त्याकडे परत जाणे आपली गरज आहे. गौरवशाली भूतकाळाकडे परतण्याच्या या आवाहनाने प्रभावित होऊन, ज्यांनी हे कथित वैभव हिंदुत्ववाद्यांच्या तथाकथित इतिहासात नष्ट केले त्या सर्वांविरुद्ध त्यांच्या मनात राग भरला जात आहे, म्हणजे कोण, तर आजचे मुस्लिम, ज्यांच्याबद्दल पसरवले जाते की ते मुघलांचे वंशज आहेत किंवा दलित, ख्रिश्चन आणि कम्युनिस्ट आहेत, जे या एकांगी गौरवशाली भूतकाळाच्या कल्पनेला नाकारू पाहतात. इंटरनेट आणि द्वेषाने भरलेली प्रचारयंत्रणा आज या एकाकी आणि दिशाहीन तरुणांसाठी तो पाळणा आहे ज्यात बसून ते रोज सध्याच्या भांडवलशाही व्यवस्थेने प्रत्यक्षात निर्माण केलेल्या त्यांच्या आजारांना शांत करणारी उजव्या प्रभावकांची विखारी विचारांची शोकगाणी ऐकतात.

या भांडवलशाही व्यवस्थेच्या मर्यादा आणि तिची तथाकथित मर्यादित स्वातंत्र्ये आज समजली पाहिजेत, जसे की आपण शोषित होण्यास स्वतंत्र आहोत, आपले शोषण कुठे होईल ते निवडण्यास स्वतंत्र आहोत, 25 विविध प्रकारच्या टूथपेस्टमधून निवड करण्यास स्वतंत्र आहोत पण पोटात पुरेसे अन्न, पिण्याचे शुद्ध पाणी किंवा डोक्यावर छप्पर घेऊन सन्मानपूर्वक जीवन जगण्यास स्वतंत्र नाही.

स्त्रियांना प्रभावित कसे करायचे, स्त्रीवर कसा विजय मिळवायचा, मुक्त झालेल्या स्त्रिया आणि एल.जी.बी.टी.क्यू. लोक आमचे शत्रू का आहेत याबद्दल सुद्धा या उजव्या विचारसरणीच्या प्रभावकांकडून प्रचार केला जातो. भांडवलशाही जी असुरक्षितता पुरुषांसाठी सुद्धा निर्माण करते, ती अशी जमीन तयार करते जिच्यावर महिलाच्या दुय्यमत्त्वासहित जुन्या समाजरचनेतील सर्व तथाकथित "सुरक्षितता" टिकवाव्याशा वाटतात, ज्याचा वापर करून हे प्रभावक स्त्री-विरोधी, पितृसत्तावादी प्रचार करून पैसे कमावत आहेत.

आरक्षणाचा लाभ घेणारा दलित, 'घर आणि चूली'च्या बंधनातून मुक्त झालेली स्त्री, रोहिंग्या किंवा बांगलादेशी म्हणत ज्यांचा अपमानास्पद उल्लेख केला जातो असे मुस्लिम, "बाहेरचे" जे लोकसंख्या वाढीस कारणीभूत आहेत, उदारमतवादी बातम्या देणारे ल्युटेन्स मीडिया किंवा खान मार्केट गँग, किवा कामगारांना संघटित करणारे वा खोटी आशा निर्माण करणाऱ्या भांडवली व्यवस्थेलाच आव्हान देणारे कम्युनिस्ट, हे शत्रू आहेत असे भासवण्याचे काम हे प्रभावक करतात.

जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवायचे असेल तर अशा प्रभावक लोकांना आपल्या फायद्यासाठी वापरण्याचीही गरज आहे, हे सरकारच्या त्वरीत लक्षात आले. 2020 च्या मध्यात **भाजपचे मंत्री प्रकाश जावडेकर, स्मृती इराणी, मुख्तार अब्बास नक्वी आणि रविशंकर प्रसाद यांच्या मंत्र्यांच्या गटाने एक अहवाल प्रकाशित केला** ज्यामध्ये कथित "प्रतिमा संकटाचा" सामना करण्यासाठी अनेक शिफारसी केल्या होत्या. इराणी यांनी केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी करण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या इलेक्ट्रॉनिक मीडिया मॉनिटरिंग सेंटर किंवा एम.आय.बी.ला **"50 नकारात्मक प्रभावकांचे सतत ट्रॅकिंग"** करण्याची जबाबदारी सोपवली गेली आहे. "ॲक्शन पॉइंट्स" या शीर्षकाच्या एका विभागाखाली अहवालात नमूद केले आहे की "काही नकारात्मक प्रभावक खोटे वर्णन देतात आणि सरकारला बदनाम करतात. त्यांचा सतत मागोवा घेणे आवश्यक आहे जेणेकरून योग्य आणि वेळेवर प्रतिसाद दिला जाऊ शकेल." त्या अनुषंगाने, कृती बिंदूंमध्ये "50 सकारात्मक प्रभावकांसह नियमित काम करणे" आणि " जे सरकारचे समर्थन करतात किंवा तटस्थ असतात अशा...पत्रकारांशी संलग्नता" यांचा समावेश होतो. अहवालात असे नमूद करण्यात आले आहे की असे पत्रकार "केवळ सकारात्मक गोष्टीच सांगत नाहीत तर सरकारबद्दलच्या खोट्या कथनांचाही प्रतिकार करतात." यातून दिसून येते की भाजपने किती गांभीर्याने प्रभावकांना वापरून प्रतिमा निर्मिती चालवली आहे.

### लक्षणांवर उपचार करण्याऐवजी भांडवलशाहीच्या मूळ समस्येचे निराकरण गरजेचे

सरकारच्या या सशुल्क ट्रोल्सचे भरकटवण्याचे काम चालवले आहे, ते आपण एकजूट होऊ नये आणि आपल्या हक्कांसाठी लढू नये आणि आपण राजकीयदृष्ट्या अजाण रहावे यासाठीच. हे उजव्या विचारसरणीचे प्रभावक उदारमतवाद्यांना आणि डाव्यांना (जे अजिबात एक नाहीत) "सिक्युलर" म्हणतात, जो धर्मनिरपेक्षतेसाठी एक अपशब्द आहे. **धर्मनिरपेक्षतेची खरी व्याख्या सत्ता आणि धर्म वेगळे करणे ही आहे,** परंतु या ट्रोल्सकडून तर जो कोणी धर्माच्या राजकारणावर सौम्यही टीका करतो त्याला सिक्युलर असे संबोधले जाते. धार्मिक श्रद्धा पाळण्याचा आणि आपापल्या निवडीच्या श्रद्धेचे पालन करण्याच्या प्रत्येकाच्या लोकशाही अधिकाराचे आपण दृढतेने समर्थन केले पाहिजे, परंतु धर्मनिरपेक्ष विचार हाच आहे की राजकारणात धर्माला स्थान नसले पाहिजे.

या उजव्या विचारसरणीच्या प्रभावकांवर बहिष्कार टाकणे आणि त्यांचे मिथकीय, निरर्थक आणि पूर्णपणे मूर्ख दावे तर्कसंगत, प्रगतीशील साहित्याच्या आधारे, तसेच इतिहास, वर्तमान आणि वर्तमान समस्यांच्या योग्य आकलनाच्या आणि न्याय्य, वैज्ञानिक मूल्यांच्या प्रचाराने खोडून काढणे आपल्या हिताचे आहे. भगतसिंग त्यांच्या 'जातीय दंगली आणि त्यांचे उपाय' या निबंधात स्पष्टपणे सांगतात की, असा धर्मवाद आणि धर्मवादी मीडिया यांच्याशी लढले पाहिजे:

*"लोकांचे परस्परांशी होणारे झगडे थांबविण्यासाठी लोकांमध्ये वर्ग भावना रुजणे आवश्यक आहे. गरीब, कष्टकरी व शेतकरी यांना हे स्पष्टपणे समजावून सांगितले पाहिजे, की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत. म्हणून तुम्ही त्यांच्या हातचलाखीपासून स्वतःला शाबूत ठेवले पाहिजे. त्यांच्या तावडीत सापडून काहीही करता कामा नये. जगातील सर्व गोरगरिबांचे, मग ते कोणत्याही जातीचे, वर्णाचे, धर्माचे वा राष्ट्राचे असोत, अधिकार सारखे आहेत. धर्म, वर्ण, वंश आणि राष्ट्रियतेचे भेदभाव संपवून तुम्ही एकजूट व्हावे आणि सरकारची शक्ती आपल्या हाती घेण्यासाठी प्रयत्न करावेत, यातच तुमचे भले आहे. या प्रयत्नांमुळे तुमचे काही एक नुकसान होणार नाही. उलट एक ना एक दिवस तुमच्या बेड्या तुटून पडतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल."*

आपल्या समाजाचा, येथील नियम-कायद्यांचा, कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यात आणि आपल्या खऱ्या प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या सामग्रीचा अभ्यास करण्याची ही वेळ आहे. आपले खरे प्रश्न म्हणजे वाढती बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार, बेघरपणा, जाती-आणि धर्माच्या नावाखाली पाडली जाणारी फूट, महिलांविरुद्धचे वाढते गुन्हे. या सर्वांसाठी आपण चिकित्सकपणे विविध साहित्यकृती, डिजिटल सामग्री वाचणे आवश्यक आहे. जेव्हा आपल्या वास्तविक समस्या समजू तेव्हाच आपण फॅशिस्ट शक्तींनी निर्माण केलेल्या मृगजळातून आरपार पाहू शकतो आणि खरोखर एक चांगले जग तयार करू शकतो.

## वाढत्या महिला हिंसाचाराविरुद्ध एकजूट होत भांडवली पुरुषसत्तेला मुळातून नष्ट करण्याची गरज!

पान 16 वरून

आणि आसाराम यांसारख्या बलात्काऱ्यांवर अनेक लैंगिक अत्याचाराचे गुन्हे दाखल असून त्यांना पॅरोलवर पाठवले गेले. गोध्रा जातीय दंगलीतील बलात्कार जसे की बिल्किस बानोच्या प्रकरणातील बलात्काऱ्यांना हार घालण्यात आला होता. दलित महिलांवर उच्चवर्णीय पुरुषांकडून होणारे बलात्कार मग ते खैरलांजी असो किंवा हाथरस, या अजिबात दुर्मिळ घटना नाहीत. **प्रज्वल रेवन्ना, ब्रिजभूषण सिंग, चिन्मयानंद यांसारखे बलात्कारी** आणि हल्लेखोर हे भाजपचा भाग आहेत आणि **ताजेमुल आणि शाहजहान सारखे बलात्कारी गुंड टीएमसी** पक्षाचा भाग आहेत. जे पक्ष सर्वसामान्यांची लूट करणाऱ्यांच्या हिताचे प्रतिनिधीत्व करतात ते नेहमीच गुन्हेगारांना आश्रय देत असतात. सर्वच प्रमुख भांडवली पक्षांची हीच स्थिती आहे. नफ्याची गणिते जी भांडवली पक्षांना चालवतात, ती त्यांना अशा तत्त्वांना जवळ करण्यासाठी भाग पाडतात जे स्त्रीविरोधी आहेत. पैशाच्या जोरावर तपासयंत्रणा, न्यायव्यवस्था वाकवल्या-झुकवल्या जातात (आठवा पुणे पोर्शे अपघात). अशामध्ये आपण अत्याचार-बलात्कार थांबण्याची अपेक्षा कशी करू शकतो?

### कोलकाता बलात्कार प्रकरणाच्या विरोधात डॉक्टरांची अराजकीय भूमिका निरर्थक आहे!

कोलकाता बलात्कार प्रकरणानंतर देशभरातील डॉक्टर संघटनांनी संप पुकारत निषेध सभा, मोर्चांचे आयोजन केले ज्यामध्ये मुख्य मागण्या एक केंद्रीय सुरक्षा कायदा आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा या होत्या. नक्कीच कठोर कायदे, गुन्हेगारांना कठोर शिक्षा, सुरक्षेसाठी योग्य उपाययोजना झाल्याच पाहिजेत परंतु केवळ एवढ्यानेच हा प्रश्न सुटणार नाही. महिला हिंसाचाराच्या विरोधात लढण्यासाठी महिलांना दुय्यम समजणारी, उपभोगाची वस्तू समजणारी ही पुरुषसत्ताक व्यवस्था बदलल्याशिवाय महिलांचे शोषण थांबणार नाही. आंदोलनात पुरुषसत्ताक व्यवस्थेविरोधात संघर्ष करण्याचे आवाहन करत 'पुरुषसत्ता मुर्दाबाद' किंवा 'पितृसत्ता मुर्दाबाद' असे नारे लावले गेले होते. परंतु **काही डॉक्टर संघटनांनी या संपाला 'अराजकीय' ठेवण्याच्या भ्रामक समजुतीखाली असे नारे लावण्याला विरोध दर्शवला** आणि या आंदोलनाला समाजात घडणाऱ्या व्यापक महिला हिंसाचाराच्या प्रश्नापर्यंत घेऊन न जाता केवळ डॉक्टरांचा मुद्द्या बनवण्यापर्यंत मर्यादित केले.


परंतु हे लक्षात घेणे अतिशय महत्वाचे आहे की **कुठलाही संप, कुठल्याही अन्यायाचा विरोध, कुठलेही आंदोलन हे अराजकीय असूच शकत नाही.** एवढेच काय तर आपण घेत असलेले शिक्षण, आपल्याला मिळणारी नोकरी किंवा बेरोजगारी, मिळत असलेली आरोग्याची सुविधा किंवा असुविधा, लहान मुलांच्या लसीकरणापासून तर म्हातारपणात मिळणारे किंवा न मिळणारे पेन्शन, आपले कामाचे तास, कामगारांचा पगार, महिलांची सुरक्षितता इत्यादी हजारो बाबी देशातील राजकारणच ठरवत असते. अन्यायाचा विरोध करणे म्हणजे अस्तित्वात असलेल्या सत्तासंबंधांना आव्हान देणे, मग हा विरोध अराजकीय कसा असू शकेल? त्यामुळे आज न्यायपूर्ण समाजाच्या निर्मितीचा लढा हा राजकीय लढाच आहे कारण जे शोषकांच्या बाजूने राजकारण करतात त्याविरोधात लढणे हेच त्यामध्ये अंतर्भूत आहे. तेव्हा **डॉक्टरांनी या प्रश्नाला फक्त डॉक्टरांपुरते मर्यादित ठेवणे अत्यंत चुकीचे होते!**

गुन्हेगारांना व बलात्काऱ्यांना आश्रय देणाऱ्या सर्व पक्षांचा पर्दाफाश करतानाच, आपल्या समाजात पुरुषप्रधान संस्कृती आणि स्त्रीविरोधी विचारधारा किती खोलवर रुजली आहे हे लक्षात घेण्यावरही आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे. याबाबत आपण डोळे उघडले तरच महिलांवरील वाढत्या गुन्ह्यांविरुद्ध आपण तीव्र संघर्ष करू शकतो. सुरक्षित कामाचे वातावरण आणि कठोर कायदे यासाठी संघर्ष पुढे नेण्यासोबतच त्याच्या मर्यादाही आपण ओळखल्या पाहिजे आणि भांडवलशाही पितृसत्ताक व्यवस्था नष्ट करून समतामूलक समाज निर्मितीच्या कार्यासाठी एकजूट झाले पाहिजे. हे शोषण आणि विषमता नष्ट करून त्याच्या जागी न्यायाची हमी देणारा समाज निर्माण झाला पाहिजे: असा समाज जिथे कोणालाही दुय्यम दर्जा दिला जाणार नाही!

**प्रचंड महागाई, वाढती बेरोजगारी, सन्माननीय घरांचा अभाव, कामाचे शोषणाचे तास, कामाची असुरक्षित परिस्थिती आणि तुटपुंजे वेतन, आरोग्यसेवेचा अधिकार - हे आज महिलांचे देखील प्रश्न आहेत** आणि हे प्रश्न सुटल्याशिवाय ना महिला स्वतंत्र होऊ शकतात, आणि ना स्वतंत्र झाल्याशिवाय समान-न्यायपूर्ण नात्यांची कल्पना करू शकतात, आणि त्यामुळेच ना अपराधांना जन्म देणारी भांडवली पुरुषसत्तावादी विचारधारा नष्ट होऊ शकते !

# दु:खाच्या कारणांचा शोध घेणारा कलाकार : बर्टोल्ट ब्रेष्ट

## (14 ऑगस्ट या बर्टोल्ट ब्रेष्टच्या स्मृतीदिनानिमित्त)



✎स्वप्रजा

*“अंधाऱ्या काळात जगतही तू*

*आशा ठेवलीस की*

*तेव्हाही गीतं गायली जातील.*

*अंधाराबद्दल आणि त्याच्या नसण्याबद्दल*

*आणि जगत गेलास*

*एका अंधाऱ्या काळात*

*आणि त्या विरोधात जगत गेलास.”*

\- शशिप्रकाश

शशिप्रकाश यांची कविता “ब्रेष्ट बाबत” फार थोड्या पण योग्य शब्दात बरेच काही सांगून जाते. ब्रेष्टने दोन महायुद्धे अगदी जवळून पाहिली, लाखो माणसांचे मृत्यु पाहिले, शोषित कष्टकऱ्यांचा आवाज ऐकला, फॅशिस्ट जर्मनीतील अतिशय अंधाऱ्या काळात तो जगला आणि त्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत विरोधात लिहीत राहिला, लढत राहिला आणि जगभरातील युवकांना, कार्यकर्त्यांना लढत राहण्याची प्रेरणा देत राहिला. त्याने फक्त समाजातील दुःख नाही रेखाटले तर दुःखाच्या कारणांचा शोध घेत त्याचा नायनाट कसा करता येईल यावर सुद्धा लिहिले आणि म्हणूनच “दु:खाच्या कारणांचा शोध घेणारा कलाकार” असं वर्णन त्यांचं केलं जातं, असा हा युजन बर्थोल्ड फ्रेडरिक ब्रेष्ट उर्फ बर्टोल्ट ब्रेष्ट.

ब्रेष्टचा जन्म 1898 ला जर्मनी मध्ये झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण ऑग्सबुर्गमध्ये पूर्ण झाल्यानंतर 1917 मध्ये त्याने म्युनिख युनिव्हर्सिटी मध्ये डॉक्टर बनण्यासाठी प्रवेश घेतला. पण या दरम्यान सुद्धा हाडाचा कलाकार, साहित्यिक आणि जनतेचा कलावंत असलेल्या ब्रेष्टचं मन सगळ्यात जास्त कविता आणि नाट्य लेखनातच गुंतलेलं असायचं. पहिल्या महायुद्धाच्या अंतिम वर्षात ब्रेष्टला सैन्यात सामील होण्यासाठी बोलावणं आलं, मेडिकलचा अभ्यास करत असल्यामुळे त्याला सैन्याच्या वैद्यकीय कोरमध्ये भर्ती करण्यात आलं. सैन्याच्या नोकरीने त्याच्या जीवनावर जो प्रभाव टाकला, त्यामुळे तो आयुष्यभर युद्धविरोधी राहिला. त्याने युद्धावर अनेक कविता लिहिल्या, आणि त्यातही युद्धाचा फायदा मूठभर भांडवलदारांना होतो आणि ज्याही देशात युद्ध होत आहे त्या सगळ्या देशातील गरीब, कामगार-कष्टकरी जनताच त्यात मरते आहे हे वास्तव रेखाटले.

*“युद्ध जे येत आहे*

*पहिले युद्ध नाही.*

*या अगोदरही युद्ध झालीत.*

*शेवटचे युद्ध संपले*

*तेव्हा काही विजेते बनले आणि काही पराजित.*

*विजेत्यांमध्ये सामान्य माणूस भुकेने मेला*

*पराजितांमध्ये मेला तो सुद्धा तो भुकेलेलाच.”*

फार कमी वयापासूनच त्याने नाटक लिहायला सुरुवात केली. वयाच्या विसाव्या वर्षी त्याने “बाल” हे त्याचं पहिलं नाटक लिहिलं. 1919 मध्ये त्याचं दुसरं नाटक “ड्रम्स इन द नाईट” लिहिल्यावर एक यशस्वी आणि सक्षम नाटककार म्हणून ब्रेष्टला मान्यता मिळायला जास्त वेळ लागला नाही. त्याने त्याच्या जीवन काळात एकूण 35 नाटकं लिहिली. मार्क्सवादी विचारधारेने प्रभावित होऊन सगळ्यात पहिलं लिहिलेलं नाटक म्हणजे “अ मॅन इज अ मॅन” आणि त्याच्या इतर अनेक नाटकांपैकी प्रसिद्ध असलेली नाटके म्हणजे “द थ्री पेनी ऑपेरा”, “गॅलेलियो”, “मदर करेज”, “द गुड वूमन ऑफ सेंट जोआन”, “सेंट जोआन ऑफ द स्टॉकयार्ड्स”, इत्यादी. मॅक्सिम गोर्कीची कादंबरी आई (मदर) वर आधारित हेच शीर्षक देऊन एक नाटक लिहिलं. “सेंट जोआन ऑफ द स्टॉकयार्ड्स” या नाटकामध्ये त्याने 1929 मधील भयानक आर्थिक मंदीचा पर्दाफाश केला आहे. जगभरातील अनेक भाषांमध्ये ब्रेष्टच्या कवितांचा आणि नाटकांचा अनुवाद झाला आहे. मराठी भाषेत सुद्धा “कॉकेशियन चॉक सर्कल” याचा “अजब न्याय वर्तुळाचा” या नावाने अनुवाद कवी चि. त्य. खानोलकर यांनी केला आहे. तसेच “द थ्री पेनी ऑपेरा” या नाटकाचा मराठी अनुवाद (रुपांतर) “तीन पैशाचा तमाशा” या नावाने पु. ल. देशपांडे यांनी केला आहे.

नाटकातल्या पात्रांबरोबर प्रेक्षकांनी एकरूप होऊ नये आणि ते नाटक बघत आहे हे विसरू नये म्हणून ब्रेष्टने विशेष प्रयत्न केले. नाटकाचा संदेश पोहोचवण्यासाठी त्याने नाटकाची शैली विकसित केली. ज्याला **“एपिक थिएटर” असं म्हटलं जातं. एपिक थिएटर हे पारंपारिक नाटकापासून वेगळे आहे.** यामध्ये रंगमंचावर निवेदनाला अधिक महत्त्व आहे, नाट्यतंत्रे प्रेक्षकांपासून लपवली जात नाहीत, ‘हे वास्तव नाही तर हे नाटक आहे’ हे सतत प्रेक्षकांना सांगत राहणे, ही एपिक थिएटरची काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. जीवनाच्या अखेरच्या वर्षांत, ब्रेष्ट आपल्या नाट्यरचनांच्या विचारधारेला ‘द्वंद्वात्मक नाटक’ (डॉयलेक्टिकल थियेटर) असे नाव देऊ लागले. द्वंद्वात्मक थिएटर वास्तवात ब्रेष्टच्या एपिक थिएटरच्या सिद्धांताचा तार्किक विकास होता. पीटर ब्रुक हे ब्रेष्टच्या थिएटरला दिलेल्या योगदानाबद्दल बोलताना म्हणतात की *“थिएटर सोबत गांभीर्याने जोडलेला कोणताही व्यक्ती, ब्रेष्ट कडे दुर्लक्ष करू शकत नाही. ब्रेष्ट आपल्या काळातील एक केंद्रिय व्यक्तित्व आहे, आज सगळ्या थिएटरचे काम कोणत्या न कोणत्या बिंदूवर ब्रेष्टच्या वक्तव्यांनी आणि प्राप्तींनीच सुरू होते, किंवा परतून त्याच्यापर्यंत येते”.*

ब्रेष्टने 500 हून अधिक कविता लिहील्या. ब्रेष्टच्या कवितांमध्ये तिखट पण साधी-सुधी भाषा सापडते. त्याच्या कलेची मुख्य प्रवृत्ती भांडवली दृष्टिकोनावर तीव्र आघात करण्याची होती. भांडवलशाहीच्या आर्थिक संकटामुळे जन्माला आलेल्या फॅशिझमशी तुम्ही भांडवलशाही सोबत लढल्याशिवाय लढू शकत नाही हे त्याला योग्यरित्या कळलं होतं.

*“जे भांडवलशाहीला विरोध न करता फॅशिझमला विरोध करतात, जे पाशविकतेतून आलेल्या पाशवीपणाची निंदा करतात, ते अशा लोकांसारखे आहेत ज्यांना बछड्याला न मारता मांस खाण्याची इच्छा आहे. ते बछड्याला खाऊ इच्छितात, पण त्यांना रक्त बघवत नाही. वजन करण्यापूर्वी कसायाने हात पुसले तर ते समाधानी होतात. ते पाशविकतेला जन्म देणाऱ्या संपत्ती-संबंधांच्या विरोधात नाहीत, ते फक्त स्वत:मध्ये पाशविकतेच्या विरोधात आहेत. ते पाशविकतेविरोधात आवाज उठवतात, आणि ते त्या देशांमध्ये असे करतात जेथे असे संपत्ती-संबंध प्रचलित आहेत, परंतु जिथे मांसाचे वजन करण्यापूर्वी कसाई हात धुतो."*

(“सत्य लिहिण्यातील पाच अडचणी”)

उपासमार, बेरोजगारी आणि बेइमानी संपवण्याचे खोटे वायदे करत आणि समाजात घडणाऱ्या प्रत्येक वाईट गोष्टीसाठी कम्युनिस्ट, वैज्ञानिक, कलाकार, यहुदी यांना खोटा शत्रू म्हणून उभं करत, जनतेशी गद्दारी करत 30 जानेवारी 1933 रोजी जर्मनीमध्ये हिटलर सत्तेवर आला. 27 फेब्रुवारी 1933 रोजी बर्लिनमधील रायशटॅग इमारतीला आग लागली, कम्युनिस्ट आणि डाव्या विचारसरणीच्या लोकांवर खोटे आरोप लावले गेले आणि त्यांना अटक करण्यात आली, त्यानंतर लगेच कलाकारांवर हल्ले सुरू झाले, ते कलाकार जे या व्यवस्थेविरोधात प्रखर भाष्य करतात आणि वास्तववादी चित्रण करतात, त्यांची पुस्तकं जाळले गेली. तेव्हा हे तर स्पष्ट होते की जर्मनीत राहून वास्तव दर्शविणारे नाटक किंवा कविता करणे अशक्य होते, 28 फेब्रुवारी रोजी ब्रेष्टने जर्मनी सोडली आणि त्याच सोबत त्याच्या जीवनात निर्वासनाचा दीर्घकालीन काळ सुरू झाला. ‘चपलांपेक्षा जास्त देश बदलत’ तो जनतेला सांगत राहिला की फॅशिझम आणि कोणत्याही प्रकारच्या कट्टरतेचा द्वेष केला पाहिजे. ब्रेष्टच्या मृत्यूच्या 68 वर्षांनंतर आजही तो प्रासंगिक आहे. तो जनतेच्या खऱ्या प्रश्नांवर खऱ्या अर्थाने लिहिणारा, विचार करणारा आणि कष्टकरी जनतेला दिशा देणारं साहित्य लिहिणारा कलाकार होता. महागाई, गरिबी, उपासमार, बेरोजगारी हे सगळं आपल्या फुटक्या नशीबामुळे नाहीये, आपल्याला वाचवायला कोणी येणार नाहीये तर आपल्यालाच यासाठी लढावं लागणार आहे हे दर्शवणारी ‘मदर’ या नाटकातली कविता -

*“जर थाळी तुमची रिकामी*

*जर थाळी तुमची रिकामी*

*तर विचार करावा लागेल की अन्न कसे खाणार*

*हे तुमच्यावर आहे की पलटून टाका सरकारला उलटे*

*जोवर की रिकामं पोटं नाही भरत*

*स्वत:ची मदत*

*स्वत:च करा*

*कोणाची वाट पाहू नका*

*जर काम नसेल आणि तुम्ही असाल गरीब*

*तेव्हा खायचं कसं हे तुमच्यावर आहे*

*सरकार तुमचं असावं हे तुमच्यावर आहे*

*करून टाका खाली डोकं वर पाय*

*तुमच्यावर आहे की सरकारला उलथून टाका*

*तुमच्यावर हसतात ते की तुम्ही गरीब*

*वेळ नका घालवू, स्वत:ला पुढे न्या*

*योजनेला अंमलात आणायला*

*गरिब-गुरिबांना आपल्या जवळ घेऊन या*

*ध्यानात ठेवा की*

*काम होत रहावे*

*होत रहावे, होत रहावे*

*लवकरच ती वेळ येईल जेव्हा ते म्हणतील*

*कमजोरांच्या जीवनात हसू दरवळेल*

*हसू दरवळेल, हसू दरवळेल”*

(‘मदर’ नाटकातून)

“कला ही समाजाचा आरसा नाही तर समाज बदलण्यासाठी घाव घालणारा हातोडा आहे” ही त्याची कलेविषयक भुमिका होती आणि हीच भुमिका त्याच्या कवितांमधून आणि नाटकांमधून व्यक्त होते. अन्याय कधी अनंतकाळ टिकू शकत नाही. अपप्रचार आणि जनतेमध्ये असलेले सत्ताधारी वर्गाचे वर्चस्व अनंत काळ चालू शकत नाही, जनता सुद्धा आपल्या जीवनातील वास्तव समोर ठेऊन या अपप्रचाराविरोधत आणि शोषणा विरोधात आवाज उचलेल, कधी ना कधी जनतेचे शोषण करणाऱ्या समाज व्यवस्थेचा नायनाट होईल, अशी आशा दाखवत, **अंधाऱ्या काळात लढणाऱ्या युवकांसाठी, कार्यकर्त्यांसाठी, कामगार कष्टकऱ्यांसाठी आणि येणाऱ्या पिढीसाठी बर्टोल्ट ब्रेष्ट नेहमीच एक प्रेरणास्तंभ बनून राहील.**

*“एक दिवस असा येईल*

*पैसा मग कामी ना येईल*

*आणि हे लवकरच होईल*

*ही रचना बदलून जाईल”*

जो पर्यंत या जगात रंगभूमी आहे, कविता आहेत आणि कोणत्याही काना-कोपऱ्यात फॅशिस्ट शक्ती अस्तित्वात आहे तो पर्यंत ब्रेष्ट तुमच्या आमच्या मनात, विचारात, जिवंत असेल आणि लढण्याची प्रेरणा देत राहील!

(कवितांचा अनुवाद: अभिजित)

# आत्महत्यांचे कारखाने: गळेकापू स्पर्धा, वाढती बेरोजगारी आणि कोचिंग उद्योग


✎ शशांक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात 'युवा' हा शब्द 25 वेळा आणि 'रोजगार/नोकरी' हा शब्द 15 वेळा उच्चारला आणि त्यांच्या सरकारच्या 'फोकस'ची घोषणा केली. त्यांनी देशातील तरुणांना सागितले की "असे काम करा की पुढच्या शतकातल्या पिढीला तुमची आठवण येईल". तथापि, त्यांच्या भाषणानंतर अवघ्या काही दिवसांनी, "तरुणांवर लक्ष केंद्रित करा" या वाक्याची वास्तविकता उघड करणाऱ्या बातम्या विविध वृत्तपत्रांमध्ये आल्या, ज्याद्वारे ते वास्तव जे केवळ एनडीए सरकारनेच नव्हे तर इतर केंद्र आणि राज्य सरकारांनीही दुर्लक्षिले आहे ते पुन्हा समोर आले.

आयसी3 (एक एन.जी.ओ.) च्या अहवालानुसार, **2021 ते 2022 या कालावधीत विद्यार्थी आत्महत्यांमध्ये 4.2 टक्क्यांनी वाढ झाली आहे.** गेल्या 20 वर्षांत विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे आणि विद्यार्थी आत्महत्यांच्या वाढीचा दर एकूण आत्महत्यांच्या दरापेक्षा जास्त आहे. **यात महाराष्ट्र सर्वाधिक पुढे आहे.** विद्यार्थी आणि युवकांना नैराश्यात ढकलण्यात भारत "विश्व गुरु" आहे हे या आकड्यावरून निःसंशयपणे दिसते. आपल्याला हे समजून घेणे आवश्यक आहे की बिघडत चाललेले **मानसिक आरोग्य, नशिल्या पदार्थांचे सेवन या समस्या खरेतर एका मोठ्या समस्येची लक्षणे आहेत** जिच्यामुळे भारत जगातील सर्वात जास्त युवक-आत्महत्याग्रस्त देशांपैकी एक बनला आहे. खरी समस्या भांडवली व्यवस्थेत आहे जी आपल्या तरुणांना आजारी बनवत आहे. या निराशाजनक प्रवृत्तीमागील काही मूळ कारणे तपासूयात.

### कोचिंग इन्स्टिट्यूटच्या मदतीने "सर्वाईव्हल ऑफ द फिटेस्ट"

नवउदारवादी धोरणे 90च्या दशकाच्या सुरुवातीस लागू झाल्यापासून, सर्वच सरकारांनी शिक्षणावरील त्यांचा खर्च सातत्याने कमी केला आहे. सरकारी खर्चात घट होत राहिल्याने, बहुतांश लोकसंख्येला उच्च फी असलेल्या खाजगी शाळा परवडत नसल्यामुळे, देशातील शिक्षणाची स्थिती बिकट झाली आहे. शैक्षणिक स्थितीचा वार्षिक अहवाल 2023, मध्ये दिसून आले आहे की सर्वेक्षण केलेल्या तिसरी-चौथीच्या अर्ध्याहून अधिक किशोरवयीन मुलांना साधा भागाकार सुद्धा करता येत नव्हता. प्राथमिक शिक्षणाच्या अशा वाईट



अवस्थेमुळे 10वी आणि 12वी बोर्डाची परीक्षा देताना विद्यार्थ्यांना अकल्पनीय दडपण येते. याचा परिणाम म्हणजे निकाल लागल्यानंतर दरवर्षी आत्महत्यांच्या बातम्या समोर येतात.

कामगार वर्गातून येणाऱ्या बहुतेक मुलांना व्यवस्थेच्या अडथळ्यांना तोंड द्यावे लागते आणि त्यामुळेच मोजक्याच सरकारी महाविद्यालयात असलेल्या जागा मिळवण्याच्या जीवघेण्या-शर्यतीतून ते बाहेर पडतात, कारण खाजगी महाविद्यालये तर निःसंशयपणे त्यांच्या आवाक्याबाहेर असतात. जे आर्थिक आणि सामाजिक आव्हानांवर मात करू शकले, त्यांना गळेकापू स्पर्धेला सामोरे जावे लागते कारण जागा फारच कमी आहेत. अभियांत्रिकी आणि वैद्यक यांसारख्या तांत्रिक शिक्षणासाठी, जे केवळ अल्पसंख्याक मुलांचीच (बहुतेक निम्न मध्यमवर्गीय किंवा त्याहून वरच्या वर्गीय कुटुंबातील) आकांक्षा राहिले आहेत, परिस्थिती काही वेगळी नाही. उदाहरणार्थ, जेईई मुख्य परीक्षेतील सुमारे 60,000 जागांसाठी दरवर्षी सुमारे 18 लाख विद्यार्थी अर्ज करतात. या पार्श्वभूमीवर, **विद्यार्थ्यांच्या संपूर्ण पिढीला परीक्षेतील उच्च गुण म्हणजेच यश हे स्विकारायला भाग पाडले जात आहे,** आणि अशा परीक्षांमध्ये अपयश ही विद्यार्थ्यांचीच कमतरता आहे असे भासवले जात आहे.

एखाद्याने हे लक्षात घेतले पाहिजे की महाविद्यालये आणि नोकऱ्यांमधील प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षांच्या नावाखाली, **वस्तुनिष्ठ पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या "निवड" परीक्षा देखील होत नाहीत (उदाहरणार्थ 100 पैकी 80 गुण) ज्याद्वारे प्रवेश निश्चित मिळेल, तर उलट ती एक "गाळणी" प्रणाली आहे,** जिच्यात मर्यादित जागांमुळे मर्यादित विद्यार्थ्यांनाच संधी मिळते, आणि जी विद्यार्थ्यांना स्वतःला "प्रतिभावान" नसल्याबद्दल दोष देऊन नाकारण्यासाठी बनवली केलेली आहे. यामुळे **दोषाचे ओझे व्यवस्थेच्या खांद्यावरून विद्यार्थ्यांच्या खांद्यावर ढकलले जात आहे.**

मोदी सरकारचा "आत्मनिर्भर भारत" सामाजिक सुरक्षेसह पुरेशा चांगल्या नोकऱ्या निर्माण करण्यात अयशस्वी ठरल्याने, सरकारी स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या तरुणांची संख्या वाढतच चालली आहे. उत्तर प्रदेशात 60,000 कॉन्स्टेबल पदांसाठी 50 लाख अर्ज आले होते आणि ही बातमी जानेवारी मध्ये मथळा बनली होती. अगोदरच अशी स्पर्धा, आणि त्यातही पेपर फुटण्याच्या किंवा परीक्षा रद्द होण्याच्या नियमित घटना यामुळे अशा स्पर्धांच्या तयारीसाठी अनेक वर्षे घालवणारे तरुण सतत अत्यंत तणावाच्या स्थितीत असतात.

पुरेशा चांगल्या सरकारी शाळा आणि महाविद्यालयांचा अभाव आणि सरकारी नोकऱ्यांची मोठी मागणी यामुळे **कोचिंग संस्था आणि शिकवणी वर्गांचा मोठा बाजारी उद्योग निर्माण झाला आहे.** प्राथमिक शिक्षणापासून ते सरकारी नोकऱ्यांच्या तयारीपर्यंत सर्वत्र खासगी कोचिंग इन्स्टिट्यूटचा उच्छाद दिसतो. जर आपण प्राथमिक शिक्षणाचा विचार केला तर, सर्व वर्गांकरिता शिकवणी वर्ग चालतात असे दिसून येते. कामगार वर्ग आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबे महागाईमुळे आधीच अडचणीत असलेल्या त्यांच्या घरगुती बजेटवर अतिरिक्त भार पडत असतानाही आपल्या मुलांना 500-1000 दरमहा शुल्क आकारून समूह शिकवणी केंद्रात पाठवतात, त्याचवेळी उच्च मध्यमवर्गीय कुटुंबे दरमहा 4,000-8,000 रुपये इतके उच्च शुल्क भरून खाजगी शिकवण्या घेणे सुद्धा पसंत करतात. स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत फी लाखात असते. सध्या भारतातील कोचिंग उद्योगाचा बाजारातील महसूल 58,088 कोटी रुपये आहे आणि 2028 पर्यंत तो 1,33,995 कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. हे मुळात शिक्षणाचे खाजगीकरण आहे आणि हे चुकून झालेले नाही, तर त्या नवउदारवादी धोरणांचा थेट परिणाम आहे ज्यांना सर्व केंद्र आणि राज्य सरकारांनी लागू केले आहे. यातून हे सुद्धा दिसून येते की परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किंवा शाळेत चांगले यश मिळवण्यासाठी वैयक्तिक मेहनत दुय्यम आहे आणि बाजारात दर्जेदार शिक्षण घेणे परवडते की नाही हे प्राथमिक आहे.

### सर्वांसाठी मोफत आणि समान शिक्षण आणि कायमस्वरूपी रोजगार हमी हाच एकमेव मार्ग

अलीकडे, स्पर्धा परीक्षा आणि त्यांच्या तयारीवर आधारित अनेक चित्रपट आणि टीव्ही शो आले आहेत, जसे की "कोटा फॅक्टरी", "ट्वेल्थ फेल", "अस्पायरंट", इ. जे अनेकदा व्यवस्थेच्या खऱ्या दोषांकडे दुर्लक्ष करतात. यात आश्चर्य वाटायला नको कारण त्यांच्यापैकी काही कार्यक्रम तर अनॅकॅडमी सारख्या कोचिंग उद्योगातील मोठ्या व्यापाऱ्यांनी प्रायोजित केले आहेत. **कष्ट केले तर आभाळ सीमा असते, हा विचारही ते सतत पुढे करतात. ही निव्वळ फसवणूक आहे, कारण पुरेशा संधींशिवाय कठोर परिश्रम बिनकामी आहे.** भांडवलशाहीची सांस्कृतिक यंत्रणा आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी या कल्पनांचे पालनपोषण करते आणि स्वतःच्या अपयशाचे खापर विद्यार्थ्यांवर फोडण्याचे काम करते. वास्तविकता अशी आहे की या अति-स्पर्धात्मक वातावरणामुळे, त्यांच्या स्वतःचा कोणताही दोष नसताना, आपण तरुणांचे जीव गमावत आहोत. जर आपण सर्वांसाठी मोफत, समान आणि दर्जेदार शिक्षण घेऊ शकलो आणि महाविद्यालये आणि विद्यापीठांची संख्या वाढवू शकलो, तर "गाळणी" प्रकारच्या प्रवेश परीक्षा घेणे अनावश्यक होईल.

जर सरकारने कायमस्वरूपी रोजगार हमी दिली, तर सरकारी नोकऱ्यांसाठी अशा उच्च-जोखमीच्या परीक्षांची आवश्यकता संपुष्टात येईल. पण प्रश्न असा आहे की नफ्यावर चालणाऱ्या व्यवस्थेत ही अपेक्षा करता येईल का? या मागण्या मांडण्यासाठी आपण संघटित होऊन भांडवली सरकारला त्यांची अंमलबजावणी करण्यास भाग पाडले पाहिजे, परंतु भांडवली अर्थव्यवस्थाच जागतिक आर्थिक संकटात असताना, कल्याणकारी धोरणे राबविणे कोणत्याही भांडवली सरकारला अशक्य झाले आहे हेही लक्षात घेतले पाहिजे, कारण असे कोणतेही धोरण राबवल्यामुळे या सरकारांचे मालक असलेल्या भांडवलदार वर्गाच्या नफ्याच्या दरांवर परिणाम होईल. शिक्षणातील भांडवली धोरणांना आव्हान देणे आणि मूलभूत बदलांची मागणी करणे ही काळाची गरज आहे. लोकांच्या गरजांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या समाजवादी व्यवस्थेतच या मागण्या पूर्ण केल्या जाऊ शकतात, आणि आपल्या मुलांचे आणि तरुणांचे जीव जाणे संपवता येऊ शकते.

# सिनेमाद्वारे अंधराष्ट्रवाद आणि हिंदुत्वाचा प्रचार: कामकऱ्यांना भरकटवणारे प्रचारतंत्र

✎ रवि

19व्या शतकाच्या सुरुवातीला झालेल्या सिनेमाच्या उदयापासून आजपर्यंत तो कधीही तत्कालीन राजकारणापासून वेगळा राहिलेला नाही. त्या त्या देशातील सत्ताधारी वर्ग सिनेमाचा उपयोग आपल्या विचारधारेचे वर्चस्व स्थापित करण्यासाठी करत असतो. भारतात फॅशिझम सत्तेत आल्यानंतर गेल्या 10 वर्षांतील अनेक, आणि तात्कालिकरित्या बघायचे झाले तर नजिकच्या काळात प्रदर्शित झालेले—काश्मीर फाईल्स, केरला स्टोरी, रामसेतु, स्वातंत्र्यवीर सावरकर, सम्राट पृथ्वीराज, आर्टीकल 370, धर्मवीर, शेर शिवराज, मै अटल हूँ, आदिपुरुष, शेरशाह, अटॅक, मेजर, आणि असे अनेक—मोठ्या बजेटचे सिनेमे हिंदुत्व आणि अंधराष्ट्रवादाच्या राजकीय प्रचारासाठी आणि हिंदुत्वाचे राजकारण जनतेत मुरवण्यासाठी बनवले जात आहेत. संघ-भाजपचा राजकीय प्रचार पुढे रेटण्यासोबत सिनेमा बनवणाऱ्या भांडवलदारांच्या तिजोऱ्या भरणे असे दोन पक्षी एका दगडात मारले जात आहेत. **याद्वारे सिनेमात गुंतवणूक करून नफा कमावणाऱ्या भांडवलदार वर्गाचे हित आज हिंदुत्वासोबत, अंधराष्ट्रवादासोबत जोडले आहे हे दिसून येते.**

आज मुख्य प्रवाहातील अनेक चित्रपटांतून धर्मवादी आणि फॅसिस्ट प्रचाराला खतपाणी घालत मुस्लिमांना देशाचा शत्रू म्हणून प्रस्तुत केले जात आहे. **महागाई, बेरोजगारी, गरिबी, भ्रष्टाचार अशा फॅशिस्ट व्यवस्थेच्या अनेक अपयशांवर पडदा टाकत हा सिनेमा देशातील बहुसंख्याकांसमोर एका अल्पसंख्येला खोटा शत्रू म्हणून उभा करतो,** ज्याला या अपयशांच्या कारणांना जबाबदार धरले जाते. फक्त सिनेमेच नाही तर आता न्यूज चॅनेल्स आणि मालिकासुद्धा उघडपणे हिंदुत्वाच्या प्रवक्ता बनल्या आहेत.

2022 मध्ये आलेला "काश्मीर फाईल्स" सिनेमाला मोदी सरकारने हिंदू शासित राज्यांमध्ये करातून मुक्त केले. संघ-भाजपने केलेल्या विखारी प्रचाराच्या जोरावर या सिनेमाने बॉक्सऑफिसवर 300 कोटींची कमाई केली. हा सिनेमा 1990 मध्ये काश्मिरी पंडितांच्या काश्मीरमधून निर्गमनाची कथा सांगण्याचा दावा करतो. काश्मिर प्रश्नाचा कोणताही गंभीर जनपक्षधर अभ्यासक सांगू शकतो की हा सिनेमा अत्यंत एकांगी आणि मुस्लिमविरोधी चित्र निर्माण करण्यासाठीच बनवला आहे, आणि काश्मिर प्रश्नावर नेहरू-काँग्रेसने तेथील जनतेचा केलेला विश्वासघात, सार्वमताची मागणी, जनतेवरील अत्याचार, संघ-भाजपने केलेला धर्मभेद, धर्मनिरपेक्ष राजकारणाचा इतिहास व भांडवली पक्षांनी केलेली धोकेबाजी, काँग्रेस-भाजपच्या धोरणातील निरंतरता असे अनेक प्रश्न दुर्लक्षून फक्त मुस्लिमांचे दैत्याकार रूप प्रस्तुत करतो. यासाठीच संघ-भाजपकडून सिनेमाघरांच्या आत आणि बाहेर 'जय श्री राम' चे नारे देण्यात आले.

पान 2 वर

# गो–रक्षणाच्या नावाखाली हरियाणात हिंदू युवक सुद्धा बळी! मुस्लिमांवर सतत वाढते हल्ले! निवडणुकीत पराभवाच्या भयाने पसरवत आहेत जातीयवादाचे विष!

✒ सुस्मित

24 ऑगस्ट रोजी हरियाणामध्येच आर्यन मिश्रा या 12 वी च्या मुलाची गो तस्कर असल्याच्या संशयावरून हत्या झाली. काही स्वयंघोषित गोरक्षकांनी हा हल्ला केला. हल्यानंतर या गुंडसेनेचा म्होरक्या असलेला मोनु मनेसर याने आर्यनच्या वडिलांची माफी मागत म्हटले की त्यांना वाटले की तो मुलगा मुस्लिम आहे आणि चुकून एका ब्राह्मणाची हत्या झाली. म्हणजे मृत व्यक्ती मुस्लिम असता तर हा खून क्षम्य होता? खरेतर एका निरपराध व्यक्तीची हत्या झाली आहे, आणि ती अशा लोकांनी केली आहे जे धर्मवेडे आहेत. मुस्लिमद्वेषाचे संघ परिवाराने लागलेली आग सतत अशाप्रकारे निरपराधांचे बळी घेत आहे. **प्रश्न आहे की जर लोकशाही आणि कायद्याचे राज्य आहे तर हे तथाकथित गोरक्षक कोण आहेत की ज्यांना कायदा हातात घेण्याचा अधिकार मिळाला आहे?**

साबिर मलिक हरियाणातील चरखी दादरी येथे कचरा गोळा करून उदरनिर्वाह चालवत होता. बीफ खाल्याच्या संशयावरून काही तथाकथित गोरक्षकांनी त्याची 27 ऑगस्ट रोजी निर्घृण हत्या केली. साबिर ज्या गावात रहायचा तिथे मुख्यतः पश्चिम बंगाल भागातील स्थलांतरित दलित आणि जाट कामगार राहतात. या घटनेनंतर गावतल्या स्थलांतरित कामगारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेवर हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी म्हटले की "गावकरी गायीची पूजा करतात. जर त्यांना अशा घटनांबद्दल समजत असेल तर त्यांना कोण रोखू शकते?". **जर मुख्यमंत्रीच अशाप्रकारे जमावाद्वारे हत्येचे समर्थन करत असतील तर देशात राज्य कायद्याचे आहे की झुंडीचे हा प्रश्न उपस्थित राहिल्याशिवाय राहणार नाही.** या घटनेवरील वक्तव्य सांगून जातं की कशाप्रकारे जमिनीवरील मुस्लिमांवरच्या हिंसेला संघ परिवारातील संघटना चालना देत आहेत आणि सरकारे गो रक्षकांना समर्थन आणि संरक्षण देत आहेत.

1 सप्टेंबर रोजी महाराष्ट्रामध्ये जळगाव-कल्याण ट्रेन मध्ये प्रवास करणाऱ्या 72 वर्षीय वयोवृद्ध अश्रफ मणियार यांना बीफ घेऊन जात असल्याच्या संशयावरून "पोलिस बनण्यास निघालेल्या" काही तरुणांनी शिवीगाळ केली, त्यांचे कपडे फाडले, त्यांच्याकडचे सगळे पैसे काढून घेतले आणि त्यांना मारहाण केली. हे सर्व करत असताना या घटनेचा विडिओ पण त्यांनी रेकॉर्ड केला. जेव्हा हा व्हिडीओ सोशल मीडियामध्ये पसरला तेव्हा अश्रफ यांच्या कुटुंबियांना या घटनेबद्दल समजले. केस झाली आणि 3 आरोपींना अटक केली गेलीपण त्यांना एका दिवसात जमीन सुद्धा मंजूर झाला. जेव्हा या घटनेबद्दल जनतेमधून आवाज उठवला जाऊ लागला तेव्हा पोलिसांनी जास्त गंभीर कलमे लावली आणि जामीन रद्द झाला आहे. पोलिसांनी अजूनही मॉब लिंचिंग संदर्भातले कलम 103 (2) लावले नाहीये. अजूनही 3 हल्लेखोर फरार आहेत.

गेल्या वर्षी जून 2023 ला नाशिकमध्ये बजरंग दलच्या गुंडांनी अफन अन्सारी आणि नासिर कुरेशी यांच्यावर बीफच्या तस्करीच्या संशयावरून यांच्यावर हल्ला केला होता. यामध्ये अफनचा मृत्यू झाला तर नासिर कुरेशी गंभीर जखमी झाला होता. अफन वर पोलिसांनी प्राणी क्लेश प्रतिबंधक (Prevention to Cruelty To Animals) कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. लखमन अन्सारीला अशाच प्रकारे काही आठवडे आधी बजरंग दलच्या गुंडांनी मारून टाकले. 15 फेब्रुवारी 2023 ला राजस्थानमध्ये राहणाऱ्या नासिर आणि जुनेद या दोन मुस्लिम तरुणांची बजरंग दलच्या गुंडांनी गायीच्या तथाकथित तस्करीच्या संशयावरून अपहरण करून हत्या केली आणि त्यांचे मृतदेह जाळून टाकले. ज्या कार मधून नासिर, जुनेद प्रवास करत होते ती कार त्यांच्या घरापासून 150 किलोमीटर दूर हरियाणामध्ये सापडली. नासिर आणि जुनेदच्या हत्येमध्ये बजरंग दलचे कर्यकर्ते सामील होते. जुनेद आणि नासिरच्या हत्येमधील मुख्य आरोपी, जो स्वतः ला "गो–रक्षक" म्हणवतो, त्या मोनू मानेसरवर गुडगावमध्ये दंगे घडवल्याचे आरोप आहेत.

केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतर गोरक्षणाच्या नावाखाली झालेल्या हत्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. 2010 ते 2018 मध्ये अशा प्रकारच्या हिंसेच्या 123 घटनांची नोंद आहे त्यापैकी 98 टक्के घटना 2014 मध्ये भाजपचं सरकार केंद्रात आल्यानंतर घडल्या आहेत. या घटनांमध्ये हत्या करण्यात पीडितांपैकी 86 टक्के मुस्लिम धर्मीय होते. यातल्या एक तृतीयांश घटनांमध्ये पोलिसांनी पिडीतांवरच गुन्हा दाखल केला आहे(!).

एप्रिल 2023 मध्ये आग्र्यामध्ये हिंदू महासभेच्या कार्यकर्त्यांनी तथाकथित गोहत्या झाल्याची तक्रार पोलिसांकडे केली आणि 4 मुस्लिम व्यक्तींना अटक करण्यासाठी पोलिसांवर दबाव टाकला. नंतर तपासात हे स्पष्ट झाले की **हिंदू महासभेच्याच कार्यकर्त्यांनीच संबंधित मुस्लिम व्यक्तींसोबत असलेल्या भांडणातून आणि त्यांच्याकडून पैसे उकळण्यासाठी स्वतःच गायीला कापले.** राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघाशी संलग्न इतर संघटना (जसे की, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद) अशाप्रकारे गोरक्षेच्या नावाखाली देशातल्या दलित, मुस्लिम, कामगार, तरुणांच्या हत्या घडवून आणत आहेत आणि देशामध्ये धार्मिक, जातीय तणाव वाढवण्याचे काम करत आहे. देशात फॅसिस्ट भाजप सरकार सत्तेत आल्यापासून विश्व हिंदू परिषद, बजरंग दल सारख्या फॅसिस्ट संघटनांना मोकळे रान मिळाले आहे.

## आर.एस एस. च्या गो-प्रेमाचे वास्तव

आर.एस एस.साठी "गोमाता" हा फक्त देशामध्ये धार्मिक ध्रुवीकरणासाठीचा एक मुद्दा आहे. **भाजपचा नेता संगीत सोम जो की 2013 च्या मुझफ्फरपूर दंग्यांमधला आरोपी आहे आणि गो-रक्षणाच्या नावाने भडकाऊ भाषणं करतो आणि तो अल दुआ' नावाच्या कत्तलखान्याचा संचालक होता!** जर आर.एस एस. भाजप साठी गाय जर माता असेल तर **नागालँडमध्ये बीफ बंदी कधीच होणार नाही असे नागालँडचे भाजप नेते विसासोली होंगू का म्हणाले?** मणिपूरमध्ये गोमांस खाण्यावर बंदी नाही, काय खावे ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे, असे भाजप नेते आणि मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह का म्हणाले? हे तर योग्यच आहे की अन पेहराव, जीवनशैली ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे आणि त्यात कोणत्याही पक्षाला किवा सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही मग भाजप हा दुटप्पीपणा का करतो? मेघालयातील भाजप नेते अर्नेस्ट मावरी यांनी "मी गोमांस खातो. ही मेघालयातील जीवनशैली आहे आणि कोणीही ते रोखू शकत नाही" असे का म्हटले? **केरळमधील मलप्पुरममधील उमेदवार भाजप नेते श्रीप्रकाश यांनी गोमांसाचा पुरवठा कमी होऊ देणार नाही** आणि गोमांस खाण्यावर कधीही बंदी घातली जाणार नाही असे आश्वासन का दिले? **गोव्यात गोमांसावर बंदी घालण्याचा भाजपचा कोणताही हेतू नाही, असे 2017 मध्ये अमित शहा** यांनी का म्हटले? भाजपचे माफीवीर गुरु विनायक सावरकर म्हणाले होते की गाय हा केवळ प्राणी आहे माता नाही! यावर आर.एस एस. चे सध्या काय म्हणणे आहे? आर.एस एस.साठी गाय नागालँड, मणिपूर, मेघालय, केरळ इथे फक्त प्राणी आहे आणि इतर ठिकाणी माता आहे? आर.एस.एस., **भाजप च्या दुतोंडीपणातून हे स्पष्ट आहे की आर.एस.एस. साठी गो-प्रेम हे फक्त नाटक आहे. लोकांच्या धार्मिक भावनांना भडकावून नकली मुद्दे उभे करायचे** आणि धार्मिक तणाव भडकवायचे आणि महागाई, बेरोजगारी, शिक्षण आरोग्य या जनतेच्या खऱ्या मुद्द्यांवर पांघरूण घालायचे. याचा परिणाम आहे की आता गोरक्षकांच्या गुंडसेना उभ्या झाल्या आहेत ज्यांना खुलेआम खून करण्याची परवानगी सरकारी यंत्रणा देत आहे.

## काँग्रेसचे चारित्र्य: आतापर्यंत फॅसिस्ट संघटनांसोबत करत आला आहे तडजोडी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांची सगळी पिलावळ यांची वाढ काँग्रेस देशभरात सत्तेमध्ये असतानाच झाली. **काँग्रेस सुरवातीपासूनच अशा संघटनांसोबत तडजोडी करत आलेला आहे. काँग्रेसचा हा इतिहास एक स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो. पण नुकत्याच घडलेल्या मॉब लिंचिंगच्या घटनांनंतर काँग्रेसचे केलेल्या कृतींवरून काँग्रेसचे चारित्र्य स्पष्ट होऊ शकेल.**

नासिर आणि जुनेद राजस्थान मध्ये राहत होते जिथे गेल्या वर्षी काँग्रेसचे गेहलोत सरकार होते. नासिर आणि जुनेदच्या हत्येनंतर त्यांच्या गावावाले तसेच कुटुंबियांकडून सुद्धा काँग्रेसच्या गेहलोत सरकारकडून दबाव टाकण्याचा आरोप केला गेला आहे. नासिर आणि जुनेदच्या हत्येनंतर त्यांच्या गावकऱ्यांना राजस्थान पोलीसने नोटीस बजावली होती त्यात त्यांना स्थानिक कोर्टात हजार राहण्यास सांगण्यात आले. काँग्रेसच्या राज्यात बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषदकडून मोनू मानेसरच्या समर्थनार्थ महापंचायत भरवली गेली.गेल्या वर्षी झालेल्या कर्नाटक विधानसभा निवडणुकांच्या आधी काँग्रेसने जाहीर केले होते की जर काँग्रेस सत्तेत आले तर बजरंग दलावर बंदी टाकू. पण सत्तेत आल्यानंतर हा काँग्रेसचा जुमला होता हे स्पष्ट झाले कारण काँग्रेसने काहीही केलेले नाही.

यावरूनच आपण काँग्रेसचे खरे चारित्र्य समजले पाहिजे जो सत्तेसाठी फॅसिस्ट संघटनांसोबत नेहमीच तडजोडी करत आला आहे. सध्या सगळे विरोधी पक्ष युती करून भाजपला निवडणुकांमध्ये हरविण्याचे मनसुबे रचत आहेत. पण फॅसिसमला निवडणुकांच्या मार्गाने हरवणे शक्य नाही. कामगार कष्टकऱ्यांची वर्गीय एकजुटच फॅसिझमला कायमसाठी परास्त करू शकते.

## धर्माच्या नावाने मतांचे राजकारण ओळख! जात धर्माचे झगडे सोडा!

मोदी सरकारच्या काळात महागाई अभूतपूर्व प्रमाणात वाढली आहे. गॅस सिलेंडर जे 2014 मध्ये 450 रुपयाला मिळत होते ते आज 1100 रुपयाला मिळत आहे. पेट्रोल जे 2014 मध्ये 70 रु. प्रति लिटर दराने मिळत होतं ते आज 100 रु. प्रति लिटर दराने मिळत आहे. प्रत्येकच जीवनावश्यक गोष्ट महाग झाली आहे. "बहुत हुई महंगाई की मार, अबकी बार मोदी सरकार" असे म्हणत सत्तेत आलेल्या मोदी सरकारच्या काळात महागाई अजूनच वाढली आहे. आज अच्छे दिनाचे वास्तव सर्वासमोर उघडे पडले आहे. बेरोजगारीच्या मुद्द्यावर सुद्धा मोदी सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. दर वर्षी 2 कोटी रोजगार देण्याचे आश्वासन दिलेल्या मोदींनी गेल्या 10 वर्षात फक्त जवळपास 7 लाख नोकऱ्या दिल्या आहेत आणि यासाठी 22 कोटी तरुणांनी अर्ज केले होते. मोदी सरकारच्या खाजगीकरण, कंत्राटीकरणाच्या रेट्यामुळे ज्यांना नोकऱ्या आहे त्यांनासुद्धा नोकऱ्यांची शाश्वती नाहीये. सैन्यामध्ये अग्नीवर योजना आणून कंत्राटी पद्धतीने भरती करत आहे. मुंबई पोलीस दलात सुद्धा आता कंत्राटी पद्धतीने भरती होत आहे. पक्का रोजगार कमी होत चालला आहे. अलीकडेच, अमेझॉनने आपल्या 18,000 आणि एच.पी.ने आपल्या 6,000 हून अधिक कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याबद्दल बोलले आहे. जुलै 2022 पासून, मायक्रोसॉफ्टने तीन वेळा आणि नेटफ्लिक्सने दोनवेळा छाटणी केली आहे. ज्या काही नोकऱ्या आहेत त्या कंत्राटी पद्धतीच्या, कमी पगाराच्या आणि जास्त तास राबवून घेणाऱ्या आहेत. मागच्याच आठवड्यात तलाठ्याच्या 4644 जागांसाठी 11,50,265 अर्ज आले होते. यावरूनच बेरोजगारीची समस्या किती गंभीर आहे हे समजू शकते. मोदींने 2014 मध्ये म्हटले होते "ना खाऊंगा ना खाने दूंगा" पण गेल्या 10 वर्षात मोदी सरकार भ्रष्टाचाराचे नवनवीन विक्रम रचत आहे. राफेल घोटाळ्यापासून, कोरोनाच्या काळातला पी.एम. केअर्स घोटाळा, सरकारी नोकऱ्यांमध्ये भरतीचा व्यापम घोटाळा, एन.पी.ए. घोटाळा, अडाणी घोटाळा ते नीट परीक्षा घोटाळा. मोदी सरकारच्या काळात झालेल्या भ्रष्टाचारांबद्दल लिहायचे तर एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल. सध्या तरी एवढे स्पष्ट आहे की **भ्रष्टाचारांमध्ये काँग्रेसपेक्षा भाजप मागे नक्कीच नाही किंबहुना दोन पाऊले पुढेच आहे.**

**हरियाणामध्ये निवडणूका होऊ घातल्या आहेत, आणि अशातच हे हल्ले वाढले आहेत! स्पष्ट आहे की निवडणुकीत धार्मिक ध्रुवीकरण घडवण्यासाठीच हे केले जात आहे.** अशा स्थितीत जनतेच्या महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचारासारख्या खऱ्या प्रश्नांवर पांघरूण घालण्यासाठीच लव्ह जिहाद, गो माता अशा प्रकारचे नकली धार्मिक मुद्दे आपल्यामध्ये आणले जातात. भांडवलदार वर्गाच्या भिकेवर जगणारा भाजप अर्थातच दुसरे तिसरे काही नसून भांडवलदार वर्गाचा साखळीने बांधलेला हिंस्त्र कुत्रा आहे जो की भांडवलदार वर्ग गरज पडल्यास कामगार-कष्टकरी वर्गावर सोडत असतो. सध्या देशातील भांडवलदारांचा नफ्याचा दर घसरतो आहे, आणि त्यामुळेच त्यांना भाजप सारख्या पक्षाची गरज आहे, जो हिंदुत्व वापरून जनतेला विविध जाती, धर्मांमध्ये विभागण्याचे काम करेल, जनतेसमोर नकली शत्रू उभा करेल आणि जनतेला आपसातच भांडायला लावेल. यामुळे सध्याच्या शोषणकारी व्यवस्थेची निरंतरता टिकून राहण्यास मदत होते. निश्चितपणे धर्माच्या नावाने गुंडागर्दी करणाऱ्यांना शिक्षा तर झालीच पाहिजे, पण राजकारणात विचार करावा लागेल की आपल्यासाठी महागाई, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य हे खरे मुद्दे आहेत की लव्ह जिहाद, गौ हत्या, मंदिर-मस्जिद हे मुद्दे? धर्म-जातीपलीकडे कामगार-कष्टकऱ्यांनी एकजूट होऊनच या फॅशिस्टांच्या मागे बसलेल्या त्यांच्या पोशिंद्या भांडवलदारांना टक्कर दिली जाऊ शकते. इतिहासात याची उदाहरणे आहेत.

इस बार दंगा बहुत बड़ा था  
खूब हुई थी  
ख़ून की बारिश  
अगले साल अच्छी होगी  
फसल  
मतदान की  
(कवी: गोरख पाण्डेय)

# कोलकाता, बदलापूर, आसाम, मुझफ्फरपूर, कोल्हापूर, पुणे, रत्नागिरी इत्यादी ठिकाणी महिला हिंसाचाराच्या भीषण घटना

## वाढत्या महिला हिंसाचाराविरुद्ध एकजूट होत भांडवली पुरुषसत्तेला मुळातून नष्ट करण्याची गरज!



✎ जयवर्धन

9 ऑगस्ट रोजी घडलेल्या कोलकाता येथील महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर संपूर्ण देशात विरोधाची, संतापाची लाट उसळली आणि ठिकठिकाणी निदर्शने, आंदोलने झालीत. पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या एका डॉक्टर महिलेवर ती सेमिनार हॉल मध्ये आराम करत असताना बलात्कार करून हत्या करण्यात आली. याबाबत संपूर्ण हॉस्पिटल प्रशासनाचा व प्रिंसिपल संदीप घोष याचासुद्धा व्यवहार संशयास्पद असून या प्रकरणात भ्रष्टाचाराची यंत्रणा, आणि आणखीही आरोपी सहभागी असण्याची शक्यता आहे.

यानंतर संपूर्ण देशभरात डॉक्टर्स संघटनांनी संप पुकारत या घटनेतील दोषींना कठोर शिक्षा देण्याची आणि सुरक्षेची कडक व्यवस्था लागू करण्याची मागणी केली. न्यायप्रिय जनताही रस्त्यावर उतरली. मात्र या भीषण घटनेनंतर सुद्धा बलात्काराच्या आणि बलात्कार करून हत्या केल्याच्या अनेक घटना देशभरात पुढे आल्या आहेत. **बदलापूर येथे शाळेमध्ये दोन चिमुकल्या मुलींवर अत्याचार** करण्यात आले. शाळेतीलच एका सफाई कर्मचाऱ्याकडून हे कृत्य करण्यात आल्याचे समोर आले. त्यानंतर बदलापूर येथे सुद्धा स्थानिक नागरिकांनी चक्काजाम आंदोलन केले आणि न्याय देण्याची मागणी केली. आसाममध्ये सुद्धा एका शाळकरी मुलीवर ती शिकवणीवरून घरी परतत असताना सामूहिक बलात्कार करण्यात आला. गावातील काही नागरिकांना ती रस्त्याच्या कडेला बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्यानंतर तिला दवाखान्यात नेण्यात आले. त्या मुलीच्या आजीच्या म्हणण्यानुसार दोनच दिवसांपूर्वी कोलकाता बलात्कार प्रकरण घडल्यानंतर तिच्या नातीने बलात्कार काय असतो असा प्रश्न तिला विचारला होता आणि महिलांच्या सुरक्षेबाबत त्यांनी चर्चाही केली होती. **बिहार येथील मुजफ्फरपुर मध्ये एका अल्पवयीन मुलीवर लग्नासाठी नकार दिला म्हणून जबरदस्तीने पळून नेऊन तिच्यावर सामूहिक बलात्कार** केला आणि नंतर तिची निघृण हत्या करून तिचा मृतदेह शेतात फेकून देण्यात आला. तपासणीमध्ये तिच्या शरीरावर, गुप्तांगावर चाकूने भोसकल्याच्या अतिशय गंभीर जखमा होत्या. **कोल्हापूर मध्ये तर मामानेच त्याच्या दहा वर्षीय भाचीवर बलात्कार** करून नंतर तिची हत्या केली आणि तिचे प्रेत शेतात लपवून ठेवले. **पुण्यात 23 ऑगस्ट या एकाच दिवसात 13 महिलाविरोधी गुन्ह्यांची** नोंद झाल्याची धक्कादायक माहिती पोलिसांनी दिली होती. यामध्ये छेडछाड, विनयभंग यासोबतच भारती विद्यापीठ परिसरात घडलेली बलात्काराची घटनाही सामील होती**. नवले ब्रिज** जवळ एका 16 वर्षीय मुलीवर रिक्षातून प्रवास करत असताना तिच्यासोबत ड्रायव्हरने छेडछाड केली. येरवडा येथे बसमध्ये मुलींना छेडण्यात आले. **भारती विद्यापीठ परिसरात एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार** करण्यात आला.

अलीकडे घडलेल्या या घटनांमध्ये बलात्कार, छेडछाड पासून तर हत्येपर्यंतच्या आणि हत्येपूर्वी क्रूर यातना देण्याच्या घटना समाविष्ट आहेत, ह्या केवळ आताच घडत आहेत असे नव्हे. आपल्या देशात महिलांवर होणाऱ्या अत्याचार, बलात्कार, हत्या, अपहरण, छेडछाड इत्यादी गुन्ह्यांचे प्रमाण खूप जास्त आहे. यापैकी काहीच घटनांची 2012 सालच्या निर्भयाच्या घटनेप्रमाणे किंवा आत्ता समोर आलेल्या कोलकातामधील डॉक्टर महिलेवरील बलात्कार आणि हत्येच्या घटनेप्रमाणे देशस्तरावर दखल घेतली जाते, मोर्चे, आंदोलने होतात, जनतेत प्रचंड रोष निर्माण होतो. परंतु समोर येणाऱ्या या घटना केवळ हिमनगाचे टोक आहेत. एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार आपल्या देशात **प्रत्येक तासाला 51 स्त्री विरोधी गुन्ह्यांची नोंद होते. 2022 या एका वर्षात देशात स्त्री विरोधी अत्याचारांची 4,45,256 प्रकरणे** नोंदवली गेली. 2020 मध्ये हीच संख्या 3,71,503 एवढी होती. अलीकडच्या काळात समोर आलेल्या या घटनांनी महिलांवरील हिंसाचाराचा प्रश्न अतिशय गंभीरपणे समोर आणला आहे. आता वेळ आली आहे की आपण या घटनांकडे केवळ तात्कालिक मुद्दा म्हणून न बघता या महिलाविरोधी हिंसाचारामागील खरी कारणे समजून घेण्याची, त्यासाठी जबाबदार असलेल्या आजच्या भांडवली पुरुषसत्ताक व्यवस्थेला मुळापासून बदलून समानतेवर आधारित न्यायपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी एकजूट होण्याची.

### महिलाविरोधी हिंसाचाराची कारणे काय आहेत?

आज समाजात अस्तित्वात असलेली महिलाविरोधी मानसिकता काय आहे, ती कशी काम करते आणि त्यातून महिलांचे कसे शोषण होते हे समजून घेणे महत्वाचे आहे. महिलेवरील हिंसाचारामागे पुरुष तिच्यावर हक्क गाजवू शकतो, स्त्री कमजोर आहे, स्त्रिचे काम पुरूषाची सेवा करणे आहे, स्त्री एक मूल जन्माला घालण्याचे उपकरण आहे, स्त्रीच्या योनिशुचितेत तिची इज्जत आहे, असे अनेक विचार काम करत असतात. आपल्या या सामाजिक-आर्थिक-राजकीय व्यवस्थेत स्त्रियांच्या अशा दुय्यमत्त्वाला सतत मान्यता देणारी देखील एक विचारधारा काम करते. हजारो वर्षांपासून स्त्रियांना मूलभूत अधिकार नाकारले गेले, तिला शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला, स्त्रीला केवळ चूल आणि मूल यातच म्हणजे चार भिंतीच्या आतच बंदिस्त करून ठेवण्यात आले. मनुस्मृतीच्या कायद्याने किंवा इतर कोणत्याही धर्मातील कायद्यांनी स्त्रियांना नेहमीच दुय्यम वागणूकच दिली आहे. महिलांची ही गुलामी अस्तित्वात येण्याची व पुरुषसत्ता स्थापित होण्याची ऐतिहासिक करणे अगदी थोडक्यात आपण पाहू.

ऐतिहासिकरित्या स्त्रीप्रधान असलेल्या मानवी समाजात अगोदर वरकड उत्पादन, आणि त्यातून खाजगी संपत्तीच्या उदयासोबतच राज्यसत्तेचा आणि कुटुंबसंस्थेचा उदय झाला. उत्पादक शक्तींच्या विकासामुळे अतिरिक्त उत्पादन होऊन खाजगी संपत्ती उदयाला येण्याची, त्यातून राज्यसत्ता आणि कुटुंबव्यवस्था विकसित होण्याची ही प्रक्रिया मानवी समाजाच्या सुरुवातीच्या हजारो वर्षांच्या इतिहासानंतर घडून आली. **खाजगी संपत्ती उदयाला आलेल्या या समाजात ह्या संपत्तीचा पुरुषाकडून ठरणारा वारस ठरवण्याकरिता गरज होती की स्त्रिच्या जोडीदार निवडीच्या अधिकारावर बंधन टाकावे आणि त्यातूनच कुटुंबसंस्था, स्त्रीचे दुय्यम स्थान, स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व संपणे, आणि पुरुषसत्ता अस्तित्वात आली.** खाजगी मालकीवर आधारित समाजरचनेत बदल होत गेले आणि त्यानुसार या दुय्यमत्त्वाचे रूप बदलत गेले, पण आज भांडवली समाजातही ते टिकून आहे.

आपण आज ज्या समाजात राहतो तो एक भांडवली शोषणावर आधारलेला समाज आहे, याचा अर्थ काय? समाजातील बहुसंख्याक कामगार जनता, जिच्याकडे उपजीविकेसाठी उत्पन्नाचे दुसरे कुठलेही साधन नाही, ती आपली श्रमशक्ती विकून आणि त्याबदल्यात मजुरी प्राप्त करूनच या व्यवस्थेत जगू शकते. या मजुरी गुलामगिरीचे स्वरूप अत्यंत वाईट झाले आहे. 10-12 तास काम करून जेमतेम जिवंत राहू शकतील एवढीच मजुरी किंवा वेतन आज कामगारांना मिळते. मात्र मूठभर भांडवलदार वर्ग मात्र कामगारांच्या श्रमाची पिळवणूक करून गडगंज नफा प्राप्त करतो, आणि हा वर्ग असे करू शकतो कारण त्यांच्याकडेच आज उत्पादनाची सर्व साधने केंद्रित झाली आहेत. या वर्गासाठीच राज्यसत्ता, तिचे कायदे, पोलीस, न्याययंत्रणा काम करते. ही भांडवली शोषणकारी व्यवस्था टिकवण्याचेच काम भांडवली राज्यसत्ता करते. या शोषणकारी व्यवस्थेने, अधिक कामगार निर्माण व्हावेत याकरिता महिलेला घराबाहेर कामगार म्हणून बाहेर आणले असले, ऐतिहासिकरित्या चालत आलेल्या महिलांच्या गुलामीच्या काही साखळ्या तोडल्या असल्या तरी पुरुषसत्ताक विचारधारा टिकवण्याचेच काम भांडवलशाही आज विविध पद्धतीने करत आहे, महिलांच्या होणाऱ्या शोषणातून भांडवलशाहीला आज फायदाच आहे हे सुद्धा समजणे गरजेचे आहे.

पुरुष-महिला कामगारांनी वेळेत, कमी पगारात जास्त काम करावे ही भांडवलशाहीची अपेक्षा आहे. **भांडवलशाहीला स्त्रीचे स्वातंत्र्य तिने कामगार आणि एक ग्राहक म्हणून समाजात वावरावे इतक्यापुरतेच हवे आहे.**

खरेतर, समाजात स्त्रीला आजही एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून बघितले जात नाही; घरकामाची संपूर्ण जबाबदारी आपल्या देशात स्त्रियांवरच आहे; तिला नाते निवडण्याचा अधिकार नाही; करिअर निवडण्याचा अधिकार नाही; लहानपणापासून कसे वागायचे, कसे बोलायचे, कुठे जायचे, कुठे नाही जायचे, कुणाशी मैत्री करायची, घरी कधी परत यायचे, कुठले कपडे घालायचे इत्यादी हजारो बंधने स्त्रियांवर टाकली जातात. महिलांना कामाच्या ठिकाणी, घरात, रस्त्यावर, अनोळखी, नातेवाईक, सहकारी यांच्याकडून भेदभावाचा सामना करावा लागतो. घरात आणि कामाच्या ठिकाणी महिलांवर अत्याचार आणि हिंसा होणे, मग त्या कामगार-वर्गातील स्त्रिया असोत वा आयटी कंपनीसारख्या आधुनिक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या स्त्रिया असोत, मासिक पाळीच्या वेळी त्यांच्याशी भेदभाव होणे, रस्त्यावर जाताना छेडछाड होणे, शिक्षण, नोकरी, सार्वजनिक ठिकाणी प्रवेश इत्यादी सर्व संधींमध्ये भेदभाव करणे इत्यादी बाबतींत महिलांवरील होणार हा अन्याय आणि हिंसाचार दिसून येतो. प्रश्न विचारला पाहिजे की या सर्व बाबींशी लढून **स्त्रीला खऱ्या अर्थाने एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगता यावे याकरिता प्रसारमाध्यमे, भांडवलदार, राजकीय पक्ष निकराचा संघर्ष करताना दिसतात का ? नाही! रोजगाराचा अधिकार नाकारत व्यक्तिस्वातंत्र्याची पहिली गरज पूर्ण न करू शकणारी ही व्यवस्था स्त्रिला तिच्या जीवनाचे निर्णय घेण्याचे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य देऊच शकत नाही.**

उलट भांडवली मीडियाच्या माध्यमातून समाजमाध्यमांद्वारे, चित्रपटांतून, गाण्यांद्वारे स्त्रियांना एखादी वस्तू म्हणून प्रदर्शित केले जाते. परंपरागत चौकटीतील स्त्रिच्या दुय्यमत्त्वाला सुद्धा रंगवून दाखवत सिनेमा/नाटके/सिरियल्स मधील विषयवस्तू बनवून त्यातून पैसे कमावले जातात; इतकेच नव्हे तर **वेश्याकार्याला सुद्धा "व्यवसाय" म्हणवत आणि स्त्री-पुरुष नैसर्गिक संबंधाना सुद्धा पॉर्नद्वारे बाजारात आणत देहबाजाराचे गौरवीकरण केले जाते. अशा व्यवस्थेत स्त्रियाकडे बघण्याचा समानतेचा, न्यायपूर्ण, निकोप दृष्टिकोन कसा निर्माण होईल?**

भांडवली राज्यसत्तेद्वारे सुद्धा राजकीय गणिते लक्षात घेता अत्याचाऱ्याना बलात्काऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम केले जाते. राम रहीम

पान 12 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय: द्वारे बबन ठोके, देविका मेडिकोच्या वर, साई कृपा चाळ, साईबाबा मंदिराजवळ, वीर जिजामाता भोसले मार्ग, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर, मानखुर्द, मुंबई - 400043 • मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित